# माफसू

# यशोगाथा

## रौप्य महोत्सवी विशेषांक




महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर



## महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

### रौप्य महोत्सवी विशेषांक

# माफसू यशोगाथा

**मार्गदर्शक**

**डॉ. नितीन पाटील**
कुलगुरु
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**मुख्य संपादक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**संपादकीय मंडळ**

**डॉ. बापुराव कदम**
प्राध्यापक

**डॉ. अतुल ढोक**
प्राध्यापक

**डॉ. गितांजली ढुमे**
तांत्रिक अधिकारी

**डॉ. विजयसिंह लोणकर**
प्राध्यापक

**डॉ. तेजस शेंडे**
सहयोगी प्राध्यापक

**डॉ. स्वप्निल घाटगे**
सहयोगी प्राध्यापक

**डॉ. हेमंत गावंडे**
प्राध्यापक

**डॉ. सारीपुत लांडगे**
प्राध्यापक

**प्रकाशक**
विस्तार शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
नागपूर- ४४० ००१

© २०२५, विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर - ४४० ००१
सर्व हक्क राखीव

**पुस्तकाचे नाव : माफसू यशोगाथा**

**संपादन :** विस्तार शिक्षण संचालनालय, मपमविवि, नागपूर

**प्रथम आवृत्ती :** जून २०२५

**प्रकाशक**
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४० ००१, महाराष्ट्र
दूरध्वनी : ०७१२-२५११७८४ / २५११७८५
संकेतस्थळ : www.mafsu.ac.in

**शब्दांकन:** स्वप्नील भोगेकर, आयसीटी मीडिया प्रा. लि., नागपूर
**मुखपृष्ठ डिझाईन:** सागर पवार, आयसीटी मीडिया प्रा. लि., नागपूर
**संरचना व पृष्ठसज्जा:** आयसीटी मीडिया प्रा. लि., नागपूर
**मुद्रण व बांधणी:** आयसीटी मीडिया प्रा. लि., नागपूर

# शुभेच्छा संदेश



शेती आणि पशुपालन हे भारताच्या ग्रामीण जीवनशैलीचे केंद्रस्थान आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या पुढाकाराने प्रकाशित होणारे 'माफसू यशोगाथा' हे पुस्तक, नवउद्योजकतेचा एक प्रेरणादायी दस्तऐवज आहे. यामध्ये स्थानिक स्तरावरून उत्तुंग यश संपादन केलेल्या पशुपालक व कृषी उद्योजकांच्या जिवंत कहाण्या समाविष्ट आहेत. या कहाण्या फक्त उदात्त स्वप्नांच्या नव्हे, तर कठोर परिश्रम आणि अडथळ्यांवर मात करून दूरदृष्टीने उभारलेल्या व्यवसायांच्या आहेत. आजच्या युगात केवळ शैक्षणिक पात्रता पुरेशी नाही; व्यावसायिक दृष्टीकोन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वेळोवेळी योग्य मार्गदर्शन हेही तितकेच महत्त्वाचे ठरते. या सर्वांचा उत्तम मिलाफ 'माफसू यशोगाथा' मध्ये दिसतो. शेतकरी बांधव, ग्रामीण महिला आणि बेरोजगार तरुणांनी कसे शून्यापासून व्यवसाय उभे केले, त्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य कसे मिळवले व कोणत्या धोरणात्मक निर्णयांनी यशाचे शिखर गाठले, हे सर्व वाचकाला थक्क करते.

या पुस्तकातून उलगडणाऱ्या गोष्टी केवळ यशाच्या नाहीत, त्या समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या आणि शाश्वत उद्योजकतेचे दर्शन घडवणाऱ्या आहेत. 'माफसू' शी संलग्न महाविद्यालये, प्राध्यापकवर्ग आणि प्रशिक्षण कार्यक्रम हे सर्व या बदलाचे शिल्पकार आहेत. त्यांनी दिलेले मार्गदर्शन आणि प्रशिक्षण यामुळे आज अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली आहेत. यामध्ये दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, मत्स्य व्यवसाय, मूल्यवर्धन, विक्री व्यवस्थापन, विपणन या सर्वच अंगांचा समावेश आहे. ही कौशल्ये विद्यार्थ्यांनाही पुढे उद्योजक बनवण्यासाठी उपयुक्त ठरतात. ही यशोगाथा केवळ अनुभवकथन न राहता, पुढील पिढीसाठी मार्गदर्शक दस्तऐवज ठरेल, यात शंका नाही. त्यामुळे मी या पुस्तकाच्या प्रकाशनाचे मनापासून स्वागत करतो आणि संपूर्ण माफसू परिवाराचे देखील यासाठी अभिनंदन करतो. बेरोजगार युवकांना मी हेच सांगू इच्छितो... स्वप्न पहा, प्रयत्न करा आणि 'माफसू'च्या मार्गदर्शनात स्वतःचा मार्ग स्वतःच घडवा, कारण तुम्हीही उद्योजक होऊ शकता.

शेती आणि पशुपालन क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी केवळ सरकारी योजनांचा लाभ घेणे पुरेसे नाही, तर गरज आहे सतत शिकण्याची, बदल स्वीकारण्याची आणि नविन प्रयोगांची. 'माफसू यशोगाथा' या पुस्तकातून हेच अधोरेखित होते की, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि चिकाटी यांच्या बळावर कोणताही सामान्य व्यक्ती असामान्य यश मिळवू शकतो. यातील प्रत्येक कहाणी ही त्या बदलाची साक्ष आहे जी आत्मविश्वास वाढवते, नव्या संधी शोधायला प्रवृत्त करते आणि ग्रामीण भारताच्या उज्ज्वल भविष्याची दिशा दाखवते.

ही एक अशी अमूल्य प्रेरणागाथा आहे, जी केवळ वर्तमानाला मार्गदर्शक ठरणार नाही, तर भावी पिढ्यांनाही स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची हिंमत देईल. ही यशोगाथा म्हणजे ग्रामीण भारताच्या नव्या शक्यतांची झलक आहे जी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणाऱ्या भारतासाठी एक ठोस पाऊल ठरते. माफसूचा हा उपक्रम इतर विद्यापीठांनाही अनुकरणीय वाटावा, इतका परिणामकारक ठरेल, असा माझा विश्वास आहे.

**डॉ. नितीन पाटील**

कुलगुरु

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# संपादकीय



शेती ही भारतीय ग्रामीण जीवनव्यवस्थेचा कणा असली, तरी केवळ शेतीच्या उत्पन्नावर एकविसाव्या शतकातील अनिश्चिततेत टिकून राहणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. अशा वेळी पशुसंवर्धनासारखे शेतीपूरक व्यवसाय शेतकऱ्यांसाठी स्थैर्याचे, आत्मनिर्भरतेचे आणि उद्योजकतेचे मजबूत साधन ठरले आहेत. पशुधन व्यवसाय म्हणजे फक्त जनावरांचे पालन नाही, तर त्यामागे आहे नियोजन, व्यवस्थापन, विज्ञानाधिष्ठित दृष्टिकोन आणि बाजारपेठेची समज. हे क्षेत्र केवळ आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नाही, तर ग्रामीण तरुणांना, महिलांना आणि लघु व अल्पभूधारक शेतकऱ्यांना स्वतंत्र आर्थिक ओळख निर्माण करण्याचा मार्ग देते. दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन, मत्स्य उत्पादन-पालन, प्रक्रिया उद्योग, खाद्य व औषध निर्मिती इत्यादींच्या माध्यमातून रोजगाराची अनेक द्वारे उघडली जात आहेत.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत कार्यरत महाविद्यालये आणि विस्तार शिक्षण विभागाच्या प्रयत्नांतून अशा कितीतरी यशोगाथा साकारल्या गेल्या आहेत. विद्यापीठाच्या प्रशिक्षण, कार्यशाळा आणि सततच्या मार्गदर्शनामुळे आज अनेकांनी पारंपरिक शेतकऱ्याच्या ओळखीवरून यशस्वी व्यावसायिकांची ओळख निर्माण केली आहे. 'माफसू यशोगाथा' या पुस्तकाच्या माध्यमातून आम्ही अशा प्रेरणादायी उद्योजकांचा प्रवास आपल्या समोर सादर करत आहोत, ज्यांनी अडथळ्यांना संधी मानले आणि सीमित संसाधनांतून अपार यश मिळवले. हे पुस्तक नवीन शेतकरी, बेरोजगार तरुण, ग्रामीण उद्योजक, महिला बचतगट आणि विस्तार कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, याची आम्हाला खात्री आहे.

अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात ग्रामीण भागाला सामावून घेण्यासाठी आवश्यक आहे स्थानिक कौशल्यांचा विकास आणि उपलब्ध संसाधनांचा शाश्वत उपयोग. पशुसंवर्धन हे एक असे क्षेत्र आहे जे ग्रामीण जीवनाशी समरस होऊन, त्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवते. आजच्या काळात शाश्वत उत्पादन प्रणाली, हरित अर्थव्यवस्था आणि जैवविविधतेच्या संवर्धनावर जगभरात भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर, पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांची सांगड घालून विकसित होणारा पशुधन व्यवसाय हा केवळ उत्पन्नाचे साधन न राहता, पर्यावरणपूरक आणि समाजाभिमुख विकासाचे प्रभावी मॉडेल ठरतो.

प्रत्येक यशोगाथा ही एक संदेश आहे की शिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणताही शेतकरी उद्योजक बनू शकतो. त्यासाठी गरज आहे विश्वासाची, प्रयत्नांची आणि योग्य दिशा मिळण्याची. ही दिशा देण्याचे काम माफसू विद्यापीठाचे सर्व घटक आज यशस्वीपणे करत आहेत. मी या पुस्तकाच्या निर्मितीत योगदान दिलेल्या सर्व लेखक, प्राध्यापक, पशु-मत्स्यपालक आणि संपादकांचे आभार मानतो. तसेच आयसीटी मीडिया प्रा. लि. यांनी पुस्तक निर्मिती आकर्षकपणे केल्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो. यशोगाथांचा हा संग्रह अनेकांना प्रेरणा देवो आणि नव्या यशाच्या प्रवासाला गती देवो, हीच अपेक्षा.



**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

# अनुक्रमणिका

## दुग्धव्यवसाय


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. सचिन भाऊरावजी चिकनकर | डॉ. अनिल भिकाने, डॉ. सारीपुत लांडगे | ०२ |
| २. | श्री. पंडित बळवंतराव श्रृंगारे | डॉ. अनिल भिकाने, डॉ. नितीन मार्कंडेय | ०३ |
| ३. | श्री. प्रशांत दिगंबर भोसले | डॉ. अनिल भिकाने, डॉ. विश्वास साळुंके | ०४ |
| ४. | श्री. विजय बाबासाहेब बारकुल | डॉ. अनिल भिकाने | ०५ |
| ५. | श्री. अजित जगन्नाथ देशमुख | डॉ. अनिल भिकाने | ०६ |
| ६. | श्री. रामचंद्र तात्याराव शिंदे | डॉ. अनिल भिकाने | ०७ |
| ७. | श्री. विशाल सुधाकर लहाने | डॉ. अनिल भिकाने | ०८ |
| ८. | श्री. ज्ञानोबा भीमराव जगताप | डॉ. अनिल भिकाने | ०९ |
| ९. | मोहसीन सुलतान खान मोकाशी | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. विश्वास साळुंके | १० |
| १०. | श्री. शुभम दत्तात्रय शिनगारे | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. विजय कदम | ११ |
| ११. | श्री. सागर मारुती साळुंखे | डॉ. राजू शेलार, डॉ. गोकुळ सोनवणे | १२ |
| १२. | श्री. धनाजी किशन बिरादार | डॉ. प्रफुल्लकुमार पाटील | १३ |
| १३. | श्री. पंकज कृष्णा भोसले | डॉ. प्रफुल्लकुमार पाटील, डॉ. मत्स्यगंधा पाटील | १४ |


## शेळीपालन


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. रामचंद्र केशव जाधव | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. राजू शेलार | १६ |
| २. | श्री. संदीप विश्वनाथ औटे | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. विद्या निंबाळकर | १७ |
| ३. | श्री. अक्षय शांताराम पिसाळ | डॉ. तेजस शेंडे, डॉ. अभिजीत बाराते | १८ |
| ४. | श्री. विशाल विलास मदने | डॉ. तेजस शेंडे, डॉ. अभिजीत बाराते | १९ |
| ५. | श्री. चंद्रकांत गजानन भोसले | डॉ. तेजस शेंडे, डॉ. अभिजीत बाराते | २० |
| ६. | श्री. जनार्दन आबासो धुमाळ | डॉ. तेजस शेंडे | २१ |
| ७. | श्री. दशरथ लक्ष्मण तांडेल | डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. हिराचंद पालमपल्ले | २२ |
| ८. | श्री. संतोष सदू भगत | डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. सलील हांडे | २३ |
| ९. | श्री. ब्रम्हाजी माधवराव केंद्रे | डॉ. प्रफुल्लकुमार पाटील | २४ |
| १०. | श्री. हरिश्चंद्र शाहूराव घुगे | डॉ. प्रफुल्लकुमार पाटील | २५ |
| ११. | श्री. वाघंबर प्रल्हाद सूर्यवंशी | डॉ. प्रफुल्लकुमार पाटील, डॉ. मत्स्यगंधा पाटील | २६ |


## कुक्कुटपालन


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रदीप नंदकुमार कोंडे | डॉ. अविनाश कदम, डॉ. विजयसिंह लोणकर | २८ |
| २. | श्री. विशाल दिलीप धुमाळ | डॉ. अविनाश कदम, डॉ. विजयसिंह लोणकर | २९ |
| ३. | श्री. गौरव अनिलराव खोडे | डॉ. नरेंद्र खोडे, डॉ. राम कुलकर्णी | ३० |
| ४. | श्री. शिवराज रविंद्र मेटकर | डॉ. सतिश मनवर | ३१ |
| ५. | श्री. प्रल्हादराव रामसिंग जाधव | डॉ. म्हाळसाकांत निकम, डॉ. काकासाहेब खोसे | ३२ |

## मत्स्य व्यवसाय


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. साकेत सुरेंद्र देशमुख | डॉ. सत्यजित बेलसरे, श्री. शामकांत शेळके | ३४ |
| २. | श्री. सुनील लखनलाल धनुले | श्री. उमेश सुर्यवंशी | ३५ |
| ३. | श्री. राजेंद्र कन्हैयालाल रासीने | श्री. उमेश सुर्यवंशी | ३६ |
| ४. | श्री. हरीष अमर बिश्वास | डॉ. प्रशांत तेलवेकर, डॉ. राजीव राठोड | ३७ |
| ५. | श्री. किसनलाल चैतु सहादा | डॉ. प्रशांत तेलवेकर, डॉ. राजीव राठोड | ३८ |
| ६. | श्री. गुंडेराव शंकर चौसष्टे | डॉ. अजय कुलकर्णी, डॉ. बालाजी खरटमोल | ३९ |
| ७. | श्री. आलोक नीळकंठ भगत | डॉ. प्रशांत तेलवेकर | ४० |


## वराहपालन


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. गणेश जनार्धन जाधव | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. विठ्ठल धायगुडे | ४२ |
| २. | श्री. लक्ष्मण शिवाजी पवार | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. चंद्रशेखर मोटे | ४३ |
| ३. | श्री. प्रदीप बबन म्हेत्रे | डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. मुकुंद आमले | ४४ |


## प्रक्रिया उद्योग


| अ. क्र. | उद्योजकाचे नाव | मार्गदर्शकांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | श्री. संदीप दिनकर सावंत | डॉ. बापूराव कदम | ४६ |
| २. | श्री. प्रशांत जीवनधर चौगुले | डॉ. बापूराव कदम | ४७ |
| ३. | श्री. पांडुरंग जीवन कोठेवार | डॉ. बापूराव कदम | ४८ |
| ४. | सौ. संध्या लालासाहेब भोसले | डॉ. दिपाली सकुंडे, डॉ. चंद्रकांत भोंग | ४९ |
| ५. | सौ. पद्मजा राहुल कुलकर्णी | डॉ. शितल चोपडे, डॉ. महेश जावळे | ५० |
| ६. | सौ. प्राजक्ता विनोद गेडाम | श्री. शेलेंद्र रेळेकर, श्री. सागर जोशी | ५१ |
| ७. | श्री. अतुल रघुनाथ उनवणे | डॉ. रुपेश वाघमारे, डॉ. संजय लोंढे | ५२ |
| ८. | श्री. विश्वनाथ चंद्रकांत सनगले | डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. माधव पाटील | ५३ |
| ९. | श्री. दत्ता विठ्ठलराव गुरमे | डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. माधव पाटील | ५४ |
| १०. | श्री. प्रविण बाजीराव शिंदे | डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. माधव पाटील | ५५ |
| ११. | समीर मेहताब सय्यद | डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. नितीन शिंदे | ५६ |
| १२. | श्री. संतोष व्यंकटराव पवळे | डॉ. श्रीकांत कल्याणकर, डॉ. माधव पाटील | ५७ |
| १३. | श्री. श्रवण किसन पाटील | श्री. अनिल वाकडे, डॉ. प्रशांत वासनिक | ५८ |

# दुग्ध-व्यवसाय



# माफसू यशोगाथा २०२५

## मुक्त संचार गोठ्याने दिला दुध व्यवसायाला नवा श्वास

# सचिन चिकनकर यांची यशोगाथा



माझे नाव सचिन भाऊरावजी चिकनकर, वय ३२, मूळचा बिना (ता. कामठी, जि. नागपूर) येथील रहिवासी. इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर अनेक पर्याय होते, पण मी नोकरी न करता शेतीला एक स्थिर आणि फायदेशीर जोडधंदा मिळावा म्हणून २०१६ मध्ये दुध व्यवसाय सुरू केला. माझे वडील भाऊरावजी शेती करतात, आई सुनिता गृहिणी आहे, आणि भाऊ नितीन व कमलेश मला व्यवसायात मदत करतात.

### सुरुवात

मी फक्त २ गाईंनी सुरुवात केली. पहिले ३–४ वर्ष पारंपारिक पद्धतीने व्यवसाय केला. मेहनत भरपूर पण उत्पन्न मर्यादित होतं. एकवेळ अशी आली की व्यवसाय चालेल कि नाही, अशी शंका वाटली. याच वेळी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या विस्तार शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अनिल भिकाने सरांचं मार्गदर्शन मिळालं. त्यांनी "मुक्त संचार गोठा" संकल्पना समजावली आणि व्यवसायाला नवी दिशा दिली. सरांच्या सल्ल्यानुसार गोठ्याची रचना बदलली, गाईंच्या हालचालीस मोकळीक दिली, जे त्यांच्या आरोग्यास फायदेशीर ठरलं. या बदलांमुळे दूध उत्पादनात वाढ झाली आणि व्यवसाय अधिक फायदेशीर होऊ लागला.

### मुक्त संचार गोठ्याचा यशस्वी प्रयोग

मुक्त संचार गोठा म्हणजेच जनावरांना मोकळं फिरण्याची, निवास व आराम यासाठी योग्य जागा. यामुळे गाईंच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा झाली, दुध उत्पादनात प्रचंड वाढ झाली आणि कामाचा वेळही निम्मा झाला. सामूहिक मेहनत आणि मार्गदर्शनाच्या जोरावर व्यवसायाने उंच भरारी घेतली. आज माझ्याकडे २३ दुधाळ गाई, ४ भाकड, ९ कालवडी, १० लहान कालवडी , २ म्हशी अशी एकूण ४८ जनावरे आहेत.

### खर्च आणि उत्पन्नाचे गणित

सध्या दररोज २८० लिटर दूध उत्पादन होते, जे वर्षभरात सुमारे ₹३५.७७ लाखांचं उत्पन्न देते. त्यात शेणखत विक्रीतून अजून ₹९०,००० मिळतात, त्यामुळे एकूण वार्षिक उत्पन्न ₹३६.६७ लाखांवर पोहोचतं. दुधाळ जनावरांच्या खुराकासाठी सुमारे ₹१६.४२ लाख, सुका चारा ₹२.६२ लाख, औषधोपचार व खनिज मिश्रण ₹९०,००० आणि कामगार वेतन ₹२.४० लाख इतका खर्च होतो.



त्यामुळे एकूण वार्षिक खर्च ₹२२.३४ लाखांच्या आसपास आहे. हा खर्च वजा केल्यास, निव्वळ वार्षिक नफा सुमारे ₹१४.३३ लाख इतका आहे. याशिवाय, माझ्या २००० लिटर क्षमतेच्या शीतकरण केंद्रामार्फत प्रतिदिन २४०० लिटर दूध संकलित केलं जातं, ज्यातून दरवर्षी ₹६.१३ लाखांचं अतिरिक्त उत्पन्न मिळतं. याव्यतिरिक्त नागपूर जिल्ह्यातील पशुपालक, महिला व तरुणांना सूक्ष्म प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण देतो.

### कुटुंब आणि व्यवस्थापन – यशाचा गाभा

या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी केवळ सुदृढ जनावरेच नाही, तर त्यांच्या व्यवस्थापनात सातत्य आणि शिस्त आवश्यक असते. यात माझ्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. वडिलांची शेतीतील समज, आईचं पाठबळ, आणि भावांचं प्रत्येक टप्प्यावरचं सक्रिय योगदान माझ्यासाठी अमूल्य आहे. आम्ही एक टीम म्हणून काम करतो. गोठ्यातील स्वच्छता, चारा नियोजन, वासरांची निगा, दुधाचे मोजमाप, विक्री आणि नोंद यासाठी योग्य जबाबदाऱ्या वाटून घेतल्या आहेत. त्यामुळे व्यवसायात केवळ वृद्धीच नव्हे, तर समाधानही मिळतं आहे.

### यशाचे श्रेय

आज माझं मासिक उत्पन्न ₹१ लाखाहून अधिक आहे. हे शक्य झालंय कारण मी वेळेवर योग्य निर्णय घेतले, माफसूच्या तज्ज्ञांचं मार्गदर्शन घेतलं आणि सतत नवे प्रयोग करत राहिलो. विशेषतः डॉ. अनिल भिकाने सरांचं मार्गदर्शन या यशामागे महत्त्वाचं ठरलं.

### माझा संदेश

आज मी अभिमानाने सांगू शकतो की, दुग्ध व्यवसाय हा केवळ जोडधंदा नाही, तर माझ्या उत्पन्नाचं मुख्य साधन आणि आत्मविश्वासाचं बळ बनलाय. तरुणांनी धैर्य ठेवून, आधुनिक दृष्टिकोन स्वीकारून शेती व पशुपालनाला नवी दिशा दिली तर यश नक्की मिळेल!

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**डॉ. सारीपुत लांडगे**
प्राध्यापक तथा तांत्रिक अधिकारी
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ७३५०६८६३८०

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**सचिन भाऊरावजी चिकनकर**
रा. बिना, ता. कामठी, जि. नागपूर - ४४१ १०२
संपर्क क्र. ७५०७१४१८२०

माफसू यशोगाथा २०२५

## दुग्ध व्यवसायाने दिली नवी उभारी

# पंडित श्रृंगारे यांची यशोगाथा



मी पंडित बळवंतराव श्रृंगारे, माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले आहे. हिंगोली जिल्ह्यातील टाकळगव्हाण गावचा रहिवासी. आमचं पाच भावंडांचं एकत्र कुटुंब आणि वडिलोपार्जित ४० एकर शेती आहे. पण आमच्या शिवारातून वाहणारी कयाधू नदी ही वरदानापेक्षा शापच ठरली. तिच्या पुरामुळे शेतात उभं पीक रातोरात वाहून जात असे. त्यामुळे सहा वर्ष शेतीत खूप नुकसान सोसावं लागलं.

### दुग्ध व्यवसायाचा निर्णय

या नुकसानातून बाहेर पडण्यासाठी २००७ साली आम्ही दुग्ध व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. फक्त ३५ हजार रुपये गुंतवून दोन संकरित गाई विकत घेतल्या. त्याच दोन गाई आमच्या यशाचा पाया ठरल्या. त्यानंतर जोडधंदा नव्हे तर मुख्य व्यवसाय म्हणून गोपालन करण्याचे मी आणि माझ्या कुटुंबाने ठरवले. सन २०१० पर्यंत १० गाईंचा गोठा तयार झाला, तोही फक्त गाईंच्या दुधातून आलेल्या उत्पन्नावरून! घरून दुसऱ्यांदा भांडवल कधीच घ्यावं लागलं नाही. २०१४ पर्यंत आमच्याकडे २५ गाई होत्या, त्या सुद्धा आमच्याच कालवडीतून तयार झालेल्या. २०१६ पासून आम्ही घरच्याच गाईंची विक्री सुरू केली आणि आजपर्यंत ५० पेक्षा जास्त गाई विकल्या.सध्या ४० गाई-कालवडी मिळून आमचा गोठा सजलेला आहे.

### मुरघास आणि मुक्त गोठा

वैरण विकास हा आमच्या व्यवसायाचा कणा आहे. गेल्या पाच वर्षांपासून दरवर्षी १०० टन मुरघास तयार करतो. २०१६-१७ मध्ये १० गुंठ्यांवर मुक्त गोठा उभारला, जिथे गायी मोकळेपणाने फिरतात. २०१० पासून मिल्किंग मशीन वापरतो आणि २००८ पासून चाफ कटर आमच्याकडे आहे.

### अर्थकारण ठोस – गणित सोपं पण प्रभावी

दररोज २७५ लिटर दूध उत्पादन होते. ₹३४ प्रति लिटर दराने दररोजचं उत्पन्न ₹९३५०, खर्च ₹६४००, म्हणजे निव्वळ नफा ₹२९५० प्रतिदिन. वार्षिक दुग्ध विक्री नफा ₹१०.७६ लाख, गाई विक्रीतून ₹५ लाख मिळून एकूण वार्षिक निव्वळ नफा ₹१५.७६ लाख होतो.



### सेंद्रिय शेती आणि बायोगॅस व्यवस्थापन

आम्ही शेणखत शेतीसाठी वापरतो. चाऱ्याच्या उत्पन्नाइतकंच शेणखत शेतात जातं – एक परिपूर्ण साखळी. २५ वर्षांपासून आमच्याकडे ४ घन मीटरचा बायोगॅस आहे. त्यातील स्लरीचा वापर गांडूळखत निर्मितीसाठी करतो.

### सामाजिक बांधिलकी आणि प्रशिक्षण

आम्ही केवळ व्यवसायापुरतेच मर्यादित नाही, एसबीआय आणि रिसेट मार्फत होणाऱ्या प्रशिक्षणांमध्ये सहभागी शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शन करतो. त्यामुळे समाजासाठी योगदान द्यायला मिळतं, याचा खूप आनंद आहे.

### मार्गदर्शकांचा सल्ला – यशाचा पाया

माफसूचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने सर आणि डॉ. नितीन मार्कंडेय सर यांचं वेळोवेळी मिळालेलं तांत्रिक मार्गदर्शन आमच्या यशात मोलाचं ठरलं. त्यांनी नेहमी आधुनिक तंत्रज्ञान, आहार व्यवस्थापन आणि व्यावसायिक नियोजन यावर भर दिला. सुरुवातीच्या काळात डॉ. लकडे सर आणि डॉ. खेसर सर यांनी पशुवैद्यकीय सेवांमध्ये दिलेलं योगदान आम्हाला सुरवात मजबूत करण्यासाठी महत्त्वाचं ठरलं. आजही, हिंगोली जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. खुणे सर आमच्या व्यवसायाच्या विविध टप्प्यांवर सतत मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या सल्ल्यामुळे आम्ही गोठ्यातील व्यवस्थापन, लसीकरण आणि आरोग्य निगा यात उत्तम सुधारणा करू शकलो.

### माझा संदेश

संकट येतच राहतात. पण जर चिकाटी, प्रयोगशीलता आणि योग्य मार्गदर्शन असेल, तर कोणताही व्यवसाय तुम्हाला यश देतो, हे मी स्वतः अनुभवले आहे. दुग्ध व्यवसाय हा जोडधंदा नाही, तो संपूर्ण उद्योजकतेचा मार्ग आहे.


**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**डॉ. नितीन मार्कंडेय**
माजी सहयोगी अधिष्ठाता
पशुवैद्यक आणि पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
संपर्क क्र. ९४२२६५७२५१

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**पंडित बळवंतराव श्रृंगारे**
मु. टाकळगव्हाण, ता. कळमनुरी, जि. हिंगोली - ४३१ ७०२
संपर्क क्र. - ८३२९१०४४०४

## कुटुंबाच्या साथीने उभा राहिलेला दुग्धव्यवसाय

# प्रशांत भोसले यांची यशोगाथा



मी प्रशांत दिगंबर भोसले, लातूर जिल्ह्यातल्या मातोळा या गावात राहतो. बी.ए. पर्यंत शिक्षण झालेलं असलं तरी, मला नेहमीच स्वतःचा व्यवसाय करायची इच्छा होती. आमचं कुटुंब शेतीवर अवलंबून असलं तरी, मला त्यातून नवीन दिशा शोधायची होती. अशी दिशा जी केवळ शेतीला पूरक नसेल, तर कुटुंबाच्या अर्थकारणाला बळकटी देईल.

### सुरुवात एका भाकड गाईपासून

सन २०११ मध्ये मी या प्रवासाची सुरुवात केली, तीही फक्त एका भाकड गाईपासून. तिला एक वर्ष मन लावून सांभाळलं. तिच्या प्रकृतीचा अभ्यास केला. त्यानंतर दुसऱ्या वर्षी ३ गाई घेतल्या आणि त्यांचं संगोपन करत करत अनुभव वाढवला.

हा व्यवसाय सुरू करताना मी कोणतंही प्रशिक्षण घेतलं नव्हतं. पण आमच्याच गावचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बोरुळे साहेब यांनी मला मोलाचं मार्गदर्शन दिलं. प्राथमिक उपचार, जनावरांचं निरीक्षण... हे सर्व मी त्यांच्याकडून शिकत गेलो.

### कर्ज, जोखीम, आणि उभारी

सन २०१२–१३ मध्ये, मी सांगोला आणि बार्शी येथून ९ गाई घेतल्या. उस्मानाबाद जनता बँकेकडून ₹३५ लाखांचं कर्ज मिळाले. आज माझ्याकडे ३५ x ८० फुटांचं शेड, ८० x १२० फुटाचा मुक्त संचार गोठा, मिल्किंग मशीन, कडबाकुट्टी मशीन, स्वच्छतेसाठी शेण व मूत्र साठवण्यासाठी स्वतंत्र खड्डा आणि मड पंप व्यवस्था या सगळ्या गोष्टींचं चोख व्यवस्थापन आहे. आज मी ४९ गाईंचं पालन करतो. यापैकी ४० गाई माझ्या घरीच तयार केलेल्या आहेत. तसंच, आतापर्यंत मी १५–२० गाई विकल्या सुद्धा आहेत.

### माझे कुटुंब – माझे बळ

या व्यवसायात माझा बंधू प्रविण माझ्यासोबत दिवस-रात्र मेहनत करतो. त्याचप्रमाणे एक बिहारी कामगारही गोठ्यावर काम करतो. आमचं एकत्र कुटुंब, चिकाटी आणि टीमवर्क, हेच या व्यवसायाचे खरे बळ आहे.



### उत्पादन आणि आर्थिक चित्र

२३ गाई दुध देणाऱ्या, ५ गाई आटवलेल्या, ५ गाभण कालवडी, ४ मोठ्या कालवडी व ७ लहान कालवडी अशी माझ्याकडील जनावरांची विभागणी आहे. दैनंदिन दूध उत्पादन ३८०–४०० लिटर आणि दूध विक्री उत्पन्न ₹१२,५०० – ₹१३,५०० प्रतिदिन तर दैनंदिन खर्च ₹८,५०० – ₹९,००० व सरासरी वार्षिक उत्पन्न ₹१५ लाखांपेक्षा जास्त आहे.

### मार्गदर्शनातून उभारीचं बळ

व्यवसाय वाढत असताना, अनुभवी डॉक्टरांची कमतरता नेहमी जाणवत होती. पण अशाच वेळी डॉ. अनिल भिकाने सर ( संचालक, विस्तार शिक्षण, माफसू नागपूर) यांनी वेळोवेळी मला प्रेरणा आणि पाठिंबा दिला. त्यांचं कौतुकाचं एक वाक्य मला नवा आत्मविश्वास देऊन जातं.

### यशस्वी उद्योजक म्हणून ओळख

मागील १२ वर्षांपासून मी हा व्यवसाय नेटाने करत आहे. प्रामाणिकपणे, शुद्ध दूध दिल्यामुळेच ग्राहकांचा विश्वास मिळवता आला. आज माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला मी हेच सांगतो की, "दुग्ध व्यवसाय हा केवळ जोडधंदा नाही, तर मुख्य व्यवसाय होऊ शकतो जर तो अभ्यासपूर्वक, जबाबदारीने आणि निष्ठेने केला तर!"

### माझा संदेश

या व्यवसायात यायचं असेल, तर फक्त नफ्याच्या आकड्यांवर लक्ष न देता, जनावरांचं आरोग्य, चारा, औषध, व्यवस्थापन, वेळ या सगळ्याच घटकांचा विचार करा. माझं यश हे माझा बंधू प्रविण, माझा जिवलग बंधुसमान सहकारी शशिकांत चव्हाण आणि माझ्या मार्गदर्शकांच आहे. एकीचं बळ हेच या यशाच्या प्रवासाचं खरं गमक आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**डॉ. विश्वास सांळुके**
प्राध्यापक तथा उपसंचालक संशोधन
क्रांतीसिह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९४२२८७८५७२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रशांत दिगंबर भोसले**
मु. पो. मातोळा, ता. औसा, जि. लातूर - ४१३ ५२०
संपर्क क्र. ९८६०१८१२१२

एका गायीपासून स्वप्नांची भरारी

# विजय बारकुल यांची यशोगाथा



माझे नाव विजय बाबासाहेब बारकुल असून मी येरमाळा, ता. कळंब, जि. धाराशिव येथे राहतो. वय २८ वर्षे, शिक्षण बी.सी.एस. (Bachelor of Computer Science) पर्यंत झाले आहे. वडील बाबासाहेब प्रल्हाद बारकुल (नोकरीत), आई सत्यभामा बाबासाहेब बारकुल ( गृहिणी) आणि भाऊ प्रशांत बाबासाहेब बारकुल ( दुग्ध व्यवसायात मदतीला) हे माझं कुटुंब. आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी दुग्ध व्यवसाय सुरु करायचं ठरवलं. गावात आणि आसपासच्या भागात यशस्वी शेतकऱ्यांना पाहून प्रेरणा मिळाली.

## व्यवसायाचा प्रवास आणि वाढ

दुधाचा व्यवसाय जानेवारी २०१७ मध्ये एका गायीपासून सुरू केला. वडिलांकडून दोन लाख रुपये घेतले, साधा गोठा बांधला. हळूहळू गोठ्यातील गायी वाढवत नेल्या. दिवसेंदिवस नवनवीन कल्पना सुचल्या. मिळालेल्या पैशातून कडबा कुट्टी मशीन, धाराची मशीन, मॅट्स, एसटीपी स्प्रे वगैरे चांगल्या सुविधा उभ्या केल्या.

## नवे प्रयोग व व्यवस्थापन

गोठा हवेशीर ठेवण्यावर भर दिला. जनावरांच्या पोषणासाठी स्वतःच्या शेतात एक एकर जमिनीत चारा लागवड केली सुपर नेपियर गवत अर्ध्या एकरात आणि मका-ज्वारी अर्ध्या एकरात लागवड केली. सायलेज व मुरघास तयार करून चाऱ्याची व्यवस्था केली. सर्व जनावरांसाठी संतुलित आहाराचे वेळापत्रक आखून त्यानुसार व्यवस्थापन सुरू केले. सध्या माझ्या गोठ्यात १० गायी आणि २ कालवडी आहेत.

## व्यवसायातील चढउतार

व्यवसायात अनेक अडचणी आल्या, पण जिद्दीने आणि योग्य व्यवस्थापनाने त्यावर मात केली. ऋतुमान बदलाचे परिणाम सांभाळले. नियमित पशु वैद्यकीय तपासणी आणि योग्य उपचार केल्यामुळे जनावरांची तब्येत चांगली ठेवता आली. स्वच्छता आणि संतुलित आहारामुळे दूध उत्पादन व गुणवत्ता वाढली. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत विश्वासार्हता निर्माण झाली आणि व्यवसाय अधिक बळकट झाला.



## खर्च आणि उत्पन्न

आम्हाला दररोज सुमारे १५० लिटर दूध उत्पादन होते. त्यापैकी ७० लिटर दूध स्वतःच्या दूध विक्री केंद्रातून ४० रुपये प्रतिलिटर दराने ग्राहकांना थेट विकतो. उर्वरित दूध 'सह्याद्री कंपनी'च्या संघाला ३२.४० रुपये प्रतिलिटर दराने विकतो. दररोज ५४०० रुपये उत्पन्न मिळते. त्यातील ५०% रक्कम पशुखाद्य, मिनरल मिक्स्चर यासाठी जाते. दूध विक्री केंद्रामुळे शुद्ध, भेसळमुक्त दूध ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतं.

## मार्गदर्शन आणि महत्व

गावातील तज्ञ शेतकऱ्यांकडून आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून भरपूर मार्गदर्शन मिळालं. श्री. कुणाल घुंगार्डे (प्रक्षेत्र व्यवस्थापक) यांनी दूधाच्या शुद्धतेबाबत माहिती दिली. डॉ. शिवकुमार यंकम यांचं सतत मार्गदर्शन लाभलं. त्यांनी जनावरांचे आजार लवकर ओळखून तातडीने उपचार करण्याचं महत्त्व शिकवलं.

डॉ. अनिल भिकाने सरांनी गोठ्याला दोन वेळा भेट देत कालवड पैदास, खनिज मिश्रण, दूध वाढीसाठी पशुआहार यावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या सुचनामुळे फॅट वाढले आणि उच्च अनुवंशिकतेच्या कालवड पैदाशीवर भर देतोय. गोचीड निर्मूलन, लसीकरण यावर मार्गदर्शन लाभले. भविष्यात २० गाईंचा मुक्त गोठा उभारण्याचे नियोजन आहे. २९ जून २०२३ रोजी ढोकी, ता. धाराशिव येथे डॉ. भिकाने सरांच्या हस्ते माझा सत्कार झाला.

## कुटुंबीयांचा व मित्रांचा पाठींबा

या यशामध्ये माझ्या भावाचा खूप मोठा हातभार आहे. वडील, आई, शेजारी आणि मित्र मंडळींनी नेहमीच साथ दिली. त्यांनी दिलेला आधार हीच माझ्या यशाची खरी उर्जा आहे.

## माझा संदेश

या व्यवसायात यश एका दिवसात मिळत नाही. पण जर चिकाटीने प्रयत्न केला, स्वतःवर विश्वास ठेवला, तर एक दिवस नक्कीच यशस्वी होऊ शकता. त्यामुळे नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय उभा करा, कुटुंबाला आर्थिक बळ द्या.

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**विजय बाबासाहेब बारकुल**
रा. येरमाळा, ता. कळंब, जि.धाराशिव - ४१३ ५२५
संपर्क क्र. ७८८७५८३४६५

## जिद्द, प्रयत्न आणि सातत्य यातून साधला समृद्धीचा दुवा

# अजित देशमुख यांची यशोगाथा



मी अजित जगन्नाथ देशमुख, ढोकी, तालुका धाराशिव येथील रहिवासी. शिक्षण पदवीपर्यंत घेतलं आहे. आमचं कुटुंब पारंपारिक शेती करतं, पण आर्थिक स्थिती खूपशी स्थिर नव्हती. वडील कै. जगन्नाथ नानासाहेब देशमुख आणि आई ग. भा. काशीबाई जगन्नाथ देशमुख यांचं मार्गदर्शन आणि संस्कार लाभले. लॉकडाऊनच्या काळात, शेतीसाठी गावाकडे स्थायिक झाल्यानंतर मनात एक विचार सुरू झाला, "शेतीला जोडधंदा हवा." त्यातूनच दुग्ध व्यवसायाची सुरुवात झाली. सुरुवातीला एक गाय घेतली आणि तिचं संगोपन सुरू केलं. अनुभव घेतला, दूध आणि शेणखत दोन्ही मिळत होतं. यातून प्रेरणा घेत गाईंची संख्या हळूहळू वाढवत नेली.

## मार्गदर्शनातून मिळाली दिशा

प्रत्येक व्यवसायात अडचणी येतात. गायी आजारी पडणं, खर्च वाढणं, नुकसान होणं – हे सगळं अनुभवलं. मात्र, मी न डगमगता ठरवलं – "दुग्ध व्यवसायात यश मिळवायचंच." यात मला खूप मोठा आधार मिळाला ढोकी पशुवैद्यकीय केंद्राचे डॉ. नागरगोजे साहेब यांचा. त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केलं, उपचाराची मदत केली. ढोकीचे सुपुत्र श्री. कुणाल जीवनराव घुंगार्डे यांनीही मोलाचं सहकार्य केलं. त्यांच्या मदतीने मी ढोकी गावात दुग्ध व्यवसायावर डॉ. भिकाने सरांचा एक मार्गदर्शन कार्यक्रम घेतला.

या कार्यक्रमामुळे केवळ मलाच नाही, तर गावातील इतर शेतकऱ्यांनाही नव्याने दिशा मिळाली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर येथील विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने सर यांचं प्रत्यक्ष गोठ्यास भेट देऊन मिळालेलं मार्गदर्शन. त्यांनी व्यवसाय कसा वाढवावा, कोणत्या तंत्रांचा उपयोग करावा याविषयी मोलाचं मार्गदर्शन केलं. त्यांच्या अनुभवाचा मला मोठा फायदा झाला. त्यांच्या भेटीनंतरच व्यवसायाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलला आणि योजनाबद्ध मार्गाने प्रगतीला गती मिळाली.

## व्यवसाय वृद्धी आणि व्यवस्थापन

गायींचं संगोपन सुरूच होतं. कालांतराने मी गाईंची संख्या १२ पर्यंत नेली. त्यांच्यापासून १३ ठणठणीत कालवडी तयार झाल्या आहेत. रोज सरासरी १०० लिटर दूध मिळतं. दूधासोबतच शेणखताचं वर्षभरात



४० ट्रॅक्टर एवढं उत्पादन होतं, जे शेतीत वापरल्यामुळे रासायनिक खताचा खर्च वाचतो आणि जमीन सुपीक राहते. मी गोठा व्यवस्थित ठेवतो, सकस खुराक, चारा, स्वच्छता, वेळेवर लसीकरण या सगळ्या गोष्टी काटेकोरपणे पाळतो.

## आर्थिक चित्र – स्पष्ट आणि प्रभावी

सध्या माझ्या गोठ्यातील १२ गायींकडून दररोज सरासरी १०० लिटर दूध उत्पादन होते. या दूधाची सरासरी विक्री किंमत ₹३५ प्रति लिटर आहे. वर्षभरात मिळणाऱ्या दुधाच्या विक्रीतून एकूण ₹१२,७७,५०० इतके उत्पन्न मिळते. यासोबतच शेणखताचेही उत्पन्न आहे. वर्षभरात सुमारे ४० ट्रॅक्टर शेणखत मिळते, ज्याचे अंदाजे बाजारमूल्य ₹६,००० प्रति ट्रॅक्टर मानल्यास त्यातून ₹२,४०,००० इतका अतिरिक्त आर्थिक लाभ मिळतो. याप्रमाणे दुधाच्या विक्री आणि शेणखताच्या मूल्याच्या एकत्रित उत्पन्नाचे वार्षिक एकूण गणित ₹१५,१७,५०० इतके होते.

## नफ्याचे गणित

पशुखाद्यावर सुमारे ₹५,११,०००, हिरव्या व कोरड्या चाऱ्यावर ₹१,००,००० आणि मजुरांच्या वेतनावर ₹१,५०,००० इतका वार्षिक खर्च होतो. अशा प्रकारे एकूण खर्च ₹७,६१,००० असून, निव्वळ नफा ₹७,५६,५०० इतका मिळतो. हा नफा केवळ आर्थिक नव्हे, तर आत्मविश्वास व समाधानी जीवनशैलीचाही आधार आहे.

## कृतज्ञता आणि प्रेरणा

माझ्या या यशात डॉ. अनिल भिकाने सर, डॉ. नागरगोजे साहेब, आणि कुणाल घुंगार्डे सर यांचं मोलाचं मार्गदर्शन आहे. त्यांनी केवळ तांत्रिक सल्ला दिला नाही, तर मानसिक आधारही दिला.

## माझा संदेश

मी ठामपणे सांगतो की, गोपालन हा नुसता व्यवसाय नाही, तो एक स्थिर आणि संधींनी युक्त असा मार्ग आहे. योग्य मार्गदर्शन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जिद्द असेल, तर या व्यवसायात नक्कीच मोठे होता येते.

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**

संचालक, विस्तार शिक्षण

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**अजित जगन्नाथ देशमुख**

रा. ढोकी, ता. - जि. धाराशिव - ४१३ ५०८

संपर्क क्र. ८६६८८९०९०४

# प्रजनन तंत्र हीच यशस्वी दुग्धव्यवसायाची गुरुकिल्ली
# रामचंद्र शिंदे यांची यशोगाथा



मी रामचंद्र तात्याराव शिंदे, बीड जिल्ह्यातील होळ गावचा. वय ६६ वर्ष. सन १९९० साली एका गाईपासून माझा दुग्ध व्यवसाय सुरू झाला.त्यावेळी पाहुण्यांनी दिलेली एक संकरीत कालवड माझ्याकडे होती. पण खरी गती आली २००९ साली, जेव्हा मी वसुंधरा दूध उत्पादक संघ, अंबेजोगाई यांच्यामार्फत दूध संकलन सुरू केलं.

## टर्निंग पॉईंट

सन २०१८ साली, उदगीर पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालयामार्फत आमच्या गावात प्रा. डॉ. अनिल भिकाने (वर्तमान - संचालक, विस्तार शिक्षण, माफसू नागपूर) सरांचं व्याख्यान झालं. त्यातून मला मुक्त संचार गोठा उभारण्याची प्रेरणा मिळाली.

## व्यवसायाची सद्यस्थिती

आज माझ्याकडे १२ गायी व ६ संकरीत कालवडी आहेत. मी मुक्त गोठा, मिल्किंग मशीन, चाफ कटर यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतो. मी दररोज ९५ ते १०० लिटर दूध उत्पादन घेतो. दूध संकलन नॅचरल डेअरी रांजणी या नामांकित डेअरीमार्फत होतं. माझ्या संकलन केंद्रातून दररोज १००० लिटरपेक्षा जास्त दूध संकलित केलं जातं.

## चारा व्यवस्थापन

मी ४ एकर जमिनीत चारा उत्पादन करतो. त्यात ज्वारी कडबा, सोयाबीनचा भुस्सा, हरभऱ्याची गोळी, गिन्नी गवत यांचा समावेश आहे. सर्व चारा घरचाच असल्याने खर्च कमी आणि दर्जा चांगला राहतो. यामुळे गाईंचे आरोग्य टिकून राहते आणि दूध उत्पादनातही सातत्य दिसून येते. स्वतःच चारा उत्पादन करीत असल्यामुळे बाजारावर अवलंबून राहावं लागत नाही.

## आर्थिक गणित सोपं आणि नफा पक्का

मी दररोज सुमारे १०० लिटर दूध विकतो, ज्यातून प्रतिदिन ₹३,१०० व महिन्याला ₹९३,००० उत्पन्न मिळतं. यासाठी दररोज पशुखाद्य, मजुरी व वीज यांचा ₹२,००० इतका खर्च येतो, म्हणजे मासिक खर्च ₹६०,००० आणि निव्वळ नफा ₹३३,००० राहतो.



याव्यतिरिक्त, वर्षभरात दोन गाई विकून ₹२,००,००० व शेणखताच्या २० ट्रॉली विकून ₹७०,००० मिळवतो. या सर्वांचा एकत्रित विचार करता, दुग्ध व्यवसायातून वर्षभरात समाधानकारक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पन्न मिळतं.

## पुरस्कार व सन्मान

मी प्रजनन व्यवस्थापनावर विशेष भर देतो. गाईंची वाढ, गाभण वेळ, आणि कालवडींचा दर्जा हे सगळं योग्य तंत्र आणि अनुभवानं साध्य केलं. आज माझ्या गोठ्यात कालवडीचे तिन वयोगट आहेत , आणि उत्तम कालवडीची पैदास ही फायदेशीर ठरत आहे. त्यामुळे मला नॅचरल डेअरी तर्फे दोन वेळा प्रथम व दोन वेळा द्वितीय पुरस्कार मिळालेत. डॉ. अनिल भिकाने सरांनी ९ जून २०२३ ला गोठ्याला भेट दिली, कौतुकाची थाप दिली. त्याच महिन्यात २८ जून २०२३ रोजी त्यांच्या हस्ते "उत्कृष्ट पशुपालक पुरस्कार" मिळाला, हे माझ्या आयुष्यातील अत्यंत अभिमानाचे क्षण होते.

## यशाचे श्रेय

माझ्या या प्रवासात प्रा. डॉ. अनिल भिकाने सरांचं मार्गदर्शन मला प्रत्येक टप्प्यावर लाभलं. प्रविण शिंदे (पशुधन पर्यवेक्षक, नेकनुर) यांनीही वेळोवेळी मदत केली. यांच्या सहकार्यामुळेच आज मी एक यशस्वी पशुपालक म्हणून समाजात ओळख कमावली आहे.

माझ्या गोठ्याला बीड, लातूर, धारूर आणि परभणी परिसरातील अनेक शेतकरी भेट देतात. मी त्यांना मुक्त संचार गोठा, प्रजनन नियोजन, दूध व्यवस्थापन आणि चारा पद्धती यासंबंधी मार्गदर्शन देतो. जे काही अनुभव मी मिळवले, ते समाजासाठी उपयोगात यावेत, हीच भावना माझ्या कार्यामागे आहे.

## माझा संदेश

दुग्ध व्यवसाय हा केवळ जनावरं वाढवण्याचा नव्हे, तर शास्त्र शुद्ध व्यवस्थापन, चिकाटी, आणि प्रामाणिकपणा यांचा मिलाफ आहे. योग्य मार्गदर्शन घेऊन, नव्या तंत्रज्ञानाची मदत घेतल्यास तरुणही यात यशस्वी होऊ शकतात.

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**रामचंद्र तात्याराव शिंदे**
होळ, ता. केज, जि. बीड - ४३१ १२३
संपर्क क्र. ८३०८७९९४०४

## आधुनिक दृष्टिकोनातून यशाचा मार्ग
# विशाल लहाने यांची यशोगाथा



माझं नाव विशाल सुधाकर लहाने. मूळचा अंधापुरी घाट, ता. नेकनूर, जि. बीड येथील. मी डेअरी डिप्लोमा पूर्ण केला आहे. वडील सुधाकर ज्ञानोबा लहाने, आई उषाबाई सुधाकर लहाने आणि भाऊ स्वप्निल सुधाकर लहाने हे माझं कुटुंब. लहान वयातच इतरांचे दुग्ध व्यवसाय पाहून माझ्या मनातही दुग्ध व्यवसाय करण्याची आवड निर्माण झाली. लोकांचा गायी खरेदीपासून खुराक, चारा, मजुरी अशा सगळ्या खर्चाचा हिशोब पाहिला आणि उरणारा नफा पाहून मी भारावलो. तेव्हाच ठरवलं, आपणही हा व्यवसाय करायचाच!

## व्यवसायाची सुरुवात

आई-वडील जुनी पद्धत वापरून दुग्ध व्यवसाय करत होते, ज्यात खूप कष्ट होते पण नफा फारसा नव्हता. तेव्हा मी ठरवलं, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दुग्ध व्यवसायात यश मिळवायचं. इंजिनीअरिंग शिकत असताना लॉकडाऊनमध्ये घरी आलो आणि शिक्षणाऐवजी दुग्ध व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. घरातले आणि गावातले मोठे लोक विरोध करत होते. 'दुग्ध व्यवसायात फारसा फायदा नाही, शिक्षणावर लक्ष द्या' असा सल्ला मिळत होता. पण मी हट्टाने चार गाई घेतल्या. त्यासाठी माझ्या खव्याची भट्टी चालवणाऱ्या मामांकडून उचल घेतली.

## नवे प्रयोग व व्यवस्थापन

मी दूध थेट डेअरीला न देता खवा तयार करायला सुरुवात केली. रोज ३० लिटर दूध खव्यात रूपांतरित केलं तर डेअरीपेक्षा जास्त नफा मिळाला. डेअरीकडून फक्त ९०० रुपये मिळाले असते, पण खव्यातून १२०० रुपये मिळाले.

माफसू विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अनिल भिकाने सरांनी गोठ्याला भेट देऊन अत्यंत मोलाचं मार्गदर्शन केलं. त्यांच्यामुळे मिनरल मिक्स्चरचा वापर वाढवला. त्यामुळे सुरुवातीला दूधाचे उत्पादन वाढले, दर्जा सुधारला आणि एस.एन.एफ. व फॅट वाढले. सॉर्टेड सिमेनचा वापर करून उत्तम कालवडी तयार केल्या आणि वंश सुधारला. समतोल आहार आणि पोषक चारा वापरल्यामुळे गाई कमी आजारी पडू लागल्या.



## व्यवसायातील चढउतार

सुरुवातीला घरचा व गावकऱ्यांचा विरोध होता, पण ठाम राहिलो. चार गायींच्या सुरुवातीतून आठ गायींपर्यंत आलो आहे. आज दैनंदिन ११० ते १२० लिटर दूध मिळतं. रोज ३० किलो खवा तयार होतो आणि दिवसाला साधारण १२०० रुपये मिळतात.

## खर्च आणि उत्पन्न

दररोज खुराक व मिनरल मिक्स्चरचा खर्च वगळता मला ५०० ते ६०० रुपये निव्वळ नफा राहतो. हा व्यवसाय अजून वाढवण्याचा मी निर्धार केला आहे. म्हणजे गाईंची संख्या वाढवली नाही तरी उत्पादन दुप्पट करण्याचा माझा प्रयत्न सुरू आहे.

## मार्गदर्शन आणि महत्व

गुरुवर्य डॉ. अनिल भिकाने सर (संचालक, विस्तार शिक्षण, माफसू नागपूर) यांचं अमूल्य मार्गदर्शन लाभलं. त्यांनी व्यवसायाला केवळ आर्थिक उपक्रम म्हणून न पाहता, शाश्वत व वैज्ञानिक दृष्टिकोनातून विकसित करण्याची दृष्टी दिली. त्याचबरोबर प्रवीण शिंदे सर (पशुधन पर्यवेक्षक, नेकनूर) यांनी लसीकरण, कृत्रिम रेतन, उपचार आणि गोठ्याचं आरोग्य व्यवस्थापन याबाबत वेळोवेळी महत्त्वाचं मार्गदर्शन केलं.

## कुटुंबीयांचा व मित्रांचा पाठींबा

आई-वडीलांचा जुना अनुभव आणि मामांनी वेळोवेळी केलेली मदत माझ्या प्रवासात मोलाची ठरली. गावकऱ्यांचा जरी सुरुवातीला विरोध होता, तरी आता यश पाहून तेही पाठीशी उभे आहेत.

## माझा संदेश

लॉकडाऊनच्या काळात हा व्यवसाय सुरु करण्याच्या निर्णयाचं आज मला मोठं समाधान आहे. मी सांगू इच्छितो की, संकटं येतात, विरोध होतो, पण जर स्वतःवर विश्वास ठेवलात आणि आधुनिक पद्धतीने काम केलंत तर दुग्ध व्यवसायातून देखील मोठं यश मिळवता येतं. तरुणांनी नवे प्रयोग करायला घाबरू नये, चिकाटीने प्रयत्न केल्यास यश निश्चितच मिळतं.

**मार्गदर्शक**
**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**
**विशाल सुधाकर लहाने**
अंधापुरी घाट, ता. - जि. बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. ७३५०५८४९३५

उत्कृष्ट कालवड संगोपन हीच यशस्वी दुग्धव्यवसायाची गुरुकिल्ली

# ज्ञानोबा जगताप यांची यशोगाथा



मी ज्ञानोबा भीमराव जगताप, मूळचा अंधापुरी घाट, जिल्हा बीड येथील. शिक्षण एच.एस.सी. पर्यंत पूर्ण केलं. आमचं घर शेतीवर अवलंबून होतं, आणि त्यामुळे साहजिकच दुग्धव्यवसायाकडे वळलो. पण ही वाट सोपी नक्कीच नव्हती.

## सुरुवात गाईपासून, शिकवण मार्गदर्शनातून

माझ्याकडे सुरुवातीला काही मध्यम प्रतीच्या गाई होत्या. दुग्ध व्यवसाय करत होतो, पण गायी गाभण राहणे एवढाच उद्देश असे. कालवड मिळाली तर सांभाळू असा पद्धतीशीर विचारच नव्हता. मग आदरणीय डॉ. अनिल भिकाने सरांनी (संचालक, विस्तार शिक्षण, माफसू नागपूर) आमच्या गोठ्याला भेट दिली, आणि माझं विचारविश्वच बदललं. त्यांच्या मार्गदर्शनाने मला प्रजनन व्यवस्थापन, वासरू संगोपन आणि गुणवत्ताधारित निर्धारित वीर्यमात्रा वापराबाबत प्रेरित केलं.

## चांगल्या वळूची निवड

माझ्या प्रजनन धोरणात आमूलाग्र बदल झाला. फक्त गाभणपणा नव्हे तर उत्तम वंशावळीला प्राधान्य दिलं. प्रवीण शिंदे सरांनी वळूची निवड कशी करावी, रेतन आणि संबंधित विषयाबाबत अन्य माहिती इंटरनेटवर कशी शोधायची ते शिकवले. त्यामुळेच आज माझ्याकडील गाईंची संख्या वाढलेली असून, जवळपास सर्वच गाई घरच्या कालवडीतून तयार झालेल्या आहेत. बाजारातून गाई आणायची गरज उरलेली नाही, त्यामुळे खर्चही वाचतो, आणि फसवणुकीपासूनही सुटका मिळते.

## संगोपन, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान

वासरू संगोपनासाठी वेगळं लक्ष दिलं. गाईंच्या जीवनचक्रानुसार खुराक देण्याचं शास्त्र मी आत्मसात केलं. मिल्किंग मशीन वापरण्याची सुरुवात केली, जे माझ्यासाठी वेळ आणि शारीरिक श्रम वाचवणारं साधन ठरलं. आज दररोज १२० लिटर दूध मिळतं. सध्या प्रति लिटर ₹३४ प्रमाणे सुमारे ₹४,००० पर्यंत उत्पन्न मिळतं. दैनंदिन खर्च वजा जाता ₹२,००० नफा राहतो.



## वार्षिक नफ्याचे गणित

दुधाच्या दरात चढ-उतार नेहमीच असतो. परंतु, माझं खरं गणित गाई विक्रीवर आधारित आहे. नव्या कालवडी दुधात आल्यावर जुन्या गाई विकून दरवर्षी ₹७०,०००–₹७५,००० दराने २-३ गाई विक्री करतो, ज्यातून ₹२.५ लाखांपर्यंत अतिरिक्त नफा मिळतो. या उत्पन्नामुळे व्यवसाय सतत वाढवत ठेवण्याची क्षमता मिळाली.

## कुटुंबाची साथ – यशाचा आधार

माझ्या यशामागे माझ्या कुटुंबाची मोठी भूमिका आहे. सुरुवातीला आर्थिक अडचणींमुळे अनेक वेळा खचून गेलो, पण पत्नीने मानसिक आधार दिला आणि प्रत्येक निर्णयात मला ठामपणे पाठिंबा दिला. मुलांनीही गोठ्याचं काम अंगावर घेतलं आणि माझ्या गैरहजेरीत गोठ्याची जबाबदारी निभावली.

आमचे हे सामूहिक प्रयत्नच माझ्या यशामध्ये अधोरेखित आहेत. व्यवसाय फक्त एकट्याने चालत नाही, कुटुंबाची साथ असल्यास तो फुलतो, हा माझा अनुभव आहे.

## यशाचे श्रेय

माझ्या या प्रवासात डॉ. अनिल भिकाने सरांचं मार्गदर्शन मोलाचं ठरलं. त्यांनी नेहमी व्यवसायाला वैज्ञानिकदृष्ट्या पाहण्याची दृष्टी दिली. त्याचबरोबर प्रवीण शिंदे सरांनी प्रजनन तंत्रज्ञान, वासरू संगोपन आणि सॉर्टेड सिमेनच्या वापराबाबत वेळोवेळी दिलेली माहिती माझ्या यशाचा आधार आहे.

## माझा संदेश

दुग्ध व्यवसाय फक्त गाई विकत आणून सुरू होत नाही. योग्य नियोजन, प्रजनन व्यवस्थापन आणि नवनवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यासच हे यश शक्य होतं आणि मी ते करून दाखवलं आहे. बेरोजगारीवर मात करण्यासाठी हेच माझं तरुणांना आवाहन आहे.

आज माझा आत्मविश्वासच माझे सर्वात मोठे भांडवल आहे. माझा गोठा म्हणजे फक्त व्यवसायाची जागा नाही, तो माझ्या जिद्दीचा आणि सातत्याचा पुरावा आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. अनिल भिकाने**
संचालक, विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
संपर्क क्र. ९४२०२१४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**ज्ञानोबा भीमराव जगताप**
अंधापुरी घाट, ता. - जि. बीड - ४३१ १२२
संपर्क क्र. ९८२३१९७६१३

दुग्ध व्यवसायातून घेतली नवी भरारी

# मोहसीन सुलतान खान मोकाशी यांची यशोगाथा



मी मोहसीन सुलतान खान मोकाशी, सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातल्या सुरूर गावात राहतो. बारावी पर्यंत विज्ञान शाखेचं शिक्षण घेतलं, पण आधीपासून ठरवलेलं नोकरी नाही करायची. शेती आणि शेतीपूरक व्यवसाय हेच माझं ध्येय होतं.

## सुरवात आणि अडचणी

सप्टेंबर २०१७ मध्ये स्वतःच्या भांडवलातून दुग्ध व्यवसाय सुरू केला. सांगोला बाजारातून ३.७ लाख रुपये खर्चून चार संकरित एच. एफ. गाई घेतल्या आणि ४.५ लाख खर्चून ५०x२५ फूट गोठा उभारला. मात्र सुरुवातीपासूनच दुध उत्पादन कमी, गाई आजारी, वासरांना जंत, उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई आणि कोरोना काळात दूध विक्री थांबली, अशा अडचणींचा सामना करावा लागला.

## टर्निंग पॉईंट

मार्च २०२१ मध्ये मी शिरवळच्या क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयात डॉ. गोकुळ सोनवणे सरांना भेटलो. त्यांचं मार्गदर्शन आणि प्रशिक्षण घेतलं आणि ठरवलं पारंपारिक नाही, शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवसाय करायचा.

## व्यवस्थापनात बदल

सन २०२२ मध्ये १०० x ४२ फूट आधुनिक गोठा बांधला, २० गुंठ्याचा मुक्त संचार भाग व १ एकर कुंपणयुक्त जागा विकसित केली. फॉगर सिस्टम व मोकळ्या गोठ्यामुळे गाईंचं आरोग्य सुधारलं आणि मजूरांवरचा ताण कमी झाला. मी वर्षभरासाठी १२० टन मुरघास तयार करतो. त्यामुळे चारा खर्चही कमी होतो.

## तांत्रिक कौशल्य आणि कुटुंबाची साथ

दूध काढण्याचं यंत्र, नवजात वासरांना दुध पाजण्यासाठी बाटली वापरणं, ठराविक वेळापत्रक या सगळ्याचा मोठा फायदा झाला. माझं कुटुंब आणि एक मजूर जोडपं या कामात सहभागी आहेत. माझी पत्नी अंजूम (बी.कॉम) या आर्थिक व्यवहार कुशलतेने हाताळतात. त्यामुळे मला खूप मदत होते.



## सेंद्रिय खताचा वापर व इंधन बचत

वर्षभरात ३० ट्रॉली शेणखत तयार होतं, जे शेतीत वापरून खताचा खर्च ८०% पर्यंत वाचतो. बायोगॅस युनिटमुळे स्वयंपाकाच्या इंधनात बचत होते. त्यातून निर्माण होणाऱ्या स्लरीचा उपयोग खत म्हणून होतो, ज्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते.

## आकड्यांची भाषा

सध्या माझ्या गोठ्यात २२ संकरित गाई, ६ कालवडी, ३ म्हशी, २ खिल्लार गाई आणि १ खोंड आहेत. दररोज सुमारे १६० लिटर दूध विक्रीतून मला ₹५,१२० इतकं उत्पन्न मिळतं. वर्षभरात कालवडी विक्रीतून सुमारे ₹९ लाख तर एकूण वार्षिक उत्पन्न ₹२७.६८ लाख इतकं होतं. यामध्ये एकूण खर्च ₹१२.६४ लाख असून, निव्वळ नफा सुमारे ₹१५.०४ लाख मिळतो.

## भविष्यातला संकल्प – १०० गाईंचा गोठा

आता माझं स्वप्न आहे, २५ लिटर/गाई सरासरी उत्पादन देणाऱ्या १०० गाईंचा गोठा उभारायचा. त्यासाठी मी उत्तम जातींचं वीर्य वापरतो आणि उत्तम कालवडींची पैदास करतो.

## यशाचे श्रेय

या प्रवासात डॉ. सोनवणे सर, डॉ. विश्वास साळुंके सर आणि क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ यांचं मार्गदर्शन अमूल्य ठरलं. मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

## माझा संदेश

कोणतीही नोकरी केली असती, तरी कदाचित इतकं समाधान आणि आर्थिक सुबत्ता व यश मिळालं नसतं. आधुनिक तंत्रज्ञान, वेळेवर मार्गदर्शन आणि चिकाटी असेल, तर दुग्ध व्यवसायात अफाट संधी आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. विश्वास सांळुके**
प्राध्यापक तथा उपसंचालक संशोधन
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९४२२८७८५७२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**मोहसीन सुलतान खान मोकाशी**
मु. पो. सुरूर, ता. वाई, जि. सातारा - ४१५ ५१७
संपर्क क्र. ९५२८७१२७१२

माफसू यशोगाथा २०२५

दुग्ध व्यवसायातून मी घडवलं यशस्वी करिअर

# शुभम शिनगारे यांची यशोगाथा

मी शुभम दत्तात्रय शिनगारे. सांगली जिल्ह्यातल्या वाळवा तालुक्यातील येलूर गावचा. शिक्षण बारावीपर्यंत झालं, पण मी ठरवलं होतं नोकरी नाही, स्वतःचा व्यवसाय करायचा, आणि तोही आपल्या मातीतच. आमच्याकडे १.५ एकर बागायती शेती आहे. ऊस, सोयाबीन, शेंगदाणा, मका आणि चाऱ्याचं पीक घेत होतो, पण शेतीबरोबर काही स्थिर आणि नियमित उत्पन्न देणारं हवं होतं. म्हणून मी शेतीपूरक व्यवसाय म्हणून गोपालनाकडे वळलो.

## व्यवसायाची सुरुवात – अडचणींवर मात

जून २०१८ मध्ये मी स्वतःच्या ३ लाख रुपयांच्या गुंतवणुकीतून दुग्ध व्यवसाय सुरू केला. पण सुरुवात सोपी नव्हती. दुधाचं प्रमाण कमी, जनावरे वारंवार आजारी पडायची आणि उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई त्रास द्यायची. तेव्हा समजलं की ही परिस्थिती बदलायची असेल, तर योग्य मार्गदर्शन हवं. मग मी २१ ते २३ जानेवारी २०२० मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे डॉ. गोकुळ सोनवणे सरांकडे प्रशिक्षण घेतलं. याच प्रशिक्षणानं माझा दृष्टिकोन बदलला.

## टर्निंग पॉइंट

या प्रशिक्षणात मला समजलं की यशस्वी दुग्ध व्यवसायासाठी केवळ मेहनत नव्हे, तर शास्त्रीय व्यवस्थापन देखील तितकंच महत्त्वाचं आहे. जनावरांची योग्य निवड, लसीकरण, जंतनिर्मूलन, संतुलित आहार, गोठ्याची शास्त्रशुद्ध रचना या सगळ्याच गोष्टींचा माझ्या कामकाजावर खोल परिणाम झाला. डॉ. गोकुळ सोनवणे सर व डॉ. विजय कदम सरांनी वेळोवेळी माझ्या शंकांचं समाधान केलं.

## सुधारणा आणि आधुनिक व्यवस्थापन

प्रशिक्षणानंतर मी ३०x१४ फूटाचा शास्त्रीय पद्धतीचा गोठा बांधला. गोठा दोन शेडमध्ये विभागला. स्वच्छ पाण्याची स्वतंत्र व्यवस्था केली. चाऱ्याची सतत उपलब्धता राखण्यासाठी मका, डीएचएन - ६ आणि हत्तीगवत यांची लागवड केली. दरवर्षी ३० टन मुरघास तयार करून मी चाऱ्याची टंचाई संपवली. सकस आहारामुळे जनावरांचं आरोग्य सुधारलं आणि दूध उत्पादनातही चांगली वाढ झाली.



## सध्या गोठ्याची स्थिती आणि उत्पन्न

आज माझ्याकडे १५ एच.एफ. संकरित गाई आहेत, त्यात ८ गाई दुधाळ, ३ भाकड गाई आणि ४ कालवडी आहेत. मी दररोज सरासरी १५० लिटर दूध वारणा दूध संघाला विकतो. ३६ रुपये प्रतिलिटर दराने वर्षभर विक्री करून एकूण १९.७१ लाख रुपये उत्पन्न मिळतं. व्यवस्थापनावर ११.६० लाख रुपये खर्च येतो व मला ८.११ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळतो.

गाईंपासून मिळणारं शेणखत शेतीत वापरतो. त्यामुळे रासायनिक खतांवरील खर्च कमी झाला. पिकांची वाढ सुधारली. दुग्ध व्यवसाय आणि शेती यांचं हे परिपूर्ण संयोजन माझ्या आर्थिक उन्नतीचं गमक ठरलं.

## पुढील वाटचाल

आज माझा दुग्ध व्यवसाय स्थिरावला आहे. आता माझं पुढचं ध्येय ५० गायींचा आधुनिक गोठा उभारणे आणि व्यवसायाचा आणखी विस्तार करणेहे आहे. यासाठी मी तीन गोष्टींवर भर देतो; शिस्तबद्ध व्यवस्थापन, शास्त्रीय दृष्टिकोन, आणि योग्य मार्गदर्शन. यांचा सातत्याने वापर करून व्यवसायाची उत्पादकता वाढवतोय.

मला खात्री आहे की, माझा गोठा ग्रामीण भागात आदर्श ठरेल आणि व्यवसायाला नवीन दिशा मिळेल. स्थानिक बाजारपेठेत दर्जेदार दुग्धजन्य उत्पादने पुरविण्याचं माझं उद्दिष्ट आहे. तसेच पूरक रोजगार निर्मिती करून सामाजिक जाणीव देखील जपणार आहे.

## माझा संदेश

मी नव्या पिढीला एवढंच सांगतो की, नोकरीच्या मागे न लागता, शेतीपूरक व्यवसायातही यश मिळवता येतं. पण त्यासाठी तज्ज्ञांचं मार्गदर्शन, प्रशिक्षण घ्या आणि प्रत्येक टप्प्यावर शिकत राहा. शिस्तीने काम केल्यास यश नक्की तुमचं होईल.


**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. विजय कदम**
पशुधन व्यवस्थापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९८८१९९४४५३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**शुभम दत्तात्रय शिनगारे**
मु.पो. येलूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५ ४११
संपर्क क्र. ८५३०१७२६२२

माफसू यशोगाथा २०२५

## नियोजन, नवे तंत्र आणि मेहनतीतून साधला दुग्धव्यवसायात उत्कर्ष

# सागर साळुंखे यांची यशोगाथा



मी सागर मारुती साळुंखे, नागठाणे गावचा. बी.ए. आणि डी.एड. केल्यानंतर, काही काळ जिल्हा परिषद शाळेत कंत्राटी शिक्षक म्हणून कामही केले. पण मन मात्र कायम शेतीकडेच ओढ घेत होते.

वडिलांची अडीच एकर बागायती शेती उरमोडी नदीच्या सुपीक प्रदेशात होती, पण मला नेहमी वाटायचं की केवळ पारंपारिक शेती करून आर्थिक स्थैर्य मिळणार नाही. म्हणून मी ठरवलं की दुग्धव्यवसायाला सुरुवात करायची!

## सुरुवात आणि अडचणी

सुरुवात केली तेव्हा गोठ्यात दोनच गाई. दुध उत्पादन कमी आणि कोरोनाकाळात दुध विक्रीत अडथळे. गोठा बांधण्यासाठी मी ७०x७० फूट अर्धबंदिस्त संरचना उभारली, त्यासाठी ४.२५ लाख रुपये खर्च झाले. पण व्यवस्थापनात अजून बऱ्याच गोष्टी सुधारण्याची गरज होती. जनावरं आजारी पडायची, माज ओळखण्यात अडचण, वेळेवर रेतन होत नसे, आणि त्यामुळे आर्थिक तोटा झाला.

## मार्गदर्शन आणि दिशा

फेब्रुवारी २०२२ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ ला भेट दिली. तिथे डॉ. शेलार आणि डॉ. सोनवणे सरांनी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केलं. मी लगेच २१ ते २३ नोव्हेंबर २०२२ दरम्यान शास्त्रोक्त दुग्धव्यवसाय प्रशिक्षण पूर्ण केलं. त्या प्रशिक्षणात समजलं, सुधारित वंशाच्या जनावरांची निवड ही यशाची गुरुकिल्ली आहे.

जनावरांसाठी मुक्त संचार व अर्धबंदिस्त गोठा, स्वच्छता आणि सोयीस्कर रचना, १५ टन मुरघास निर्मिती, सुका कडबा साठवणूक आणि सकस आहार, नियमित लसीकरण व जंत निर्मूलन यामुळे जनावरांचे आरोग्य अबाधित राहीले. तर शेण व मूत्र व्यवस्थापन केल्याने बायोगॅसचा वापर, जैविक खत आणि इंधन बचत हे सर्व साध्य झाले. या व्यवस्थापनामुळे उत्पादन खर्चात घट झाली आणि दूध उत्पादन व दर्जात वाढ झाली. यामुळे आर्थिक नफा वाढून व्यवसाय आणखी किफायतशीर झाला.



## नफ्याचे गणित

आता माझ्याकडे १५ संकरित गाई आणि ४ कालवडी आहेत. दररोज १५० लिटर दूध उत्पादन, प्रति लिटर दर ३२ रुपये. ५ गाई विकून ५.१० लाख, शेणखत विकून १ लाख, पोलादी पाळण (बसलेली जनावर उचलण्यासाठी पोलादी पाळणा) भाड्याने देऊन ८० हजार मिळाले. चालू वर्षात एकूण उत्पन्न २४.४२ लाख रुपये, व्यवस्थापन खर्च: १३.२५ लाख तर निव्वळ नफा ११.१७ लाख रुपये झाला.

## कामकाज आणि पुढील वाटचाल

गोठ्यात दूध काढण्याचे यंत्र वापरतो, त्यामुळे वेळ वाचतो. जनावरांचे माज वेळेवर ओळखले जातात आणि उत्तम कालवडींची पैदास सुरू आहे. बायोगॅस संयंत्राचा उपयोग करून इंधन बचत होते आणि त्यातून खताचीही गरज भागते. आई-वडील आणि पत्नीही गोठ्याच्या व्यवस्थापनात सक्रिय आहेत. आता माझं स्वप्न आहे, पुढील ३ वर्षांत २५ लिटर दूध देणाऱ्या ३० गाईंचा गोठा उभा करणं.

## यशाचे श्रेय

या सगळ्या प्रवासात क्रांतिसिंह नाना पाटील, पशुवैद्यकीय महाविद्यालयातील डॉ. शेलार, डॉ. सोनवणे आणि त्यांच्या टीमचे मार्गदर्शन हेच माझ्या यशाचं खरं श्रेय आहे. त्यांनी केवळ तांत्रिक ज्ञानचं दिलं नाही, तर वेळोवेळी फोनवर व प्रत्यक्ष भेटीतून मला मार्गदर्शन केलं.

## माझा संदेश

आत्मविश्वास, नियोजन, अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन असेल, तर कोणताही व्यवसाय नोकरीपेक्षा अधिक स्थैर्य देऊ शकतो. शेतीपूरक व्यवसाय करायचा असल्यास, तो शास्त्रशुद्ध पद्धतीने, आधुनिकतेसह आणि चिकाटीने करा.


**मार्गदर्शक**

**डॉ. राजू शेलार**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७९७२२६०४०९

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**सागर मारुती साळुंखे**
मु. पो. नागठाणे, ता. जि. सातारा - ४१५५१९
संपर्क क्र. ९८८१४८४२४६

माफसू यशोगाथा २०२५



## दुग्ध व्यवसायातून यशाची वाटचाल
# धनाजी बिरादार यांची यशोगाथा

मी धनाजी किशन बिरादार, चोंडी (ता. उदगीर, जि. लातूर) येथील रहिवासी. एम. कॉम पर्यंत शिक्षण झाले आणि सुरुवातीला काही काळ स्पर्धा परीक्षांची तयारी केली. पण शिक्षण पूर्ण करूनही नोकरी मिळण्याची ग्वाही कुठेच नव्हती. मिळालीच तर पगार इतका तुटपुंजा की, कुटुंब सांभाळणं शक्य नव्हतं. त्यामुळे मी नोकरीच्या मागे न लागता, स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचा निर्णय घेतला आणि निवडली दुग्ध व्यवसायाची वाट.

## सुरुवात

२०१५ साली मी फक्त २ म्हशी आणि ₹८०,०००/- च्या गुंतवणूकीने या व्यवसायाची सुरुवात केली. सुरुवात छोटी होती, पण स्वप्न मोठं होतं. घरच्यांच्या मदतीने, कष्टाच्या बळावर मी व्यवसायात पाय रोवले. गायींच्या आहार व्यवस्थापनापासून ते गोठ्यातील स्वच्छतेपर्यंत प्रत्येक गोष्टीकडे स्वतः लक्ष दिलं. दररोज पहाटेपासून रात्रीपर्यंत मेहनतीचा दिनक्रम सुरू असतो. आज माझ्याकडे ३ कालवडी, १० वगारी, ३ एच.एफ. गायी आणि पंढरपुरी, मराठवाडी म्हशींसह एकूण ४० पशुधन आहे.

## नफ्याचे गणित

मी आणि माझे दोन भाऊ, आई-वडील मिळून हा व्यवसाय सांभाळतो. आमच्याकडे १२ एकर शेती आहे, त्यातील ४ एकरवर चारा आणि गोठा आहे. आम्ही कुट्टी मशीन वापरून चाऱ्याचं नियोजन करतो. दररोज सरासरी ६०–७० लिटर दूध उत्पादन होतं, जे काही घरपोच ग्राहकांना आणि काही डेअरीला विकलं जातं. सुरुवातीला भांडवलाची अडचण होती, पण मी कुठलंच कर्ज न घेता स्वतःच्या बचतीवर व्यवसाय सुरू केला. आज व्यवसायात एकूण ₹२० लाखांची गुंतवणूक आहे. मासिक उत्पन्न ₹१,१०,०००/- आहे, त्यातून ₹८०,०००/- निव्वळ नफा मिळतो. कोंबड्यांपासून वर्षाला ₹१,२५,०००/- ते ₹१,५०,०००/- पर्यंतचं अतिरिक्त उत्पन्नही मिळतं.

या व्यवसायाच्या कमाईवर आम्ही घर बांधलं, आधुनिक गोठा उभारला आणि आता बँकाही आमच्यावर विश्वास ठेवू लागल्या आहेत. गावातले तरुणही माझ्याकडून मार्गदर्शन घेऊन दुग्ध व्यवसायात उतरू लागले आहेत. मी त्यांना अनुभवाच्या आधारे चारा व्यवस्थापन, रोग प्रतिबंध आणि दूध संकलन प्रक्रियेबाबत माहिती देतो.



## यशाचं श्रेय

या प्रवासात मला सतत डॉ. प्रफुल्लकुमार पाटील सरांचं मार्गदर्शन लाभलं. त्यांनी चारा उत्पादन, आहार नियोजन, गोठा व्यवस्थापन यामध्ये वेळोवेळी तांत्रिक मदत दिली. त्यांच्या सल्ल्यामुळे मी अनेक चुका टाळू शकलो आणि अचूक निर्णय घेऊन व्यवसाय मजबूत केला. त्यांचं मार्गदर्शनच माझ्या यशामागचं खऱ्या अर्थाने 'बॅकबोन' ठरलं. मी यशाचं श्रेय माझ्या कुटुंबाच्या अथक मेहनतीला, डॉ. पाटील सरांच्या मार्गदर्शनाला देतो .

## कुटुंबाची साथ

या व्यवसायाच्या प्रत्येक टप्प्यावर माझ्या कुटुंबाची साथ मला बळ देणारी ठरली. आई-वडीलांनी मानसिक आधार दिला, तर दोन भावांनी गोठ्याचं व्यवस्थापन, चारा कापणी, स्वच्छता आणि दूध वितरण यामध्ये माझ्या खांद्याला खांदा लावून मदत केली. आम्ही तीन भावांनी मिळून काम केल्यामुळे मजुरांवरील खर्च वाचला आणि व्यवसायात अधिक शिस्त आणि एकसंघपणा आला.

## पुढील ध्येय

आता यापुढे जाऊन शेळीपालन, पनीर व खवा उत्पादन यामध्ये उतरण्याचा मानस आहे. त्यासाठी मी आता शीत साखळी व मूल्यवर्धन प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या दिशेने काम सुरू केलं आहे. माझं दुग्ध संकलन व विक्री केंद्राची गावात एक ओळख बनली आहे आणि भविष्यात याला ब्रँड म्हणून उभं करायचं आहे.

## माझा संदेश

कमी गुंतवणुकीतही व्यवसाय सुरू करता येतो, फक्त कष्ट आणि शिस्त पाहिजे. मार्गदर्शन घेतलं आणि आधुनिक विचार स्वीकारला, तर कोणतीही पार्श्वभूमी नसताना मोठं यश मिळू शकतं. यश हे मेहनतीचचं फलित आहे आणि ते आपल्याला आपली दिशा स्वतः ठरवण्याची संधी देतं. नवीन पिढीने आधुनिक शेती आणि दुग्ध व्यवसाय यामध्ये करिअरचा पर्याय शोधावा, कारण यात मेहनतीचं चीज होतं आणि समाजातही प्रतिष्ठा मिळते.


**मार्गदर्शक**

**डॉ. प्रफुल्लकुमार पाटील**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८३२९७३५३१४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**श्री. धनाजी किशन बिरादार**
मु.पो. चोंडी, ता. उदगीर, जि. लातूर - ४१३ ५१७
संपर्क क्र. ८३०८६३९१७१

माफसू यशोगाथा २०२५

## ठाम निश्चय, आत्मविश्वास आणि मेहनत, समृद्धीची त्रिसूत्री !

# पंकज भोसले यांची यशोगाथा



मी पंकज कृष्णा भोसले, सांगली जिल्ह्यातल्या बांबवडे गावचा. वय ३३. शिक्षणाने बी.ए. पदवीधर. पण पदवी मिळाल्यावर मी ठरवलं. नोकरीच्या मागे धावायचं नाही, स्वतःचं काहीतरी करायचं आणि त्यातूनच २०११ मध्ये मी दुग्ध व्यवसायात पाऊल टाकलं.

### सुरुवात एका गायीनं...

सुरुवात झाली एका होल्स्टेन फ्रिजियन गायीनं. त्यातच एक गोष्ट ठरवली की या व्यवसायाला पारंपारिक पद्धतीनं न करता, स्वतःचा स्वतंत्र गोठा उभारायचा. ४ गुंठ्याच्या जागेवर, ३ लाख रुपये खर्चून मी मुक्त संचार पद्धतीचा गोठा बांधला. या संदर्भात प्रशिक्षण घेतलं नव्हतं, पण डॉ. प्रफुल्लकुमार पाटील आणि डॉ. मत्स्यगंधा पाटील यांचं मार्गदर्शन सतत सोबत होतं.

### गुंतवणूक, मेहनत आणि वाढ

आजपर्यंत ७ लाख रुपये गुंतवणूक केली आहे. १५ होल्स्टेन फ्रिजियन गायी आहेत. त्यापैकी १० गायी या माझ्याच गाईंच्या वासरांपासून घरच्या घरी तयार केल्या आहेत. ५ एकर शेती आहे. त्यात १ एकर मध्ये हायब्रीड नेपीयर आणि मका चारा, तर ४ एकरवर ऊसाचे नगदी पीक घेतो.

### माझं मुख्य उत्पन्न

आज मी दररोज १५० लिटर दूध विकतो, प्रति महिना ₹ १,२१,५०० उत्पन्न मिळवतो. त्यात ₹ ४६,७०० खर्च वजा जाता, ₹ ७४,८०० निव्वळ नफा राहतो. दरवर्षी अंदाजे ८ ते ९ लाख रुपयांचं उत्पन्न फक्त दुग्ध व्यवसायातून मिळतं. शेतीमधूनही मला सुमारे ₹९ लाख रुपयांचं वार्षिक उत्पन्न मिळतं.

### आधुनिक पद्धतीचा अवलंब

मी कडबा कुट्टी मशीन, दूध काढणी यंत्र, जनरेटर, फॅन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतो. मुक्त संचार गोठा पद्धतीमुळे गायींचं आरोग्य सुधारलं आणि मजुरीचा खर्चही कमी झाला. गायींना लम्पीचा प्रादुर्भाव झाला होता, पण वेळेवर उपचार, योग्य लसीकरण आणि सुश्रूषेमुळे त्यावर यशस्वी मात केली.



### कुटुंबाचं बळ आणि मेहनतीचा वसा

या व्यवसायात मी आणि माझे वडील दोघं मिळून दिवसरात्र मेहनत घेतो. गायी, शेती, व्यवस्थापन या प्रत्येक गोष्टीत आमचं कुटुंब एकत्र उभं आहे. या मेहनतीच्या जोरावर मी १४०० चौरस फुटांचा बंगला बांधला, आणि आज मला समाजात "उत्कृष्ट ऊस उत्पादक व दुग्ध व्यावसायिक" म्हणून ओळख मिळाली आहे.

### यशाचे श्रेय

आता माझं पुढचं लक्ष्य आहे गायींची संख्या २५ पर्यंत वाढवायची. या प्रवासात डॉ. प्रफुल्लकुमार पाटील आणि डॉ. मत्स्यगंधा पाटील यांचं वेळोवेळी मिळालेलं मार्गदर्शन, तांत्रिक सल्ला आणि मानसिक आधार माझ्यासाठी अमूल्य ठरले. त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

### भविष्यातली दिशा

पुढे माझा या व्यवसायात मूल्यवर्धनावर भर देण्याचा विचार आहे. दूध प्रक्रियेपासून दही, ताक, तूप, खवा यांचं उत्पादन सुरू करून अधिक नफा कमावण्याची योजना आहे. यासाठी मी प्रशिक्षणही घेण्याचं ठरवलं आहे.

### माझा संदेश

माझा ठाम विश्वास आहे की, दुग्ध व्यवसाय हा जोडधंदा नाही, तर मुख्य व्यवसाय असू शकतो. जर तो आधुनिक पद्धतीनं, विज्ञान आधारीत सातत्यपूर्वक आणि चिकाटीने केला, तर यश हमखास मिळतं.


**मार्गदर्शक**

**डॉ. प्रफुल्लकुमार पाटील**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८३२९७३५३१४

**डॉ. मत्स्यगंधा पाटील**
सहयोगी प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८४४६६५३३०५

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**पंकज कृष्णा भोसले**
मु.पो. बांबवडे, ता. पलूस, जि. सांगली - ४१६ ३१०
संपर्क क्रं. ९९७५९१९१३५

# शेळीपालन



माफसू यशोगाथा २०२५

## जातिवंत उस्मानाबादी शेळीपालनातून बदलले जीवन

# रामचंद्र जाधव यांची यशोगाथा



मी रामचंद्र केशव जाधव, सातारा जिल्ह्यातील जानाई मळाई पायथा, कोडोली या गावातल्या साडेतीन एकर कोरडवाहू जमिनीचा शेतकरी. शिक्षणाने बी. कॉम झालो आणि सुरुवातीला ग्रामीण पतसंस्थेत नोकरी केली. पण मन तिथे रमलं नाही. मला स्वतःचं काहीतरी करायचं होतं – शेतीला पूरक असं आणि शाश्वत उत्पन्न देणारं.

### सुरुवात आणि प्रेरणा

ऑक्टोबर २०१९ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे गेलो. तिथं डॉ. गोकुळ सोनवणे सरांशी चर्चा केली आणि त्यांनी मला उस्मानाबादी शेळीपालन करण्याची प्रेरणा दिली. तिथूनच सुरुवात झाली. नोव्हेंबर २०२० मध्ये मी ५० x ३५ फुटाचा आधुनिक गोठा उभारला. धाराशिव जिल्ह्यातून एकूण ₹१.५ लाख खर्चून १० शुद्ध जातीच्या उस्मानाबादी शेळ्या आणि १ पैदाशी बोकड खरेदी केला.

### प्रशिक्षण आणि शास्त्रशुद्ध वाटचाल

सुरुवातीला पिल्लं दगावणं, वजन वाढ न होणं, विक्रीतील अडचणी, या सगळ्या गोष्टी माझ्यासमोर उभ्या होत्या. मग मी पुन्हा डॉ. सोनवणे सरांकडे गेलो आणि शेळीपालनाचे प्रशिक्षण घेतले. त्या प्रशिक्षणात समजलं की, शेळ्यांच्या आरोग्यासाठी लसीकरण, जंतनाशक, पोषण आणि जातींची निवड अत्यंत महत्त्वाची आहे.

### खाद्य व्यवस्थापन – कमी खर्च, जास्त फायदा

शेळ्यांना सकस आहार द्यायचा पण खर्चही कमी करायचा, हे साध्य करायला मी प्रशिक्षणातील सूत्रं वापरली. हिरव्या चाऱ्यात मका, कडवळ, हत्तीघास, बांधावरील गवत, वाळलेल्या चाऱ्यात ज्वारी कडबा, तूर, हरभरा भुसा व यासोबत २०० ग्रॅम गोळीपेंड व १५ ग्रॅम खनिज मिश्रण असे प्रत्येक शेळीसाठी नियोजन केले. कडबाकुट्टी यंत्र वापरल्यामुळे चाऱ्याची ५०% पर्यंत बचत झाली. तसेच शेळ्यांना दिवसातून तीन वेळा आहार दिल्यामुळे त्यांचा वृद्धी दर लक्षणीय वाढला. लेंडी खताचं व्यवस्थापनही मी व्यवस्थित करतो. उन्हाळ्यात लेंडी वाळवून ती शेतीसाठी खत म्हणून वापरतो.



### वाटा पद्धती ते थेट शेतकरी बाजार

सुरुवातीला व्यापारी फार्मवर येत नव्हते. म्हणून मी गावात वाटा पद्धतीने मटन विकायला सुरुवात केली. हळूहळू ग्राहक वाढले आणि शेळ्यांची मागणी सुरू झाली. नंतर मी बोकड नगाने न विकता, प्रतिकिलो (₹४०० दराने) जिवंत वजनाने विकायला सुरुवात केली. मी विक्रीची योजना गावच्या यात्रा, गटारी अमावस्या, दसरा, बकरी ईद, होळी या हंगामांवर केंद्रित केली, त्याचा चांगला परिणाम झाला. ग्राहकांचा विश्वास वाढल्याने आता आजूबाजूच्या गावांतूनही माझ्या फार्मकडे मागणी वाढू लागली आहे. गुणवत्ता आणि विश्वास हाच माझ्या व्यवसायाचा आधार ठरला आहे.

### आजची स्थिती – अर्थकारणात बदलणारा टप्पा

आज माझ्याकडे १६५ उस्मानाबादी शेळ्या आहेत. यामध्ये २ पैदाशी बोकड, ६० पैदाशी शेळ्या, ४० नर करडे, ६३ माद्या करडे अशी विभागणी आहे. चालू वर्षात आर्थिक उलाढाल ३१ लाख रुपये असून त्यात उत्पन्न ₹ २१.५० लाख, त्यात ₹९.५० लाख खर्च आणि ₹ १२ लाख निव्वळ नफा आहे.

### यशाचे श्रेय व पुढील लक्ष्य

या प्रवासात डॉ. गोकुळ सोनवणे आणि डॉ. राजू शेलार यांचं मार्गदर्शन, पाठबळ आणि वेळोवेळी मिळालेला अनुभव हेच माझ्या व्यवसायाच्या यशाचं मूळ आहे. मी त्यांचा ऋणी आहे. आता माझं पुढील लक्ष्य शुद्ध जातीच्या २०० उस्मानाबादी शेळ्यांचं पालन करून दरवर्षी ३५०-४०० पिल्लांची विक्री करायचं आहे.

### माझा संदेश

शेळीपालनात शून्यावरून सुरू केलं तरी, प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि व्यवस्थापन असेल तर प्रगती निश्चित आहे. चुका करून शिकण्याऐवजी शिकून सुरुवात केली, तर यश लवकर मिळतं.


**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. राजू शेलार**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७९७२२६०४०९

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**रामचंद्र केशव जाधव**
मु. पो. जानाई मळाई पायथा, कोडोली, ता. - जि. सातारा - ४१५ ००४
संपर्क क्र. ९४२३८६७८३७ / ७०५८८६७८३७

माफसू यशोगाथा २०२५

# शेळीपालनातून उभा केला शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत
# संदीप औटे यांची यशोगाथा



मी संदीप विश्वनाथ औटे, रा. सावळी, तालुका मिरज, जिल्हा सांगली. सांगली शहरापासून जवळच माझी शेती आहे. शिक्षणाने मी स्थापत्य अभियंता आहे, पण मनाने शेतकरी. लहानपणापासूनच शेती आणि पशुपालनात रुची होती. सुरुवातीला १ वर्ष नोकरी व त्यानंतर १० वर्ष बांधकाम व्यवसाय करत असताना माझे मन सतत शेती व पशुपालनाकडे ओढा घेत होते. त्यानंतर मात्र मी शेतीपूरक व्यवसाय म्हणून शेळीपालन सुरू करण्याचं ठरवलं.

## व्यवसायाची सुरुवात – पार्श्वभूमी आणि प्रेरणा

शेळीपालन सुरू करताना सुरुवातीलाच अडचणींचा सामना करावा लागला. शास्त्रीय पद्धतीचं ज्ञान नव्हतं, त्यामुळे चुका होत होत्या. पण मी थांबलो नाही. २७ ते २९ फेब्रुवारी २०२० रोजी, क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे प्रशिक्षण घेतलं. डॉ. गोकूळ सोनवणे व डॉ. विद्या निंबाळकर यांचं मोलाचं मार्गदर्शन लाभलं. त्यांनी सांगितलं, यशस्वी शेळीपालनासाठी पैदाशी बोकड व शेळ्यांची योग्य निवड, नियमित लसीकरण व जंतनिर्मूलन अत्यावश्यक आहे.

## व्यवसाय वृद्धी आणि आर्थिक प्रगती

प्रशिक्षणानंतर मी एप्रिल २०२१ मध्ये ५० x २५ फूट आकाराचा आधुनिक गोठा बांधला आणि 'शाश्वत शेळी फार्म'ची स्थापना केली. मी ३ एकर शेतीत दशरथ, हत्तीघास, सुबाभूळ, शेवरी या चारा पिकांची लागवड केली. दोन एकर जमीन मका चाऱ्यासाठी भाड्याने घेतली आहे. वाळलेल्या चाऱ्यात ज्वारी कडबा, तूर भुसा, हरभरा भुसकट हे साठवून ठेवलं आहे. खाद्याचा खर्च कमी ठेवण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचं ठरलं. आजपर्यंत १२ लाख रुपये शेळ्या व गोठ्यावर खर्च केले आहेत. यासाठी अण्णासाहेब पाटील कर्ज योजनेअंतर्गत १० लाखांचं कर्ज घेतलं.गेल्या वर्षभरात मी ९.३० लाखांची शेळ्यांची विक्री केली. खर्च वजा जाता मला ४.९० लाखांचा निव्वळ नफा मिळाला.

## व्यवसायात राबवलेले नवे प्रयोग व व्यवस्थापन

प्रशिक्षणातील माहिती वापरून मी वजनवाढीसाठी विशिष्ट खाद्य सूत्र वापरतो. स्वच्छता, पोषण, लसीकरण आणि गोठा व्यवस्थापन



यावर विशेष लक्ष देतो. शेळ्यांच्या लेंडीपासून गांडूळखत तयार करून त्याचं पॅकिंग करून लवकरच विक्री सुरू करणार आहे.

## व्यवसायातील चढउतार

सुरुवातीला शास्त्रीय माहितीचा अभाव, गोठा बांधणीची तजवीज, चाऱ्याचा तुटवडा हे सगळं होतं. पण मी तिथे थांबलो नाही. सातत्याने नोंदी, लसीकरण, संतुलित आहार यावर भर दिला. माझ्याकडे ७० लहान-मोठ्या शेळ्या असून, त्यात बीटल जातीचे २ पैदाशी बोकड, ३० पैदाशी शेळ्या, २० करडे आणि ईदसाठी १८ राखीव बोकड आहेत.

## यशाचे श्रेय

डॉ. सोनवणे व डॉ. निंबाळकर या दोघांनी दिलेलं प्रशिक्षण आणि मार्गदर्शन माझ्या व्यवसायाचा आधार झाला. प्रशिक्षणाशिवाय शेळीपालन केलं असतं, तर आज हे शाश्वत यश शक्य झालं नसतं.

## कुटुंबाचा पाठींबा आणि प्रेरणा

माझं कुटुंब आई-वडील, पत्नी सगळे खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले. शेळीपालनासाठी कष्टाची तयारी लागते, पण जेव्हा घरच्यांचा पाठिंबा मिळतो, तेव्हा ते शक्य होतं.

## प्रेरणा व संदेश

मी सांगू इच्छितो की, शेळीपालन हा फक्त शेळ्या सांभाळण्याचा व्यवसाय नाही, तर व्यवस्थापनाचं विज्ञान आहे. तज्ज्ञांचं मार्गदर्शन, योग्य जातीची निवड, खाद्य आणि लसीकरणावर भर दिला, तर शेळीपालन शाश्वतपणे फायदेशीर होऊ शकतं. नवीन तरुणांनी व्यवसायात उतरायचं असेल, तर ज्ञान, नियोजन आणि चिकाटी या तीन गोष्टी घेऊन उतरावं, यश तुमचंच होईल!


**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. विद्या निंबाळकर**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७४९८३६७७३४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**संदीप विश्वनाथ औटे**
मु. पो. सावळी, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४१०
संपर्क क्र. ९४२२४७०६५५

## शेळीपालन – आर्थिक उन्नतीचा राजमार्ग

# अक्षय पिसाळ यांची यशोगाथा



मी अक्षय शांताराम पिसाळ, खंडाळा तालुक्यातील असवली या माझ्या मूळ गावी, आई-वडिलांसह सात एकर जमिनीवर शेळीपालन व्यवसाय करत आहे. शिक्षण बारावीपर्यंत पूर्ण केलं असून त्यात 'पशुविज्ञान' विषय होता. या विषयामुळे आणि घरच्या वडिलोपार्जित शेळीपालनाच्या अनुभवामुळे, मी शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या मागे न लागता शेळीपालन हाच मुख्य व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला.

## शास्त्रोक्त व्यवस्थापनाकडे वाटचाल

सन २०१९-२० पर्यंत पारंपारिक पद्धतीने शेळ्यांची काळजी घेत होतो. परंतु २०२१-२२ मध्ये लसीकरण न झाल्यामुळे ६-७ शेळ्या मृत्युमुखी पडल्या. शवविच्छेदनातून आंत्रविषार रोग असल्याचं निदान झालं आणि त्याच क्षणी मी ठरवलं आता शेळीपालन शास्त्रोक्त पद्धतीनेच करायचं! त्याप्रमाणे व्यवसायात योग्य ते बदल करण्यास सुरुवात केली आणि त्याचा लाभ हळूहळू दिसू लागला. नियमित पशुवैद्यकीय सल्ला, संतुलित आहार आणि वेळोवेळी जनावरांच्या आरोग्याची तपासणी हे माझ्या दैनंदिन नियोजनाचा भाग बनले आहेत. आज शेळ्यांचं आरोग्य चांगलं असून उत्पादनातही लक्षणीय सुधारणा झाली आहे.

## टर्निंग पॉईंट

फेब्रुवारी २०२३ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे प्रशिक्षण घेतले. डॉ. तेजस शेंडे आणि डॉ. अभिजीत बाराते सरांनी लसीकरण, आहार, दररोजचे व्यवस्थापन, वंशवृद्धी, नोंदी पद्धती याबाबत अतिशय सखोल मार्गदर्शन केलं.

प्रशिक्षणानंतर लगेचच मी लसीकरणाचे वेळापत्रक देखील ठरवले, जंतनाशकाचा वापर सुरू केला आणि अर्धबंदिस्त गोठा पद्धतीची अंमलबजावणी केली. त्यामुळे कालांतराने फायदा होऊ लागला आणि व्यवसायात प्रगती झाली.



## भांडवलाशिवाय प्रगती

कोणतेही कर्ज न घेता, कोणतेही अनुदान न घेता, मी घरच्या गोठ्यातील उस्मानाबादी जातीच्या ७५-९० शेळ्यांमधून निवड करून व्यवसायाचे रूपांतर केलं. आई-वडील चारा आणि गोठ्याची जबाबदारी घेतात, तर मी पैदास, आरोग्य, आणि लसीकरण यावर लक्ष केंद्रित करतो. आज माझ्या गोठ्यात १२५ पेक्षा अधिक शेळ्या आहेत.

## उत्पन्न, नफा आणि आत्मविश्वास

सन २०२३-२४साली ५०-६० करडांची विक्री, ₹४.५० लाख उत्पन्न आणि खर्च फक्त ₹३०-४० हजार तर २०२४-२५ साली ७० करडांची विक्री, ₹४.९० लाख उत्पन्न आणि खर्च ₹५०-६० हजार आहे. आज शेळीपालनातून मला वर्षाला सुमारे ₹४ लाखांचा निव्वळ नफा मिळतो.

## यशाचे श्रेय

शेळीपालनाचा खरा आत्मा म्हणजे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन. त्यामुळे महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ येथील डॉ. तेजस शेंडे सर आणि डॉ. अभिजीत बाराते सरांचे मार्गदर्शन नसते, तर आज मी इथवर पोहोचू शकलो नसतो. त्यांनी केवळ तांत्रिक सल्ला दिला नाही, तर एक तरुण उद्योजक घडवण्याचं काम केलं.

## माझा संदेश

आज शेळीपालनाच्या माध्यमातून मी केवळ स्वतःचं आर्थिक स्थैर्य साध्य केलं नाही, तर कुटुंबालाही सक्षम केलं. बेरोजगारीच्या काळात हा व्यवसाय तरुणांसाठी एक उज्ज्वल संधी आहे. फक्त गरज आहे ती योग्य माहिती, चिकाटी, आणि शिस्तबद्ध कामाची!

**मार्गदर्शक**

**डॉ. तेजस शेंडे**
सहयोगी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९९७०८३२१०५

**डॉ. अभिजीत बाराते**
सहाय्यक प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७७९६८४६४३६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**अक्षय शांताराम पिसाळ**
मु. पो. असवली, ता. खंडाळा, जि. सातारा - ४१२ ८०२
संपर्क क्र. ८७६७२६३८७४

माफसू यशोगाथा २०२५

## शेळीपालनातून साधली समृद्धी, उच्चशिक्षितांसमोर ठेवले उदाहरण !

# विशाल मदने यांची यशोगाथा



मी विशाल विलास मदने, देवाळे (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) येथील निवासी. एम.ए. (इतिहास) शिक्षण घेतलं, पण कोरोनाने शिक्षण आणि आयुष्य दोन्ही थांबवलं. नोकरीचा शोध सुरू होता, पण मन कुठे स्थिर राहत नव्हतं. शेती आणि गाई-म्हशींचा पारंपारिक व्यवसाय आम्ही करतच होतो, पण दुग्ध व्यवसायात खर्च भरपूर आणि परतावा मर्यादित होता. याच काळात शेळीपालनाची ओढ वाढली.

## संकटांची सुरुवात आणि प्राशिक्षण

सन २०२२ मध्ये मी कोणत्याही प्रशिक्षणाशिवाय केवळ वाचनाच्या आधारावर शेळीपालन सुरू केलं. थोड्याच दिवसांत नऊ शेळ्या दगावल्या. मन खचलं. पण चूक शोधायची होती, थांबायचं नव्हतं. तेव्हाच मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे तीन दिवसांचं शास्त्रोक्त शेळीपालन प्रशिक्षण घेतलं. डॉ. तेजस शेंडे आणि डॉ. अभिजीत बाराते यांचं मार्गदर्शन माझ्या या वाटचालीत निर्णायक ठरलं.

## जय मल्हार गोट फार्म

शेळीपालन पुन्हा सुरू करताना शासकीय नाविन्यपूर्ण योजनेतून मला १० शेळ्या व १ बोकड मिळाले. जुन्या गाईंच्या गोठ्याचा पुनर्वापर केल्याने भांडवली खर्च कमी झाला. व्यवसायाला नाव दिलं "जय मल्हार गोट फार्म". गोठ्याची स्वच्छता, लसीकरण, पिल्लांची निगा, विक्री सगळं घरातील सदस्यांच्या मदतीने करतो.

## अनुभव, सुधारणा आणि आर्थिक गणित

सुरुवातीला नियोजन कमी होतं, त्यामुळे प्रथम वर्षात ₹७०,००० चा तोटा झाला. परंतु त्यातून धडे घेत, युट्युब आणि प्रशिक्षणातून शास्त्रशुद्ध गोष्टी आत्मसात केल्या. आता गोठ्यात २४ मोठ्या शेळ्या, ११ पिल्लं आणि १ बीटल बोकड अशी एकूण ३६ जनावरे आहेत. तीन वर्षांमध्ये व्यवसायाची आर्थिक वाटचाल हळूहळू स्थिर झाली. २०२२ मध्ये १० शेळ्या खरेदी करताना ₹६६,५७० गुंतवले आणि



वर्षाअखेर ₹३९,७०० निव्वळ नफा मिळाला. २०२३ मध्ये शासकीय योजनेतून ८ शेळ्या मिळवून ₹१,००,९०० उत्पन्नातून ₹९६,९०० नफा मिळवला. २०२४ मध्ये एका जातीवंत शेळीच्या खरेदीमागे ₹८,००० खर्च करत, ८ पिल्लांच्या विक्रीतून ₹४४,७६० उत्पन्न मिळवून ₹३९,७६० निव्वळ नफा झाला.

## भविष्यातली दिशा आणि प्रेरणा

पुढच्या टप्प्यात शेळ्यांचं दूध विक्रीस आणायचं आणि आधुनिक गोठा उभारायचा आहे. या व्यवसायातून केवळ पैसा नाही, तर स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची वाट सापडली. स्थानिक तरुणांसाठी प्रशिक्षण देण्याचा विचार आहे, जेणेकरून अधिक युवक शेतीपूरक उद्योगाकडे वळतील. सरकारी योजनांचा प्रभावी वापर करत नवउद्योजकांसाठी एक मार्गदर्शक केंद्र स्थापन करण्याचाही मानस आहे. यामुळे गावातच रोजगारनिर्मिती होऊन शहरांकडे होणारं स्थलांतरही काही प्रमाणात रोखता येईल.

## यशाचे श्रेय

या प्रवासात डॉ. शेंडे आणि डॉ. बाराते सरांचं मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरलं. त्यांच्या मदतीमुळेच मी एक यशस्वी उद्योजक म्हणून उभा राहिलो.

## माझा संदेश

सुशिक्षित बेरोजगारांना माझा संदेश आहे स्वतःच्या शिक्षणाचा उपयोग करून शेतीपूरक व्यवसायात उतरावं. शेळीपालन हा कमी गुंतवणुकीत अधिक परतावा देणारा मार्ग आहे. फक्त योजना, अभ्यास आणि चिकाटी लागते. सरकारी योजनांचा योग्य अभ्यास आणि तांत्रिक प्रशिक्षण घेतल्यास यश लांब नसतं. ग्रामीण तरुणांनी पारंपारिक कल्पनांना फाटा देऊन आधुनिक दृष्टीकोन स्वीकारण्याची हीच वेळ आहे.


**मार्गदर्शक**

**डॉ. तेजस शेंडे**
सहयोगी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९९७०८३२१०५

**डॉ. अभिजीत बाराते**
सहाय्यक प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७७९६८४६४३६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**विशाल विलास मदने**
मु.पो. देवाळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर- ४१६ २१३
संपर्क क्र. ९०९६२३८३७०

## संघर्षातून उभारलेलं यश;
## माझी शेळीपालनाची वाटचाल
# चंद्रकांत भोसले यांची यशोगाथा



मी चंद्रकांत गजानन भोसले, जवळे (ता. खंडाळा, जि. सातारा) गावचा. शिक्षण पूर्ण झाल्यावर काही काळ नोकरीच्या मागे धाव घेतली, औद्योगिक वसाहतीत संधी शोधल्या. पण त्या नोकऱ्यांची बंधनं, कमी वेतन आणि शोषण बघून मन उबगलं. माझ्या मनात ठाम विचार आला की, आपलं काही तरी स्वतःचं असावं. आमचा पारंपारिक व्यवसाय शेती आणि पशुपालनाचा. पण दूध व्यवसायाकडे बघताना वाटायचं, एवढ्या कष्टाचे काम पण दर मात्र ठरलेलेच. म्हणून मी निर्णय घेतला, शेळीपालन सुरू करायचं.

सन २०१७ साली १० उस्मानाबादी शेळ्या आणि एक सिरोही बोकड घेऊन सुरुवात केली. पण या क्षेत्रात सखोल माहिती न मिळाल्याने बराच वेळ अंधारात चाचपडत होतो. शेवटी योग्य दिशा मिळाली ती क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथील डॉ. तेजस शेंडे सरांच्या मार्गदर्शनाने. त्यांनी चारा व्यवस्थापन, पैदास तंत्र, लसीकरण, विक्री व्यवस्थापन अशा प्रत्येक टप्प्यावर मला शास्त्रशुद्ध माहिती दिली.

## प्रारंभीच झटके

सन २०२० साली अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून ८ लाखांचं कर्ज घेतलं आणि मोठ्या प्रमाणावर व्यवसायाची वाढ केली. ४० उस्मानाबादी व १० बिटल शेळ्या, गोठा, यंत्रसामग्री, गव्हाणी सगळं उभं केलं. पण प्रारंभीच्या काळात मला मोठा धक्का बसला. १३ मोठ्या व ४० लहान करड्यांचा मृत्यू झाला. हे नुकसान असह्य होतं, पण मी खचून गेलो नाही. डॉ. शेंडे, डॉ. बाराते, डॉ. विठ्ठल धायगुडे आणि डॉ. राजू शेलार यांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे मी चारा लागवड, लसीकरण, जंतनिर्मूलन यांचं काटेकोर व्यवस्थापन केलं.

## नफ्याचे गणित

वर्ष २१-२२ मध्ये गोठ्यात ५ बीटल व ३२ उस्मानाबादी अशा एकूण ३७ शेळ्या शिल्लक होत्या. त्यावर्षी २५ करडांची विक्री करून एकूण ५० हजार रुपये खर्च वगळता १.५ लाख रुपये उत्पन्न मिळाले. २३-२४ मध्ये गोठ्यामधील सर्व उस्मानाबादी जातीच्या शेळ्या विकून त्या उत्पन्नामधून आणखी १५ बीटल व १० कोटा जातीच्या शेळ्या विकत आणल्या आणि त्यावर्षी २० पिल्ले विकून ३ लाख रुपये मिळाले ज्यामध्ये



१ लाख रुपये खर्च झाला.२०२४- २५ या वर्षांमध्ये आत्तापर्यंत १५०००/- रुपये प्रति नग बाजार भावाप्रमाणे २५ पिल्ले विकून ३ लाख ७५ हजार रुपये एवढे उत्पन्न मिळाले आणि आज माझ्याकडे १२ कोटा व १८ बिटल जातीच्या प्रौढ माद्या २ पैदाशीचे नर तसेच साधारण ३ महिने वयाची आणखी २० पिल्ले विक्रीस उपलब्ध आहेत ज्यांच्यापासून एकूण ३ लाखांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

## शिवांश ॲग्रो अँड गोट फार्म

मी म्हणतो, हा व्यवसाय तुमच्याकडून कष्ट, शिस्त आणि शेळ्यांवर प्रेम मागतो. प्रत्येक जनावराच्या हालचालीकडे लक्ष, गोठ्याचं व्यवस्थापन, योग्य खाद्य आणि आरोग्य हे यशाचं गमक आहे. शिवांश ॲग्रो अँड गोट फार्म नावाने माझा नोंदणीकृत फार्म आहे. भविष्यात शेळ्यांची संख्या वाढवणं, दुधाचा व्यवसाय सुरू करणं आणि आधुनिक गोठा उभारणं हे माझं उद्दिष्ट आहे.

## यशाचे श्रेय

या यशाचं पूर्ण श्रेय मी माझ्या कुटुंबाला, विशेषतः डॉ. तेजस शेंडे सरांच्या नियमित मार्गदर्शनाला देतो. त्यांनी केवळ माहिती दिली नाही, तर संकटातही खंबीर साथ दिली. या प्रवासात मी अनेक चढ-उतार पाहिले, पण प्रत्येक अडचणीतून काहीतरी शिकायला मिळालं. हेच शिकणं पुढे मला आत्मविश्वास देत गेलं आणि आज मी माझ्या गावात एक आत्मनिर्भर उद्योजक म्हणून ओळखला जातो.

## माझा संदेश

सुशिक्षित बेरोजगारांनी छोट्या पगाराच्या नोकरीकडे धाव न घेता स्वतः मालक बनावं. शेळीपालनासारखा फायदेशीर व्यवसाय शास्त्रशुद्ध पद्धतीने, नियोजन करून केल्यास नक्की यश मिळतं. स्वतंत्र व्यवसायाचं समाधान, स्वाभिमान आणि आर्थिक स्थैर्य हे सगळं मी शेळीपालनातून मिळवलय.

**मार्गदर्शक**

**डॉ. तेजस शेंडे**
सहयोगी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९९७०८३२१०५

**डॉ. अभिजीत बाराते**
सहाय्यक प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७७९६८४६४३६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**चंद्रकांत गजानन भोसले**
मु.पो. जवळे, ता. खंडाळा, जि. सातारा - ४१२ ८०१
संपर्क क्र. ९३७०५४५३६२

# माफसू यशोगाथा २०२५

## शेतीच्या अनिश्चिततेतून शेळीपालनातील यशाचा प्रवास

# जनार्दन धुमाळ यांची यशोगाथा



माझं नाव जनार्दन आबासो धुमाळ. माझं गाव वीर, ता. पुरंदर, जि. पुणे. वय ४३ असून, मी माझ्या पत्नीसह आणि तीन मुलांसह राहतो. घरचा पारंपारिक व्यवसाय म्हणजे शेती, फळबाग, भाजीपाला, आणि घरगुती दुधासाठी गाई-म्हशी. शिक्षण फक्त दहावीपर्यंत झालं, त्यामुळे नोकरीचा विचार कधी केला नाही. २००१ पासून शेतीच माझं मुख्य उपजिविकेचं साधन झालं.

## शेळीपालनाचा विचार

वर्षांनुवर्षे शेतीतून उत्पन्न बेभरवशाचं. हमीभाव नाही, मजूर मिळत नाहीत, कधी दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी... शेतीने खूप काही शिकवलं पण आर्थिक स्थैर्य दिलं नाही आणि त्याच वेळी, लक्षात आलं की मटणाचा दर वाढतोय आणि त्या व्यवसायात चांगलं उत्पन्न आहे. म्हणून शेळीपालन करण्याचा विचार केला. हे क्षेत्र नवखं होतं, पण व्यवसायिक संधी मात्र भरपूर होत्या.

## मार्गदर्शन आणि दिशा

सन २०१५-१६ मध्ये पुण्यात कृषी व पशुप्रदर्शनात माझी ओळख डॉ. तेजस शेंडे सरांशी झाली. त्यांच्याशी संवाद साधला, माहिती घेतली आणि २०२१ मध्ये शेळीपालनास सुरुवात केली. श्रीनाथ म्हस्कोबा जोगेश्वरी गोट फार्म हे नाव ठेवलं आणि आपल्या शेतीतच गोठा उभारला.

## गुंतवणूक आणि व्यवस्थापन

शेळीपालनासाठी स्वतःचे पैसे आणि दागिने गहाण ठेवून ४-५ लाखांची गुंतवणूक केली. गोठा, गव्हाणी, चारा कुट्टी यंत्र अशा सगळ्या सोयी उभारल्या. मी व माझी पत्नी गोठ्यातली स्वच्छता, औषधोपचार, आणि चारा व्यवस्थापन पाहतो. घरच्यांचा पाठिंबा हा व्यवसाय टिकवण्यात महत्वाचा घटक ठरला.

## सुरवात आणि विस्तार

सुरुवात ०२ उस्मानाबादी शेळ्यांपासून केली. त्यांच्यापासून पहिली पिल्लं मिळाली, नर विकले आणि व्यवसाय सुरू झाला. पुढच्या टप्प्यात बिटल जातीच्या शेळ्या घेतल्या. त्याही उत्पादनक्षम ठरल्या.



विक्रीतून हळूहळू नफा दिसू लागला. २०२४ मध्ये बीटल आणि २०२५ मध्ये सोजात जातीच्या शेळ्या खरेदी करून व्यवसाय वाढवला.

## आजचे चित्र

आज माझ्या गोठ्यात ४६ शेळ्या आहेत. १४ बीटल, १८ सोजात, ११ उस्मानाबादी आणि पैदाशीचे ३ नर. सन २०२५ मध्ये मी ५२ किलो मटन विकून ३८,००० रुपये उत्पन्न मिळवलं. माझ्या व्यवसायाची खरी ताकद म्हणजे चारा व्यवस्थापन. एक एकरावर तुती, नेपियर, सुबाभूळ, शेवरी, हातगा यांसारखी चारा पिकं घेतो. शेळ्यांच्या आरोग्यासाठी वेळेवर लसीकरण आणि जंतनाशकाचं काटेकोर पालन करतो.

## यशाचे श्रेय

हे यश केवळ मेहनतीचं नाही, तर डॉ. तेजस शेंडे सरांचं वेळोवेळी मिळालेलं तांत्रिक मार्गदर्शन यामुळेच शक्य झालं. जातिवंत शेळ्यांची निवड, आरोग्य व्यवस्थापन, आणि बाजारपेठेची संधी या सगळ्या बाबी त्यांनी स्पष्ट केल्या. त्यांच्या सल्ल्याने मी योग्य निर्णय घेतल्यामुळे व्यवसायात मोठा बदल घडला. त्यामुळेच आज माझा व्यवसाय स्थिरस्थावर असून शेळीपालन हा फायदेशीर आणि टिकाऊ व्यवसाय बनला आहे.

## पुढील लक्ष्य

सन २०२७ पर्यंत १०० सोजात व बीटल जातीच्या शेळ्यांवर लक्ष केंद्रित करून बकरी ईदच्या पुणे मार्केट मध्ये विक्री करण्याचे लक्ष्य आहे. यशाचं खरं गमक म्हणजे पूर्वनियोजन, स्वतःचा गोठ्यावरचा वावर, आणि शास्त्रीय मार्गदर्शन. यासाठी मी स्वतःही सातत्याने शिकत राहतो, वाचन, चर्चा आणि प्रयोग यावर भर देतो.

## माझा संदेश

हे खरे आहे की, शेतीमध्ये अनिश्चितता आहे, पण जोडीला शेळीपालन केल्यास तीच शेती तुमचं भविष्य देखील घडवू शकते. अडचणींचं रूपांतर संधीमध्ये करणं हेच खऱ्या उद्योजकाचं लक्षण आहे, आणि मला आनंद आहे की, मी ते करतोय.


**मार्गदर्शक**

**डॉ. तेजस शेंडे**
सहयोगी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९९७०८३२१०५

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**जनार्दन आबासो धुमाळ**
मु.पो. वीर, ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२ ३१२
संपर्क क्र. ९९२२५३६१११

## शेळीपालनातून दारी आली समृद्धी

# दशरथ तांडेल यांची यशोगाथा



मी दशरथ लक्ष्मण तांडेल, वय वर्षे ५१, कुमदळ, ता. वाडा, जि. पालघर येथील निवासी. वडिलोपार्जित शेती हीच आमच्या कुटुंबाच्या उपजिविकेचे एकमेव साधन आहे. माझ्या वडिलांच्या निधनानंतर नऊ सदस्यांच्या कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर आली. शेती करून, वीटभट्टीवर काम करून, मजुरी करून घर चालवायचं हेच आमचं आयुष्य होतं. नोकरी मिळावी म्हणून मी प्रयत्न केला. मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगारासाठी अर्ज केला होता. पोलिस भरतीसाठी कॉल सुद्धा आला, पण यश काही मिळालं नाही. परिस्थिती बदलण्याचा मार्ग सापडत नव्हता.

## टर्निंग पॉईंट

तेव्हाच माझ्या आयुष्यात एक महत्त्वाचा टप्पा आला – फेब्रुवारी २०२० मध्ये आमच्या गावातच मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या पशुपोषण शास्त्र विभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर. हे आदिवासी उपयोजना शिबिर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अंतर्गत घेण्यात आले होते. घरबसल्या संधी मिळाल्यामुळे मी उत्साहाने सहभागी झालो. माझा उत्स्फूर्त सहभाग आणि आवडीमुळे माझी आठ दिवसांच्या निवासी शेळीपालन प्रशिक्षणासाठी निवड झाली. मार्च २०२० मध्ये मुंबईत हे प्रशिक्षण घेतलं आणि ते माझ्या आयुष्याला कलाटणी देणारं ठरलं. या प्रशिक्षणात मला डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. हिराचंद पालमपल्ले, डॉ. सलील हांडे आणि डॉ. गणेश गादेगांवकर यांचं अमूल्य मार्गदर्शन मिळालं. त्यांनी आम्हाला शेळ्यांची निवड, चारा उत्पादन, खाद्य मिश्रण, मुरघास, हायड्रोपोनिक्स, लसीकरण, जंतनिमूर्लन, आरोग्य व्यवस्थापन, सगळंच समजावून दिलं, तेही प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह.

## नफ्याचे गणित

आदिवासींसाठी शेळीपालन फायदेशीर आहे. यातून ग्रामीण भागात शाश्वत स्वरूपाचा रोजगार निर्माण होऊ शकतो, हे मी स्वतः अनुभवलं आहे. या वर्षभरात माझ्या शेळ्यांनी २९ पिल्लांना जन्म दिला आणि त्यांची विक्री करून मला या चालू वर्षी २ लाख ६० हजार रुपयांचं उत्पन्न मिळालं. ईदच्या सणासाठी बोकड विक्रीतूनही चांगलं उत्पन्न झालं. शेतीसाठी शेळ्यांचं लेंडी खत वापरल्यामुळे रासायनिक खतांचा खर्चही निम्म्यावर आला. अनेक तरुणांनी माझं उदाहरण पाहून या व्यवसायात रस दाखवला आहे.



## शेळीपालनास सुरुवात

मार्च २०२१ मध्ये मी शेळीपालन सुरू केलं. भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीच्या अनुसूचित जमाती योजनेअंतर्गत मला सात मादी शेळ्या आणि एक बोकड मोफत मिळाले. त्याचबरोबर तीन महिन्यांचे खाद्य, वजन काटा, ताडपत्री, पाणी व खाद्याची भांडी, घमेली, माप, प्लास्टिक कागद असे साहित्य सुद्धा मिळालं, तेही घरपोच. लसीकरण, विमा आणि वर्षभर तज्ज्ञांचं मार्गदर्शनही! मी जंगलातील लाकडाचा वापर करून शेळ्यांसाठी लाकडी पट्ट्यांचं घर तयार केलं. प्रशिक्षण आणि मार्गदर्शक डॉक्टरांच्या सततच्या सल्ल्यावर विश्वास ठेवत मी व्यवसाय सावरला.

## आत्मनिर्भर झालो !

आज मी स्वतः आत्मनिर्भर आहे. माझं कुटुंब सुरक्षित आहे. मी इतर शेतकऱ्यांना, युवकांना आणि महिलांना प्रोत्साहित करतो की, शेळीपालन हा केवळ व्यवसाय नाही, तर गरिबीवर मात करण्याचं साधन आहे.

## यशाचे श्रेय

या प्रवासात माझं यश फक्त माझं नाही. याचं संपूर्ण श्रेय मी मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातील माझ्या मार्गदर्शक तज्ज्ञांना आणि माझ्या कुटुंबातील सदस्यांना देतो. त्यांनी मला आत्मविश्वास दिला, ज्ञान दिलं, आणि संघर्षातून मार्ग दाखवला.

## माझा संदेश

कष्टाची तयारी ठेवा, ज्ञान मिळवा आणि शेळीपालनासारख्या शाश्वत व्यवसायातून आपल्या घरातच स्वयंरोजगाराचे साधन उभारा. गरज आहे फक्त जिद्दीची आणि ठाम निश्चयाची. योग्य वेळ, योग्य मार्गदर्शन आणि चिकाटी असेल तर कोणत्याही पार्श्वभूमीतून यशाचं स्वप्न साकार होऊ शकतं.

**मार्गदर्शक**

**डॉ. सुरेश जगदाळे**
सहाय्यक प्राध्यापक
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
संपर्क क. ९८६७९२९२१०

**डॉ. हिराचंद पालमपल्ले**
प्राध्यापक तथा उपसंचालक संशोधन
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
संपर्क क. ८१६९६०३२०९

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**दशरथ लक्ष्मण तांडेल**
मु. कुमदळ, ता. वाडा, जि. पालघर - ४२१ ३०३
संपर्क क्र. ८८०६२५२८१८

माफसू यशोगाथा २०२५

## शेळीपालनामुळे मिळाले नवजीवन; मजुरीपासून स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

# संतोष भगत यांची यशोगाथा



मी संतोष सदू भगत, कुमदळ गावचा. तालुका वाडा, जिल्हा पालघर. शिक्षण नववीपर्यंत झालं. पारंपारिक हंगामी भातशेती आणि शेतमजुरी हाच आमच्या कुटुंबाचा मुख्य आधार. एक एकर वडिलोपार्जित शेती, त्यावरच जगायचं. मजुरी करून पोट भरायचं. पण या सगळ्यातून आमचं कुटुंब आर्थिकदृष्ट्या फारसं वर येऊ शकलं नव्हतं.

### टर्निंग पॉईंट

२०२० साल माझ्या आयुष्यात वळण घेणारं ठरलं. आदिवासी उपयोजनेअंतर्गत मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या पशुपोषण विभागातर्फे कुंमदल गावातच दोन दिवसांचं प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक वर्ग आयोजित केला गेला. मी त्या वर्गात सहभागी झालो. त्यानंतर गोरेगाव प्रक्षेत्रावर आठ दिवसांचं निवासी प्रशिक्षणही पूर्ण केलं. डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. सलील हांडे आणि डॉ. जी.एम. गादेगावकर सरांनी दिलेलं आधुनिक तांत्रिक ज्ञान आणि त्यांच्या प्रात्यक्षिक अनुभवांनी माझी दिशाच बदलून टाकली.

### मार्गदर्शन आणि प्रशिक्षण

प्रशिक्षणाच्या आधारे मी शेळीपालन सुरू करायचं ठरवलं. डॉ. हांडे सरांच्या मार्गदर्शनानुसार मचाण पद्धतीने कमी खर्चात गोठा उभारला. फेब्रुवारी २०२१ मध्ये शेळीपालनाला सुरुवात झाली. योजनेअंतर्गत मला ७ मादी शेळ्या आणि १ पैदाशी बोकड मोफत मिळाला.

### सातत्य आणि मेहनत

मी प्रामाणिकपणे कष्ट करत शेळ्यांची संख्या वाढवण्यावर लक्ष केंद्रित केलं. प्रशिक्षणादरम्यान मोफत मिळालेल्या खुराक मिश्रणातले घटक वापरून घरगुती खाद्य तयार केलं, ज्यामुळे खाद्यखर्च कमी झाला आणि वजनवाढीतही फायदा झाला. या योजनेतून वजनकाटा, भांडी, बादल्या, माप, ताडपत्री, घमेली यासारखं आवश्यक साहित्यही मोफत मिळालं. लसीकरण, जंतनाशक आणि शेळ्यांचा विमा देखील योजनेतूनच मिळाला.



### खचलो पण हरलो नाही

पावसाळ्यात करडांमध्ये मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्याने मन खचलं होतं. पण मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे मी योग्य जंतनियंत्रण, लसीकरण आणि व्यवस्थापन पद्धती वापरल्या आणि मरतुक जवळपास संपुष्टात आली. आज माझ्याकडे २० लहान-मोठी मादी आणि नर करडे आहेत. त्यांच्या विक्रीतून मला दरवर्षी सुमारे ₹६०,०००/- उत्पन्न मिळतं. शेतात मचाण पद्धतीचा गोठा स्वतः बांधला, शेळ्यांकडून मिळणाऱ्या लेंडी खताचा वापर शेतीत करून उत्पादनात वाढ केली.

### अनुभव आणि व्यवस्थापन

सर्वात मोठा अनुभव म्हणजे मुलगा आजारी असताना उपचारासाठी पैसे नव्हते, पण दोन बोकड विकून उपचार शक्य झाले. त्या शेळ्यांनी मला नवसंजीवनी दिली. आज मी आणि माझी पत्नी हा व्यवसाय एकत्र चालवतो. शेळ्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवतो. आजारी शेळीवर तातडीने उपचार, वेळेवर लसीकरण, घरगुती खाद्य व शिस्तबद्ध व्यवस्थापन हे आमच्या यशाचं खरं सूत्र आहे.

### यशाचे श्रेय

या प्रवासात डॉ. एस.डी. जगदाळे, डॉ. एस.टी. हांडे सर यांचं मार्गदर्शन अमूल्य ठरलं. त्यांनी वेळोवेळी दिलेलं ज्ञान आणि मदतीमुळेच आम्ही संकटातून मार्ग काढू शकलो.

### पुढील लक्ष्य आणि संदेश

भविष्यात हा व्यवसाय वाढवण्याचा मानस आहे पण शास्त्रोक्त पद्धतीनेच. कोकणात भातशेतीसह शेळीपालन हा उत्तम जोडधंदा ठरू शकतो, हे मी अनुभवाने शिकलो. बेरोजगार तरुणांनी शास्त्रशुद्ध दृष्टिकोन ठेवून शेळीपालन केलं, तर ते आयुष्य बदलून टाकणारं ठरेल.


**मार्गदर्शक**

**डॉ. सुरेश जगदाळे**
सहाय्यक प्राध्यापक
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
संपर्क क्र. ९८६७९२९२१०

**डॉ. सलील हांडे**
सहयोगी प्राध्यापक
मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई
संपर्क क्र. ९७०२८१८३८३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**संतोष सदू भगत**
मु. कुमदळ, ता. वाडा, जि. पालघर - ४२१ ३०३
संपर्क क्र. ९०२९८३४९८९

माफसू
यशोगाथा
२०२५

## मंत्रालयातील नोकरी सोडून उभारले शेळ्यांचे साम्राज्य

# ब्रम्हाजी केंद्रे यांची यशोगाथा



मी ब्रम्हाजी माधवराव केंद्रे, लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात असलेल्या नावंदी गावाचा रहिवासी, मूळचा विधीशास्त्राचा विद्यार्थी. एल.एल.बी. पूर्ण करून मी मंत्रालयात कायदेशीर सहाय्यक म्हणून नोकरी करीत होतो. पण खरं सांगायचं तर, त्या टेबल-खुर्चीच्या दुनियेत मन रमलेच नाही. मला जमिनीशी, माझ्या मातीशी, माझ्या माणसांशी जोडलेलं काहीतरी करायचं होतं. म्हणून ठाम निर्णय घेतला आणि नोकरी सोडून गावाकडे परत आलो.

## आणि... निर्णय झाला !

गावाकडची शेती डोंगराळ, पाण्याचं दुर्भिक्ष्य, उत्पन्न अत्यंत मर्यादित. पण हार मानणं स्वभावात नव्हतं. म्हणून शेतीला पूरक ठरेल असा शेळीपालन व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. २०१६ साली पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे शेळीपालनाचं सखोल प्रशिक्षण घेतलं. यामध्ये माझा पहिला आधार झाले, डॉ. प्रफुल्लकुमार वसंतराव पाटील सर. त्यांनी मला व्यवसायाचा मूलभूत पाया समजावून दिला आणि आत्मविश्वास दिला.

## व्यवसायाला सुरुवात

प्रशिक्षण पूर्ण करताच, मी १२ उस्मानाबादी शेळ्या विकत घेऊन शेळीपालनास प्रारंभ केला. सुरुवात लहान होती, पण स्वप्न मोठं होतं. सध्या माझ्याकडे उस्मानाबादी, सिरोही व सोजत जातींचं एकूण २७५ शेळीवर्गीय पशुधन आहे. गोठा दोन भागांत विभागलेला आहे. १५ x ७० फूट व २२ x ५५ फूट असे दोन शेड्स. त्याशिवाय १० गुंठे जागा मुक्त संचारासाठी राखून ठेवली आहे. शेळ्यांना सकस चारा मिळावा म्हणून सुबाभूळ, दशरथ इत्यादी चाऱ्याची लागवड स्वतःच केली आहे. रोज सकाळी शेळ्यांना चरायला नेतो आणि संध्याकाळी शेडमध्ये घेऊन येतो.

माझ्या या कामात माझ्या तीन मजूरांचा हातभार असतो, पण मुख्य नियोजन मी स्वतः करतो. शेळ्यांच्या आरोग्याचं व्यवस्थापन, वेळेवर लसीकरण आणि चाऱ्याचं काटेकोर नियोजन हे आता माझ्या व्यवसायाचं अंग झालं आहे. एकदा २०२० साली करडांची मरतूक मोठ्या प्रमाणात झाली. मनात थोडं धस्स झालं होतं. पण डॉ. पाटील सर आणि इतर पशुवैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपाययोजना केल्या आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं.



## नफ्याचे गणित

आज माझ्या शेळीपालनातून दरवर्षी सुमारे १२ लाख रुपयांचं उत्पन्न मिळतं, त्यामध्ये ८ लाख खर्च वजा जाता ४ लाख नफा उरतो. जरी नफा कमी वाटत असला तरी सध्याचं पशुधन हे सुमारे १५ लाख रुपये मूल्यासमान आहे, जे माझ्या व्यवसायाच्या भविष्याची ग्वाही आहे. बोकडांची विक्री मी रु. ४२० प्रति किलो जिवंत वजन या दराने करतो.

उत्पन्नाबरोबरच मला आत्मिक समाधानही मिळतं, कारण हा व्यवसाय समाजात नवा दृष्टिकोन निर्माण करतो आहे. आज माझ्या शेळीपालन फार्मला बँका सुद्धा स्वतःहून कर्जसहाय्य देण्यास तयार असतात. अनेक शेतकरी, युवक फार्मला भेट देऊन सल्ला मागतात, मार्गदर्शन घेतात. माझा प्रवास त्यांच्यासाठी एक प्रेरणा ठरतो, हेच माझं सर्वात मोठं यश.

## पुढील ध्येय

भविष्यात मी ५०० शेळ्यांचं आधुनिक, पूर्णपणे बंदिस्त शेळीपालन केंद्र उभारण्याचं स्वप्न पाहतो आहे. माझं तत्व स्पष्ट आहे की, व्यवसाय करताना स्वतःला झोकून द्यायचं, योग्य नियोजन करायचं, सतत मार्गदर्शन घ्यायचं आणि शिकत राहायचं. यश ही एक प्रक्रिया आहे आणि मी अजूनही त्या प्रक्रियेत प्रामाणिकपणे समर्पित आहे.

## यशाचे श्रेय

माझं यश फक्त माझं नाही, यामध्ये डॉ. पाटील सरांचं सातत्यानं लाभलेलं मार्गदर्शन, माझ्या मजूरांचा आणि कुटुंबाचा पाठिंबा आणि माझ्या चिकाटीमुळे हे शक्य झाले आहे. या प्रवासात आलेल्या अडचणींना संधीमध्ये बदलण्याची ताकद या सर्वांनीच मला दिली.

## माझा संदेश

माझा तरुणांना एकच सल्ला आहे की, नोकरी सोडून मेहनतीने स्वतःच्या पायावर उभं राहा. व्यवसायात शिरण्यापूर्वी शिका, समजा आणि मग उंच उडी घ्या. यश तुमच्यापाशी नक्कीच चालत येईल. कारण धैर्य, दिशा आणि प्रयत्न यांचं बरोबर सूत्र जमलं की, शेळ्यांच्या गोठ्याचंही साम्राज्य बनू शकतं!


**मार्गदर्शक**

**डॉ. प्रफुल्लकुमार पाटील**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८३२९७३५३१४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**ब्रम्हाजी माधवराव केंद्रे**
मु.पो. नावंदी, ता. उदगीर, जि. लातूर - ४१३ ५१७
संपर्क क्र. ९८८१९२५२२४

पदवीधर ते प्रगतशील शेळीपालक: एक सफल प्रवास

# हरिश्चंद्र घुगे यांची यशोगाथा



मी हरिश्चंद्र शाहूराव घुगे, घुगेवाडी (ता. शिरूर, जि. बीड) येथील एक सर्वसामान्य, पण ध्यासाने झपाटलेला तरुण. शिक्षण घेतलं एम.ए. मराठीपर्यंत आणि मग सुरु झाला संघर्षाचा काळ.

पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक अशा असंख्य नोकरीच्या प्रयत्नांतून मला अपयशच पदरी पडलं. शेती होती, पण ७८ गुंठ्याच्या कोरडवाहू जमिनीतून फारसं उत्पन्न मिळत नव्हतं. या सगळ्यातून एक प्रश्न मनात उमटत होता, आता पुढे काय?

## मार्गदर्शनाने मिळाली दिशा

याच काळात, पशुपालन व दुग्धव्यवसाय पदविका अभ्यासक्रम करत असताना आष्टी येथे डॉ. प्रफुल्लकुमार पाटील सरांची भेट झाली. त्यांचं मार्गदर्शन आयुष्याला दिशा देणारं ठरलं. त्यांनी दिलेल्या प्रेरणेतूनच मी २०२१ मध्ये शेळीपालनाचा व्यवसाय सुरू केला.

## मेहनतीच्या बळावर घेतली झेप

सुरुवात फार मोठी नव्हती, फक्त एका शेळीपासून. पण आता माझ्याकडे २७ मोठ्या शेळ्या (उस्मानाबादी व बिटल), ३ बोकड आणि ३० लहान पिल्ले, असं एकूण ६० शेळीवर्गीय पशुधन आहे. कोणतंही कर्ज नाही, कोणतीही शासकीय योजना नाही. सगळं स्वतःच्या जिद्दीवर आणि मेहनतीवर उभं केलेलं.

## व्यवस्थापन

शेळ्यांसाठी ५० x ४० फुटांचं २००० स्क्वे. फुट शेड, चाऱ्यासाठी १५ गुंठे मेथीघास, १० गुंठे दशरथ आणि १५ गुंठे सुपर नेपियर अशी स्वतंत्र लागवड. हे सगळं मी, माझी पत्नी आणि वडील मिळून सांभाळतो. शेळीपालनातल्या तांत्रिक बाबी, व्यवस्थापन आणि उत्पादन नियोजन यासाठी मी "किफायतशीर शेळीपालन" प्रशिक्षण पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे पूर्ण केलं आणि वेळोवेळी डॉ. पाटील सरांचं मोलाचं मार्गदर्शन घेतलं.



सर्व शेळ्या घरच्या घरी पिलांपासून वाढवलेल्या आहेत आणि त्यांचं प्रजननचक्रही ठरलेलं आहे. प्रत्येकी दोन पिलं आणि चौदा महिन्यांत दोन वेळा वेत देणं. एक शेळीने तर पाच पिलं एकदम देऊन सगळ्यांना आश्चर्यचकीत केलं!

## नफ्याचे गणित

आज माझं वार्षिक उत्पन्न ₹४ ते ₹४.५ लाखांपर्यंत आहे, आणि फक्त ₹१ लाख खर्च वजा गेल्यावर ₹३ ते ₹३.५ लाख निव्वळ नफा मिळतो. ह्याच उत्पन्नातून मुलीचं शिक्षण सुरू आहे आणि संपूर्ण घरखर्चही चालतो. संकटं आली, पण मी मागे हटलो नाही कारण उद्दिष्ट स्पष्ट होतं. मी मिळालेल्या नफ्यातूनच व्यवसायात पुनर्गुंतवणूक करत गेलो, त्यामुळे व्यवसाय आणखी विस्तारत गेला. कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळालं आणि मी आत्मनिर्भर झालो.

## इतरांना मार्गदर्शन

सध्या मी १० जणांना शेळीपालनात मार्गदर्शन करून व्यवसायात उतरवलं आहे. माझ्या अनुभवाच्या जोरावर आज मी एक मार्गदर्शक म्हणूनही ओळखला जातो. आपलं यश तेव्हाच पूर्ण होतं, जेव्हा ते दुसऱ्यांनाही प्रेरणा देतं आणि मला हे समाधान मिळालं आहे.

## यशाचे श्रेय

मी यशाचं संपूर्ण श्रेय माझ्या कुटुंबाला आणि विशेषतः डॉ. प्रफुल्लकुमार पाटील सरांना देतो. त्यांनी वेळोवेळी दिलेलं मार्गदर्शन, व्यवस्थापन कौशल्य आणि चारा उत्पादन यामुळेच मी आज इथं पोहोचलोय.

## माझा संदेश

मेहनतीला पर्याय नाही. जिद्द आणि चिकाटी ठेवा, शास्त्रशुद्ध मार्गदर्शन घ्या आणि कोणताही व्यवसाय मोठ्या आत्मविश्वासाने करा. यश तुमच्या पायाशी लोळण घेईल! स्वतःवर विश्वास ठेवा, सुरुवात लहान असली तरी, दृष्टिकोन मोठा ठेवा, कारण दिशा मिळाली, की ध्येय गाठता येतं.

**मार्गदर्शक**

**डॉ. प्रफुल्लकुमार पाटील**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८३२९७३५३१४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**हरिश्चंद्र शाहुराव घुगे**
मु. घुगेवाडी पो. खोकरमाथा, ता. शिरूर कासार जि. बीड - ४१४ २०५
संपर्क क्र. ९४०४६५२८६३

माफसू यशोगाथा २०२५

# शेतीला शेळीपालनाची जोड देऊन यशाचा प्रवास
# वाघंबर सूर्यवंशी यांची यशोगाथा



मी वाघंबर प्रल्हाद सूर्यवंशी, एका छोट्या शेतकरी कुटुंबातील आहे. वडिलोपार्जित केवळ चार एकर शेती, त्यातूनही उत्पन्न इतकं मर्यादित की कुटुंबाचा खर्च चालवणंही कठीण व्हायचं. पण एक गोष्ट ठरवली होती की, परिस्थितीशी झगडायचं, पण हार मानायची नाही. दैनंदिन गरजांपासून ते मुलांच्या शिक्षणापर्यंत प्रत्येक जबाबदारी डोक्यावर होती, पण डोळ्यात स्वप्नं होती.

सन २०१८ मध्ये मी ९ शेळ्या आणि १ बोकड घेऊन शेळीपालनाचा निर्णय घेतला. खरं सांगायचं तर सुरुवातीला याचं फार काही ज्ञान नव्हतं. त्यामुळे मी पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे शेळीपालनाचं प्रशिक्षण घेतलं. तिथे डॉ. प्रफुल्लकुमार पाटील सर आणि डॉ. मत्स्यगंधा पाटील मॅडम यांचं तांत्रिक मार्गदर्शन मिळालं. चारा व्यवस्थापन, आहार, आरोग्य आणि रोग नियंत्रणाबाबत त्यांनी वेळोवेळी शिकवलं. आजही मी त्यांच्या मार्गदर्शनात नव्या गोष्टी शिकत आहे. त्यांच्या सल्ल्यामुळेच मी अडचणींना संधीमध्ये बदलू शकलो.

## व्यवसायाचा पाया

मी कर्ज न घेता १६x४० फुटाचा बंदिस्त गोठा आणि ४०x४० फुटाचा मुक्त गोठा तयार केला. गोठ्याची स्वच्छता, करडांचं संगोपन, औषधोपचार हे सर्व कुटुंबीय मिळून करतो. आई-वडील, पत्नी आणि मी एकत्र सर्व गोष्टी सांभाळतो. कुटुंबाचं आधारभूत योगदान हाच माझ्या व्यवसायाचा खरा कणा आहे.

## चारा हेच मूलधन

शेतीतील ४ एकरपैकी १ एकरवर मेथीघास, दशरथ, सुबाभुळ आणि सुपर नेपीयर लागवड केली. उरलेल्या ३ एकरमध्ये सोयाबीन. त्यामुळे जनावरांसाठी वर्षभर चारा आणि आर्थिक स्थैर्य दोन्ही मिळालं. चारा व्यवस्थापन हे शेळीपालनाच्या केंद्रस्थानी असतं, हे मला त्यांच्या मार्गदर्शनामुळे समजलं.

## आजची स्थिती

आज माझ्याकडे २५ मोठ्या शेळ्या आणि २८ पिल्लं, एकूण ५३ शेळ्यांचं पशुधन आहे. शेतीतून जेमतेम १ लाख रुपये मिळतात, पण



शेळीपालनातून वार्षिक ₹३.५ लाखांहून अधिक उत्पन्न मिळतं. खर्च ₹५५,००० ते ₹६०,००० असतो आणि त्यामुळे निव्वळ नफा ₹२.९५ लाखांहून अधिक मिळतो. आमचा घरखर्च, भावाचं C.A. शिक्षण, सगळं याच व्यवसायावर चालतं. एक काळ असा होता की मुलांचे शैक्षणिक खर्चही शक्य नव्हते, आणि आज त्यांच्या भविष्यासाठी बचत करता येते.

## उद्योजकतेची वाटचाल सुरूच...

माझं स्वप्न आहे की १०० शेळ्यांचा आधुनिक गोट फार्म उभारायचा. केवळ उत्पन्नाचं साधन नाही, तर इतरांना रोजगारही द्यायचा. एक वेळ होती की, शेतीतून घरखर्चही भागायचा नाही. पण आता शेळीपालनामुळे माझं संपूर्ण कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम झालं आहे. हे यश केवळ माझं नाही, तर माझ्या संपूर्ण कुटुंबाच्या सहकार्याचं फलित आहे.

## यशाचे श्रेय

या यशाचं खरं श्रेय मी माझ्या कुटुंबाला, मार्गदर्शक तज्ज्ञांना आणि अथक मेहनतीला देतो. आई-वडील आणि पत्नीने सुरुवातीपासून शेळीपालनाच्या प्रत्येक टप्प्यावर साथ दिली. करडांची निगा, गोठ्याची स्वच्छता, चारा साठवण यापासून ते विक्री व्यवस्थापनापर्यंत सगळं आम्ही एकजुटीने केलं. त्याचबरोबर डॉ. प्रफुल्लकुमार पाटील सर आणि डॉ. मत्स्यगंधा पाटील मॅडम यांचं तांत्रिक मार्गदर्शन हे माझ्या व्यवसायाचा खंबीर आधार ठरलं. त्यांच्या सल्ल्यामुळे मी चुका टाळल्या आणि योग्य दिशा निवडली.

## माझा संदेश

शेती कमी असली किंवा नसली तरी संधी अनेक असतात, फक्त मनात असावी जिद्द आणि बरोबर हवे असते योग्य मार्गदर्शन. शेतीला पूरक व्यवसाय निवडा, अभ्यास करा, प्रशिक्षण घ्या आणि मेहनत करा, यश नक्कीच मिळेल. शिकणं थांबवू नका आणि घाम गाळायला कधी घाबरू नका, कारण यश शॉर्टकटने नाही, तर चिकाटीने मिळतं.


**मार्गदर्शक**

**डॉ. प्रफुल्लकुमार पाटील**
प्रक्षेत्र व्यवस्थापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८३२९७३५३१४

**डॉ. मत्स्यगंधा पाटील**
सहयोगी प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९८३४१३९५९६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**वाघंबर प्रल्हाद सूर्यवंशी**
हंगरगा, ता. निलंगा, जि. लातूर -४१३ ५२१
संपर्क क्र. ९६६५९०८०२०

# कुक्कुटपालन



## लेयर खाद्य तयार करून कमवला नफा आणि आत्मविश्वास
# प्रदीप कोंडे यांची यशोगाथा



मी प्रदीप नंदकुमार कोंडे, पुणे जिल्ह्यातील केळवडे गावातला, एम.ए. पर्यंत शिक्षण घेतलेला तरुण. आमच्याकडे वडिलोपार्जित १.५ एकर शेती आहे. वडील खताचं दुकान चालवायचे, पण कोरोना काळात दुकान बंद झालं आणि घरचा आर्थिक डोलारा कोसळला. त्यामुळे शेतीवर भर देत असतानाच, मला काहीतरी वेगळं, स्थिर आणि कायम उत्पन्न देणारं काम करायचं होतं.

### ॲग्रोवनने दिली दिशा

मी सकाळ वृत्तपत्र समूहाचे 'ॲग्रोवन' या पुरवणी वार्तापत्राचा नियमित वाचक आहे. त्यातूनच मला क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथील तज्ज्ञांनी लिहिलेला कुक्कुटपालन विषयक लेख वाचायला मिळाला. त्यानंतर मी थेट कुक्कुटपालन शास्त्र विभागाला भेट दिली आणि डॉ. अविनाश कदम व डॉ. विजयसिंह लोणकर सरांचं मार्गदर्शन घेतलं. त्याच वेळी मी लेयर पक्षीपालन सुरू करायचं ठरवलं.

### पायाभूत रचना आणि प्रारंभिक गुंतवणूक

जुलै २०२१ मध्ये केळवडे विकास कार्यकारी सोसायटीकडून ₹१५ लाख कर्ज घेतलं आणि स्वतःकडून ₹१० लाख सोनेतारण कर्ज उचलले. एकूण ₹ २५ लाखांच्या भांडवली गुंतवणुकीतून मी ३०८० पक्ष्यांसाठी पिंजरा पद्धतीचं शेड उभारलं. त्यासाठी पिंजरा खर्च ₹३,५४,२००, शेड खर्च ₹१२ लाख आला आणि जुलै २०२१ मध्ये ३१०० लेयर पक्षांची पहिल्या बॅचसोबत सुरुवात केली. मी, माझी पत्नी आणि वडील मिळूनच या पक्षांचे संगोपन आणि विक्री व्यवस्थापन करतो.

### स्वत: खाद्य तयार करण्याचा निर्णय

सुरुवातीला बाजारातून ₹३२ प्रति किलोने खाद्य विकत घ्यावं लागायचं. खाद्य महाग झाल्यामुळे माझा व्यवसाय थोडा अडचणीत आला. त्याच वेळी डॉ. अविनाश कदम व डॉ. विजयसिंह लोणकर सरांनी मार्गदर्शन केलं की स्वतः खाद्य तयार केल्यास खर्च कमी होईल. सप्टेंबर २०२२ मध्ये ₹१.७५ लाख खर्च करून मिक्सर-ग्राइंडर घेतलं आणि स्वतः खाद्य बनवायला सुरुवात केली. हे खाद्य तयार करताना वयानुसार, उत्पादन व वजनानुसार खाद्य सूत्र विभागाकडून मिळायचं. प्रति किलो खाद्यामागे ₹२ ची बचत झाली, म्हणजे रोज ₹६०० आणि महिना ₹१८,००० ची बचत.



### अंडी उत्पादनातून आर्थिक यश

पहिली बॅच (३१०० पक्षी) यासाठी खेळते भांडवल ₹४२.९० लाख आणि नफा ₹९ लाख, या नफ्यातून कर्ज फेडण्यास मदत झाली. दुसरी बॅच (जुलै २०२३) ३४५० पक्षी, ही बॅच जानेवारी-फेब्रुवारी २०२५ ला संपली व ₹१२ लाखांचा नफा झाला, माझे कर्ज सुद्धा फिटले. आता तिसरी बॅच एकूण ५००० पक्षी सध्या प्रस्तावित असून ऑगस्ट २०२५ पासून सुरू होईल. म्हणजेच आधीच्या बॅचमधील ३००० पक्षी आणि नव्या शेडमध्ये ५००० पक्षी यांमुळे माझ्या नफ्यात आणखी भर पडणार आहे.

### खाद्य निर्मिती आणि विक्री व्यवस्थापन

स्वतः खाद्य तयार केल्यामुळे खर्चावर नियंत्रण मिळालं, गुणवत्ता वाढली, व्यवसाय फायदेशीर झाला. अंडी विक्रीही मी स्वतः किरकोळ विक्रेत्यांमार्फत करतो, त्यामुळे मध्यस्थांचा खर्च वाचतो. ग्राहकांशी थेट संपर्क ठेवल्याने त्यांचा विश्वास जिंकता आला आणि विक्रीत सातत्य राहिलं. यामुळे उत्पादनाचा योग्य दर मिळाला आणि बाजारपेठेत माझी ओळख निर्माण झाली.

### यशाचे श्रेय

माझा सगळा प्रवास डॉ. अविनाश कदम आणि डॉ. विजयसिंह लोणकर यांच्या तंत्राधारित मार्गदर्शनामुळे यशस्वी झाला. ते सतत खाद्य सूत्र आणि व्यवस्थापनाच्या बाबतीत मार्गदर्शन देतात. त्यांचा मी ऋणी आहे.

### माझा संदेश

अंडी उत्पादन व्यवसाय फायदेशीर व्हायचा असेल, तर स्वतः खाद्य तयार करणं ही गरज आहे. योग्य मार्गदर्शन, नियंत्रित खर्च, आणि थेट विक्री हे तीन घटक पाळले, तर कोणत्याही नव्या कुक्कुटपालकाला यश निश्चित आहे!

**मार्गदर्शक**

**डॉ. अविनाश कदम**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९३७१२७५६२०

**डॉ. विजयसिंह लोणकर**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७८७५५७०३९२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रदीप नंदकुमार कोंडे**
मु. पो. केळवडे, ता. भोर, जि. पुणे - ४११ २१३
संपर्क क्र. ९५६१३९०५०३

**माफसू यशोगाथा २०२५**

'एगवाला' - लेयर व्यवसायाचा यशस्वी प्रवास

# विशाल धुमाळ यांची यशोगाथा



माझं नाव विशाल दिलीप धुमाळ. मी केळवडे, तालुका भोर, जिल्हा पुणे इथला रहिवासी आहे. माझा जन्म १ मे १९८७ रोजी झाला, सध्या माझं वय ३७ वर्षे असून माझे आई-वडील, पत्नी, एक मुलगी आणि मी अशा पाच माणसांचं आमचं छोटंसं पण जिव्हाळ्याचं कुटुंब आहे. वडील ट्रक ड्रायव्हर. २००४ ते २०२० या काळात मी भारतीय सैन्यात जवान म्हणून सेवा दिली. पण ऑगस्ट २०२० मध्ये मी सेवानिवृत्त झालो.

गावाकडची शेती पडीक होती. नोकरीतून मिळालेली रक्कम हातात होती, पण काय करावं याचा निर्णय घ्यायचा होता.याच वेळी मी व्यवसायाच्या संधी शोधू लागलो आणि 'लेयर पोल्ट्री' व्यवसायाकडे लक्ष गेलं. यामध्ये स्वतः खाद्य तयार करता येतं, अंड्यांची विक्री शक्य असते आणि व्यवस्थित नियोजन केलं तर चांगला नफा मिळतो, ही गोष्ट मला जास्त भावली.

## व्यवसाय वृद्धी आणि आर्थिक प्रगती

सन २०२१ मध्ये क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळ इथल्या कुक्कुटपालन विभागाशी संपर्क साधला. डॉ. अविनाश कदम सर व डॉ. विजयसिंह लोणकर सर यांचं मार्गदर्शन घेतलं. तसेच फार्मला भेट देऊन माहिती घेतली. सप्टेंबर २०२१ मध्ये ३००० लेयर पक्ष्यांसाठी १० लाख खर्च करून १२० x ३८ फूटचं शेड उभारलं. पिंजऱ्यासाठी ३.५ लाख आणि फीड मिलसाठी १ लाख असे एकूण १४.५० लाख रुपये गुंतवले.

त्यानंतर ७.८० लाख खर्च करून १५ आठवड्यांचे ३२०० पक्षी विकत घेतले. पहिल्या बॅचचा एकूण खर्च ५४.९४ लाख, आणि विक्रीतून ६०.३० लाख उत्पन्न म्हणजे ५.३६ लाख नफा. सरासरी २९००० रुपये मासिक नफा. दुसऱ्या बॅचमध्ये पक्षांची संख्या वाढवून ६००० केली. आज मी प्रति अंडे ₹१ नफा कमावतो.

## 'एगवाला' - नवे प्रयोग व व्यवस्थापन

सुरुवातीला खाद्य विकत घेतल्यामुळे खर्च जास्त होता. नंतर तज्ज्ञांच्या सल्ल्याने खाद्य तयार केल्यामुळे खाद्यावरील खर्च प्रती किलो २८ रुपयांवरून २५ रुपये किलोपर्यंत कमी झाला. आज स्वतःची फीड मिल आहे आणि इतर फार्मसाठीही खाद्य पुरवतो. 'एगवाला' या नावाने अंडी ट्रेडिंग सुरू केली. टाटा, बजाज, टेट्रा पॅक, महिंद्रा वर्ल्ड कॉलेज इत्यादी कंपन्यांना व संस्थांना अंडी पुरवतो. अंडी ट्रेडिंगसाठी स्वतःच्या फार्मवरील उत्पादित अंडी व नजीकच्या फार्मवरील अंडी विकत घेऊन दर महिन्याला चार लाख अंड्यांची विक्री करतो.



## व्यवसायातील चढउतार

सुरुवात करताना संपूर्ण भांडवल स्वतःच्या पगारातून गुंतवलं. कोणतंही अनुदान, कर्ज घेतलं नाही. सुरुवातीला खाद्य खर्च फार वाढला होता. तज्ज्ञांशी संपर्क ठेवला नसता तर तोटा निश्चित होता. पण मी प्रत्येक संकटातून मार्ग शोधला आणि व्यवसायात सातत्य ठेवलं. आज माझ्याकडे ६००० पक्षी आहेत, ८६% अंडी उत्पादन दर आहे.

## यशाचे श्रेय

या व्यवसायाच्या यशामध्ये डॉ. अविनाश कदम सर आणि डॉ. विजयसिंह लोणकर सर यांचं मार्गदर्शन मोलाचं ठरलं. त्यांनी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन, आरोग्य तपासणी व आहार नियोजनाबाबत अमूल्य सल्ला दिला.त्यांच्या प्रेरणेमुळेच मी व्यवसायात नवे प्रयोग करायला धजावलो आणि सातत्याने प्रगतीचा मार्ग स्वीकारला.माझं यश केवळ माझं नाही तर माझ्या कुटुंबाचं आहे. व्यवसायात त्यांचं पाठबळ खऱ्या अर्थानं बळ देतं.

## माझा संदेश

मी नव्या व्यवसायात उतरलो, माहिती घेतली, विश्लेषण केलं आणि अनुभव घेतला. तज्ज्ञांचा सल्ला, व्यवस्थापन आणि सातत्य यामुळे यश मिळालं. कोणताही व्यवसाय सुरू करण्याआधी त्याची सखोल माहिती घ्या, लक्ष केंद्रित ठेवा, यश नक्की मिळेल.


**मार्गदर्शक**

**डॉ. अविनाश कदम**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९३७१२७५६२०

**डॉ. विजयसिंह लोणकर**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७८७५५७०३९२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**विशाल दिलीप धुमाळ**
मू. पो. केळवडे, ता. भोर, जि. पुणे - ४११ २१३
संपर्क क्र. ७२१९३०६००६

माफसू यशोगाथा २०२५

# नैसर्गिक आपत्तीवर मात करून उभारले आत्मनिर्भर मांसल कुक्कुटपालन केंद्र
# गौरव खोडे यांची यशोगाथा



मी गौरव अनिलराव खोडे, कोटंबा या माझ्या गावी शेती हा पारंपारिक व्यवसाय असूनही माझा कल नेहमीच शेतीपूरक व्यवसायांकडे होता. सन २०१७ मध्ये वडिलांचे निधन झाले आणि कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर आली. शेतीतून मिळणारे उत्पन्न पुरेसे नव्हते आणि नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन सातत्याने धोक्यात येत होते. म्हणून मी ठरवले... शेतीपूरक व्यवसाय करायचाच!

## टर्निंग पॉईंट - प्रशिक्षणातून मिळालेली दिशा

कोणताही व्यवसाय करायचा असेल तर शास्त्रोक्त माहिती हवी, म्हणून २१ ते २५ सप्टेंबर २०२० दरम्यान मी पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे डॉ. नरेंद्र खोडे आणि डॉ. राम कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मांसल कुक्कुटपालन प्रशिक्षण घेतले. त्या प्रशिक्षणात शेड व्यवस्थापन, पिल्ले निवड, लसीकरण, खाद्य आणि आर्थिक विश्लेषण यासारख्या महत्त्वाच्या बाबी शिकल्या. हेच माझ्या यशाचं खरं बीज ठरलं.

## प्रतिकूलतेतून प्रगतीची दिशा

सन २०२१ मध्ये मी ३० x २०० फूट आकाराचे शेड उभारायला घेतले. पण गारपीट, अतिवृष्टी यामुळे शेतीचं उत्पन्न कोसळलं. शेडही वेळेत पूर्ण होऊ शकलं नाही. पण मी हार मानली नाही. शेवटी, भारतीय स्टेट बँक बाभूळगाव शाखेचे श्री. अभिषेक भालेकर आणि श्री. संदीप धस यांच्या सहकार्याने मला ८ लाख रुपयांचे कर्ज मिळाले. उर्वरित भांडवल मी टप्प्याटप्प्याने उभं केलं.

## शेड उभारणी - बदलाची सुरुवात

मार्च २०२३ मध्ये शेड पूर्णत्वास आलं. आणि लगेचच मी वेंकटेश्वरा हॅचरीज प्रा. लि. कंपनीसोबत करार केला. या कराराअंतर्गत कंपनीकडून मला लसीकरण केलेली पिल्लं, खाद्य, औषधे आणि आरोग्य सेवा मिळते. कंपनी स्वतःच ब्रॉयलर पक्षी खरेदी करते.



## यशाची पायरी

आजपर्यंत चार बॅचेस पूर्ण झाल्या असून, दर बॅचमागे सरासरी ₹६०,००० नफा मिळतो. म्हणजे मासिक सरासरी ₹३०,००० उत्पन्न होतं आहे. शेतीसोबत हा नियमित उत्पन्नाचा स्रोत तयार झाला आहे. माझा धाकटा भाऊ सौरव माझ्यासोबत काम करतो. रोजंदार देखील मदतीला आहे.

## मार्गदर्शनाचे बळ

या प्रवासात पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथील डॉ. नरेंद्र खोडे सर आणि डॉ. राम कुलकर्णी सरांचे सतत मार्गदर्शन मला लाभले. बँकेचा प्रकल्प अहवाल तयार करणे, शेडला वेळोवेळी भेट देणे, व्यवसायाच्या बारकाव्यांचे प्रशिक्षण देणे हे सगळं त्यांनी अत्यंत मनापासून केलं. आजही काही शंका असली, तर मी सरांशी संपर्क साधतो आणि मार्गदर्शन घेतो. प्रशिक्षण, योग्य व्यवस्थापन, मेहनत आणि चिकाटी हीच माझ्या यशाची सूत्रं आहेत, हे मी ठामपणे सांगतो.

## भविष्यातील दृष्टीकोन

माझं पुढचं उद्दिष्ट म्हणजे शेडचे क्षेत्र वाढवणे आणि दुग्ध व्यवसाय सुरू करणे. दोन व्यवसाय एकत्र करून उत्पन्न अधिक शाश्वत करायचं माझं लक्ष्य आहे. कुक्कुटपालनामुळे मला हाताला बारमाही काम मिळालं आणि त्यातून नियमित आर्थिक स्थैर्यही. आज माझी ओळख केवळ शेतकरी म्हणून नाही, तर एक यशस्वी व्यावसायिक म्हणून झाली आहे.

## माझा संदेश

शेतीच्या जोखमींना तोंड देण्यासाठी शास्त्रशुद्ध शेतीपूरक व्यवसाय हा एक शाश्वत पर्याय आहे. प्रशिक्षित व्हा, मार्गदर्शन घ्या आणि शाश्वत उत्पन्नासाठी स्वतःचा मार्ग तयार करा.


**मार्गदर्शक**

**डॉ. नरेंद्र खोडे**
प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८६६८९४७२५०

**डॉ. राम कुलकर्णी**
सहाय्यक प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ७७७६८७१८००

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**गौरव अनिलराव खोडे**
मु. पो. कोटंबा, ता. बाभूळगाव, जि. यवतमाळ - ४४५१०१
संपर्क क्र. ८७६७१४५३३२

# माफसू यशोगाथा २०२५

## तंत्रज्ञान आणि मेहनतीच्या जोडीने विदर्भात कुक्कुटपालन क्रांती

# शिवराज मेटकर यांची यशोगाथा



मी शिवराज रविंद्र मेटकर, वय अवघं २३. पण आज माझ्या पोल्ट्री युनिटमधून दररोज तयार होणारी १.२ लाख अंडी आणि वर्षाला होणारी ₹१५ कोटींची उलाढाल मला कोणत्याही मल्टिनॅशनल कंपनीच्या सीईओ इतका आत्मविश्वास देते. माझ्या या यशामागे केवळ मेहनत नाही तर नवीन तंत्रज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, वेळोवेळी मिळालेलं मार्गदर्शन आणि समाजाभिमुख पर्यावरणपूरक दृष्टी यांचा तो परिणाम आहे.

## सुरुवात एका छोट्या स्वप्नाने

मी अगदी लहानपणापासूनच वडिलांसोबत शेतीच्या कामांमध्ये लक्ष घालत होतो. वयाच्या १६ व्या वर्षी मनात एक छोटसं स्वप्न पेरलं गेलं की, स्वतःचं पोल्ट्री युनिट उभारायचं. घरच्यांनी पाठिंबा दिला, वडिलांनी व्यवसायासाठी प्रेरणा दिली आणि मी शंभर कोंबड्यांपासून सुरुवात केली. शिकण्याची जिद्द होती. मी काम करत अभ्यास पूर्ण केला. अ‍ॅग्रो बिझनेस मॅनेजमेंट अभ्यासक्रमाला असतानाच व्यवसाय वाढवत नेला आणि शाश्वत उत्पादनासाठी विज्ञानाच्या आधारे काम करायचं ठरवलं.

## कुक्कुटपालनाचे नवे पर्व

१९९४ साली माझ्या वडिलांकडे फक्त ४०० पक्षी होते. पुढे ५ लाखांचं कर्ज घेऊन ४,००० पक्ष्यांचं शेड उभारलं. मात्र २००६ मध्ये एकाच वेळी आजार आल्याने मोठं नुकसान झालं. हजारो पक्षी दगावले, कर्ज फेडणं कठीण झालं. पण त्यांनी हार न मानता २००८ मध्ये २५ लाखांचं कर्ज घेतलं आणि २०,००० पक्ष्यांपासून व्यवसाय पुन्हा उभा केला. हे शक्य झालं माफसू आणि कृषी विद्यापीठ अकोला येथील प्राध्यापकांच्या वेळोवेळी मार्गदर्शनामुळे. सन २०२२ मध्ये माफसूतील तज्ज्ञ डॉ. सतीश मनवर यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने यांच्या प्रोत्साहनातून ३० हजार पक्ष्यांसाठी वातानुकुलीत कुक्कुटपालन केंद्र उभारले.

## वातानुकूलित कुक्कुटपालन केंद्र

आमच्या 'मातोश्री वातानुकूलित कुक्कुटपालन केंद्रा'मध्ये ८ एकरात वातानुकूलन, बायोसेक्युरिटी, स्वयंचलित फीडिंग, अंडी संकलन, वायू व प्रकाश नियंत्रण अश्या अत्याधुनिक सुविधा आहेत. यामुळे रोज



१.२ लाख अंडी उत्पादन आणि ₹६०,००० नफा मिळतो. हे युनिट केवळ उत्पादनापुरतं मर्यादित नसून, विविध महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी 'लाईव्ह लर्निंग सेंटर' ठरलं आहे.

## कुक्कुटपालन व सेंद्रिय शेती

आमच्याकडे कोंबडीचे विष्ठा खत वापरून ४२ एकर शुद्ध नैसर्गिक शेतीचं क्षेत्र कार्यरत आहे. याशिवाय आम्ही दरवर्षी २२०० टन कोंबडीचे विष्ठा खत फक्त ₹१ किलो दराने स्थानिक शेतकऱ्यांना पुरवतो. त्यामुळे इतर शेतकऱ्यांनाही शाश्वत सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यासाठी प्रेरणा मिळते. शेती आणि कुक्कुटपालन यांचं हे मॉडेल परिपूर्ण आहे.

## रोजगार निर्मितीचे केंद्र

आज आमच्या फार्ममुळे ५० हून अधिक कुटुंबांना रोजगार मिळतो. वडील, आजोबा, काका आणि आईच्या मार्गदर्शनाखाली माझा परिवार आजही संयुक्त आहे. मी 'कमवा आणि शिका' या तत्वावर चालत एम.बी.ए. करत आहे, आणि अनेक तरुणांना उद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षण देतो आहे त्यांना माझ्या परीने मार्गदर्शन आणि प्रेरणा देतो आहे.

## माझी भविष्यदृष्टी

विदर्भात १००% बायोसेक्युर आणि पूर्ण नैसर्गिक अंडी उत्पादन करणारा पहिला ग्लोबल ब्रँड तयार करणं हे माझ स्वप्न आहे. हे शक्य होईल, कारण मला विद्यार्थीदशेतूनच व्यवसायाचं भान, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन मिळाला आहे. ग्राहकांना आरोग्यदायी अंडी उपलब्ध करून देणं ही माझी प्राथमिकता आहे. स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी देत मला विदर्भाच्या विकासात हातभार लावायचा आहे.

## माझा संदेश

कुक्कुटपालन किंवा शेती हे मागासलेले क्षेत्र नाही तर ते एक शाश्वत भविष्य आहे. तेव्हा माझं सर्व तरुण मित्रांना हेच आवाहन असेल की, स्थानिक पातळीवर काहीतरी नवीन घडवा. कारण तुम्हीही शेतीतून, कुक्कुटपालनामधून किंवा शेतीपूरक उद्योगातून समृद्धी साधून देशाच्या उन्नतीत योगदान देऊ शकता.


**मार्गदर्शक**

**डॉ. सतिश मनवर**
प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला
संपर्क क्र. ९७३०२८३२१२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**शिवराज रविंद्र मेटकर**
मसला, अंजनगाव बारी रोड, बडनेरा, जि. अमरावती - ४४४ ७०१
संपर्क क्र. ९२२६८८२२७७

# निवृत्तीनंतरच्या प्रवासात कुक्कुटपालनातून उत्कर्ष
# प्रल्हादराव जाधव यांची यशोगाथा



माझं नाव प्रल्हादराव रामसिंग जाधव, मूळगाव अंबड (जि. जालना). पोलिस खात्यात ३० वर्ष सेवा दिल्यानंतर मी निवृत्त झालो. खऱ्या अर्थाने माझा दुसरा प्रवास तेव्हाच सुरू झाला. सेवानिवृत्तीच्या काही वर्षांपूर्वीच, २०१४ मध्ये मी परभणी-वसमत महामार्गालगत असोला येथे दोन एकर जमीन घेतली. माझ्या अखेरच्या पोस्टिंगनंतर मी ठरवलं, आता पूर्णवेळ शेतीत उतरायचं.

## एक नवा अध्याय

शेती तर सुरू केली, पण दोन एकर क्षेत्र मर्यादित असल्याने नफा फारसा नव्हता. म्हणूनच २०१७ मध्ये शेतीपूरक व्यवसाय सुरू करण्याचं ठरवलं आणि याच ठिकाणी मी गीर व लाल कंधारी गायींसोबत कावेरी देशी कोंबड्यांचं पालन सुरू केलं. बंगळुरुच्या सरकारी संस्थेतून पहिल्यांदा ५०० पिल्ले घेतली. यासाठी ८० बाय १५ फूटचा निवारा उभारला. शेळीपालनासाठी वरचा मजला, आणि कोंबडीपालनासाठी खालचा असे अभिनव डिझाइन तयार केले.

## शास्त्रीय दृष्टिकोनातून वाटचाल

सन २०१९ मध्ये परभणी येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयात सात दिवसांचं शास्त्रीय प्रशिक्षण घेतलं. डॉ. म्हाळसाकांत निकम आणि डॉ. काकासाहेब खोसे सरांनी मार्गदर्शन केलं. त्यातूनच स्वच्छता, बायो-सिक्युरिटी, अन्न व्यवस्थापन, आजार नियंत्रण आणि संगोपन याबाबतीत माझा दृष्टिकोन अधिक स्पष्ट झाला.

## व्यवसायात यश आणि विस्तार

आज माझा देशी कोंबड्यांचा व्यवसाय लहान-मोठ्या मिळून सुमारे २,५०० पक्ष्यांपर्यंत पोहोचला आहे. महिन्याला १,००० पक्ष्यांची बॅच घेतो. माझा फार्म परभणी शहरापासून फक्त पाच किलोमीटरवर आहे. त्यामुळे मी सोशल मीडियाचा वापर करून 'होम डिलिव्हरी' सेवा सुरू केली. 'आरूष फार्म-केज फ्री अंडी' हा स्वतःचा ब्रँड तयार केला. आम्ही ६, १२ आणि ३० अंड्यांचे बॉक्सेस अनुक्रमे ₹९०, ₹१८०, आणि ₹४२० ला विकतो. रोज सुमारे २०० अंडी मिळतात, प्रति नग ₹१५ दराने विक्री होते.



## हॅचरी आणि प्रशिक्षण केंद्र

आमच्याकडे आता ५,००० अंडी उबवण्याची हॅचरी आहे. लातूर, बीड, परभणी जिल्ह्यांत ७, १५ आणि ३० दिवसांच्या पिल्लांचे कागदी बॉक्समधून वितरण करतो. पिल्लांच्या वयानुसार ₹४० ते ₹१०० दराने विक्री करतो. त्याबरोबर इलेक्ट्रिक व गॅस ब्रूडर, खाद्यपात्र, पाण्याची भांडी इत्यादींचाही पुरवठा करतो.

## व्यवस्थापन आणि कुटुंबीयांचा पाठिंबा

फार्मच्या व्यवस्थापनामध्ये माझ्या पत्नी सागरबाई, सून वैशाली, मुलगा रमेश आणि एक सालगडी यांचा खूप मोठा हात आहे. आम्ही पिल्लांचं वय, आरोग्य, आहार, संगोपन अशा प्रत्येक गोष्टीसाठी वेगवेगळे विभाग तयार केले आहेत. मेथी घास, पालक चारा स्वतः शेतात पिकवतो.

## कृषी कंपनीची स्थापना व व्यवसाय विस्तार

मी सन २०१९ मध्ये 'कृषी विश्व शेतकरी उत्पादक कंपनी' स्थापन केली. आज आमच्याकडे ७२३ सभासद आहेत. मी अध्यक्ष आहे आणि वैशाली जाधव सचिव आहेत. 'स्मार्ट प्रकल्पा'साठी सादर केलेल्या प्रस्तावास दोन कोटींचा निधी आणि ६०% अनुदान मंजूर झालं. ८,००० कोंबड्यांची क्षमता असलेले दोन शेड्स, ६०,००० अंडी उबवण्याची हॅचरी उभारणी सुरू आहे. हे सर्व 'स्मार्ट पोल्ट्री हब' म्हणून विकसित करत आहोत.

## माझा संदेश

देशी कुक्कुटपालन व्यवसाय म्हणजे मागासलेपणाचं प्रतीक नाही. तो उच्च व्यवस्थापन, दर्जा आणि ब्रँडिंगचं उत्कृष्ट उदाहरण बनू शकतो. स्वच्छता, दर्जा, शास्त्रीय दृष्टिकोन आणि ग्राहकांचा विश्वास हे यशाचे खरे मंत्र आहेत.

**मार्गदर्शक**

**डॉ. म्हाळसाकांत निकम**
प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
संपर्क क्र. ८४२१०७४९८७

**डॉ. काकासाहेब खोसे**
सहयोगी प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
संपर्क क्र. ९४२२६४६५२९

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रल्हादराव रामसिंग जाधव**
आरोग्य नगर, ता. - जि. परभणी - ४३१ ४०१
संपर्क क्र. ८६२३०२५९५५, ७०२०३७०४७०

# मत्स्य व्यवसाय



माफसू यशोगाथा २०२५

## शोभिवंत माशांमध्ये रंगलेलं माझं स्वप्न

# साकेत देशमुख यांची यशोगाथा



मी साकेत सुरेंद्र देशमुख, नागपूरचा. माझा व्यवसाय मत्स्य-विला म्हणजे केवळ उदरनिर्वाहाचं साधन नाही, तर तो माझ्या स्वप्नांचा रंगीत आकार आहे. माश्यांवरील प्रेम, सौंदर्यदृष्टी आणि पाण्यातल्या जगाकडे असलेली ओढ यामुळे या व्यवसायाची बीजं माझ्या मनात लहानपणापासून रोवली गेली होती. माझ्या या प्रवासाची सुरुवात झाली २०१० साली, अगदी छोट्या प्रमाणात, घरच्यांच्या आर्थिक पाठबळावर. कोणत्याही बँकेचं कर्ज न घेता, आधीपासून विकत घेतलेल्या २०० चौरस फुटाच्या दुकानातून मी या व्यवसायाचा पाया रचला.

## प्रशिक्षण आणि प्रयोजन

शोभिवंत माशांचं प्रजनन आणि संगोपन हे जितकं आकर्षक, तितकंच तांत्रिक. त्यामुळे या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी केवळ आवड पुरेशी नव्हती मला हवी होती तांत्रिक समज. हे ज्ञान मला मिळालं मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि केंद्रीय संस्थांमधून, विशेषतः डॉ. सत्यजित बेलसरे आणि श्री. शामकांत शेळके सरांच्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनातून.

व्यवसायासाठी केवळ टाक्यांत मासे सोडून चालत नाही, तर त्यांची वाढ, आरोग्य आणि सौंदर्य राखण्यासाठी खूप अभ्यास आणि सतत निरीक्षण आवश्यक असतं. त्यांच्या प्रशिक्षणामुळेच मी योग्य उपकरणांची निवड केली टाक्या, फिल्टर्स, एअर पंप्स, हीटर्स, लाइटिंग सिस्टीम, आणि निगराणीची जाळी यांचा योग्य वापर करायला शिकलो.

## गुंतवणूक आणि विस्तार

सुरुवातीला थोडा संकोच होताच, पण २०१४ पासून व्यवसायाला वेग आला. मी अतिरीक्त २०० चौरस मीटर जमीन घेतली आणि माशांचं संगोपन अधिक मोठ्या प्रमाणावर सुरू केलं. प्रत्येक नवीन टाकी उभारताना, मी फक्त जागा नव्हे तर माझं आत्मविश्वासही वाढवत गेलो. यामुळे माझं उत्पन्नही वाढलं आज मी महिन्याला ₹१.२० लाख ते ₹१.५०लाख निव्वळ नफा कमावतो. यामागचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे उत्तम व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि ग्राहकांशी टिकवलेले चांगले संबंध.



## ज्ञान आणि संधी

माफसूतील मत्स्यविज्ञान महाविद्यालय नागपूर येथे आयोजित केलेल्या स्थानिक शोभिवंत माशांचं प्रजनन आणि पालन या प्रशिक्षण कार्यक्रमात मला एक नवी दिशा मिळाली. या प्रशिक्षणामुळे मला समजलं की, या क्षेत्रात अजूनही मोठ्या संधी दडल्या आहेत, फक्त शास्त्रोक्त दृष्टिकोन आणि चिकाटीने त्या शोधाव्या लागतात. तिथे इतर उद्योजकांशी संवाद साधताना जाणवलं की, मी जे करत होतो त्याला एक मोठी बाजारपेठ आहे.

## पुढचे ध्येय

आजही माझा व्यवसाय उन्नतीकडे चालला आहे. मी सध्या माझं लक्ष व्यवस्थित वितरण व्यवस्था, नियमित उत्पादन आणि निरोगी व सुंदर माशांची पुरवठा साखळी यावर केंद्रित केलं आहे. विदर्भासारख्या भागात शोभिवंत मत्स्यव्यवसायाच्या शक्यतांचा विचार अजूनही कमीच आहे. हाच माझा पुढचा विस्ताराचा मुख्य केंद्रबिंदू आहे. भविष्यात मी माझा व्यवसाय आणखी उच्च स्तरावर पोहोचवण्याचा निर्धार केला आहे.

## यशाचे श्रेय

या प्रवासात भाग्य साथ देईल, अशी अपेक्षा कधीच ठेवली नव्हती. मी ती साथ मिळवली... आईवडिलांच्या विश्वासाने, मार्गदर्शकांच्या अमूल्य सल्ल्याने आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर. माझा दररोजचा दिवस टाक्यांमध्ये पाणी घालण्यापासून सुरू होतो आणि रात्री शेवटचा विचार माशांच्या आरोग्यावरच थांबतो.

## माझा संदेश

माझ्यासाठी मत्स्य व्यवसाय म्हणजे कला आणि विज्ञानाचं सुंदर संमीलन. मी ठामपणे सांगू शकतो, जर तुम्हाला पाण्यातलं रंगीबेरंगी जग खुणावत असेल, तर ते जग तुमचंही होऊ शकतं... हे क्षेत्र केवळ छंदासाठी नव्हे, तर अर्थार्जनासाठीही भरपूर संधी देणारं आहे.


**मार्गदर्शक**

**डॉ. सत्यजित बेलसरे**
प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९०९६०३८३८९

**श्री. शामकांत शेळके**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९६६५०४०८७७

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**साकेत सुरेंद्र देशमुख**
एस/२, एम. आय. जी कॉलोनी, रींग रोड, नागपूर - ४४० ०२७
संपर्क क्र. ८०८७३३९२७२

माफसू यशोगाथा २०२५

स्वप्नांना दिशा आणि मत्स्यपालनातून नवसंजीवनी

# सुनील धनुले यांची यशोगाथा



माझं नाव सुनील लखनलाल धनुले, हिंगणा, नागपूर येथील निवासी. माझं शिक्षण एमए बीएड पर्यंत झाले आहे. नोकरीच्या मागे न लागता स्वतःचं काहीतरी करावं, असा विचार माझ्या मनात कायम होता.

## निर्णायक वळण

माझ्या आयुष्यात निर्णायक वळण तेव्हा आलं, जेव्हा मी तोमेश्वर गहरूले यांच्यासोबत मत्स्यपालन क्षेत्रात पाऊल टाकलं. तोमेश्वरजी माझ्या नात्यात तर होतेच. परंतु एक सखा, मार्गदर्शक आणि प्रेरक सहकारी देखील होते. त्यांनी मत्स्य व्यवसायाकडे पाहण्याचा माझा दृष्टीकोनच बदलून टाकला. त्यांच्या पुढाकारातून, अनुभवातून आणि मेहनतीतून मला या व्यवसायात खऱ्या संधी दिसू लागल्या.

## प्रशिक्षण आणि मत्स्यपालन

तोमेश्वरजींनी मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील उमेश सुर्यवंशी सरांशी संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शनातून ५ एकरांपैकी ३ एकर जागेत मत्स्यपालन प्रकल्प उभारला होता. सुरुवातीला मी त्यांना फक्त सहाय्य करत होतो. पण हळूहळू, व्यवसायातील बारकावे, व्यवस्थापन आणि विपणन याची जबाबदारी मीही खांद्यावर घ्यायला लागलो.

## एक धक्का, मोठी हानी

दुर्दैवाने, तोमेश्वरजींचं दोन महिन्यांपूर्वी निधन झालं. ही आमच्यासाठी केवळ वैयक्तिक नाही, तर व्यवसायिक पातळीवरही मोठी हानी आहे. पण त्यांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देणं, हाच त्यांच्या स्नेहाचा व मार्गदर्शनाचा खरा मान ठरेल, या विचाराने मी धीराने पुढे चालत आहे.

## 'शिवांश फिश फार्म' आणि नफ्याचे गणित

आज मी आणि माझं कुटुंब 'शिवांश फिश फार्म' या नावाने मत्स्यपालन व्यवसाय चालवत आहोत. टिलापिया आणि पंगेसिअस माशांच्या संवर्धनातून दर ६ महिन्याला ₹१४-१५ लाखांपर्यंत नफा मिळतो. आम्ही पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेतून अनुदान घेतलं आहे, आणि मत्स्य खाद्यनिर्मितीचे छोटे युनिटही सुरू केले आहे.



## तोमेश्वर यांची दूरदृष्टी

तोमेश्वरजींचं नाव आणि विचार आजही आमच्या प्रत्येक कृतीत आणि कामात जोडलेलं आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच मी आत्मनिर्भर झालो, आणि आज अनेक शेतकऱ्यांना आम्ही मार्गदर्शनही करतो. आमच्याकडे यवतमाळ, गोंदिया, भंडारा इथून शेतकरी व नवउद्योजक येतात.

## यशाचे श्रेय

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील श्री. उमेश सुर्यवंशी सरांच्या मार्गदर्शनाचं श्रेय मोठं आहे. त्यांचे योगदान आम्ही कधीच विसरू शकत नाही. त्यांनी प्रत्येक तांत्रिक अडचणीचं समाधान केलं, आधुनिक व्यवस्थापन आणि बाजारपेठेची समज दिली आणि आमची पाऊले न थांबता पुढे जात राहिली. त्यांच्या सुयोग्य दिशादर्शनाखेरीज व्यवसायात प्रगती करणं शक्य नव्हतं.

## पुढचं लक्ष्य

माझं उद्दिष्ट आहे की, केज कल्चरमध्ये पाऊल ठेवायचं आणि व्यवसाय आणखी विस्तारायचा. ग्रामीण भागातील तरुणांसाठी मत्स्यपालन हे आदर्श आणि स्थिर उत्पन्नाचं माध्यम बनवून प्रस्तुत करावं. तसेच मत्स्यप्रक्रिया व विपणन या क्षेत्रात नव्या संधी शोधून मूल्यवर्धन करायचं आहे.मत्स्य व्यवसायाच्या माध्यमातून गावातच रोजगार निर्माण करून स्थलांतराची गरज कमी करायची आहे.

## माझा संदेश

मी एवढंच सांगू इच्छितो की, यशासाठी चमत्कार नाही, जिद्द, योग्य मार्गदर्शन आणि सातत्य लागतं. संकटं येतात, पण ती आपल्याला थांबवण्यासाठी नव्हे तर अधिक कणखर बनवण्यासाठी. मत्स्यपालन तुमचं भविष्य बदलू शकतं, जसं आमचं बदललं.


**मार्गदर्शक**

**श्री. उमेश सुर्यवंशी**
सहाय्यक प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९१४६४०७०००

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**सुनील लखनलाल धनुले**
उत्तरा पार्क, भोसले वाडी, ता. हिंगणा, जि. नागपूर - ४४१ ११०
संपर्क क्र. ९५६१६२६६५२

## मत्स्यपालनातून शोधली समृद्धीची वाट

# राजेंद्र रासीने यांची यशोगाथा



माझं नाव राजेंद्र कन्हैयालाल रासीने. मी जुने कायगाव, तालुका गंगापूर, जिल्हा छ. संभाजीनगर येथे राहतो. माझा पारंपरिक व्यवसाय शेती आणि त्यासोबतच मी किराणा दुकानही चालवतो. परंतु शेतीतून किंवा दुकानातून फारसं उत्पन्न होत नव्हतं. कुटुंबाच्या गरजा वाढत होत्या आणि त्याला पूरक असं काहीतरी हाती घ्यायचं ठरवलं. सुरुवातीला मी कपड्यांचं दुकान, खत विक्री, रेशीम उद्योग असे अनेक व्यवसाय करून पाहिले. प्रत्येक वेळी मनात काहीतरी नवीन करून दाखवण्याची जिद्द होती.

## मत्स्य व्यवसायाची सुरुवात

एक दिवस मत्स्य व्यवसायाची माहिती मिळाली आणि वाटलं यामध्ये काहीतरी वेगळं आहे. या क्षेत्रात तुलनेनं कमी स्पर्धा आहे, उत्पन्नाची क्षमता मोठी आहे आणि सतत मागणी असते. यामुळे मी उत्सुक झालो. मी लगेच मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि मत्स्य विभागाच्या तज्ज्ञांशी संपर्क केला. त्यांच्याकडून तांत्रिक माहिती घेतली आणि मार्गदर्शन घेऊनच मी माझा मत्स्य व्यवसाय 'गोदावरी प्रवरा फिशरीज' या नावाने सुरू केला.

सुरुवातीला मत्स्य बीज संगोपन आणि विक्रीवर भर दिला. अवघ्या तीन महिन्यांत मला ₹५०,००० नफा मिळाला. त्यामुळे हुरूप आला. पुढे मी मत्स्य संवर्धनासाठी ₹३ लाख खर्च केले आणि त्यातून तब्बल ₹६ लाख निव्वळ नफा कमावला.

आज माझ्या सोबत घरातील सदस्य आणि चार मजूर काम करतात. आम्ही पाण्याच्या व्यवस्थापनापासून प्राणवायूची पूर्तता, पाण्याची विविध मानकं तपासणे आणि माशांच्या आरोग्याची निगा हे सर्व कामे काटेकोरपणे करतो.

दर दिवशी सकाळी आणि संध्याकाळी पाण्याचे तापमान, पी एच आणि ऑक्सिजन पातळी मोजली जाते, यामुळे रोग टाळता येतात आणि उत्पादनही सुधारतं. माझ्या तलावांमध्ये १० एचपी पंप आणि ऐरिटर यंत्रणा बसवलेली आहे.



## मार्गदर्शनाचे महत्व

या यशामागे एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे नियमित मार्गदर्शन आणि प्रशिक्षण. प्रशिक्षण घेतल्याशिवाय मत्स्यपालनात उतरलेलो असतो, तर इतकं नियोजनबद्ध आणि यशस्वी काम शक्यच झालं नसतं. उमेश सुर्यवंशी सरांनी वेळोवेळी जे तांत्रिक ज्ञान दिलं, त्यामुळे माझ्या अडचणी सुटत गेल्या आणि मी मत्स्य व्यवसायात अधिकाधिक आत्मविश्वासाने काम करू लागलो.

आज मी चायनीज सर्क्युलर हॅचरी सुरू केलेली आहे आणि दरवर्षी सुमारे २ लाख मत्स्य बोटुकलींचं उत्पादन घेतो. यासोबतच मी मत्स्य खाद्य एजन्सीही सुरू केली आहे. पाच एकर जमिनीत उभा केलेल्या या व्यवसायातून केवळ सहा महिन्यांतच ₹३ लाख नफा मिळवला.

## गोदावरी प्रवरा फिशरीचे नाव पंचक्रोशीत

आज गोदावरी प्रवरा फिशरीज हे नाव गावोगाव पोचलं आहे. मत्स्य व्यवसायात सातत्य, गुणवत्ता आणि पारदर्शक व्यवहार ठेवल्यास ग्राहकांचा विश्वास अधिक घट्ट होतो, हे मी अनुभवलंय.

समाजात प्रतिष्ठा मिळाली आणि इतर शेतकरीही माझ्याकडे सल्ला घ्यायला येतात. आता माझं ध्येय आहे दर्जेदार मत्स्य बीज उत्पादन करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मत्स्यपालनाकडे वळवायचं.

## यशाचं श्रेय

या यशाचं खरं श्रेय मी मत्स्य व्यवसाय विकास विभाग, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि उमेश सुर्यवंशी सरांना देतो. सरांचं केवळ तांत्रिक मार्गदर्शन नव्हे, तर वेळेवर दिलेला मानसिक पाठींबा माझ्या यशात अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आज मी यशस्वी मत्स्य उद्योजक बनू शकलो. सतत शिकत राहणं, चुका स्वीकारून सुधारणा करणं आणि वेळेचं व्यवस्थापन हे तीन घटक माझ्या प्रत्येक निर्णयाचं मूळ आहे.

## माझा संदेश

व्यवसाय सुरू करण्याआधी नीट माहिती घ्या, प्रशिक्षण घ्या आणि मग जिद्द आणि मेहनतीने कामाला लागा. यश नक्की मिळतं.

**मार्गदर्शक**
**श्री. उमेश सुर्यवंशी**
सहाय्यक प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९१४६४०७०००

**उद्योजकाचे नाव व पत्ता**
**राजेंद्र कन्हैयालाल रासीने**
जुने कायगाव, ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर - ४३१ ११०
संपर्क क्र. ९९७५४०५९७०

## मत्स्यबीज निर्मितीतून आर्थिक सुबत्तेकडे

# हरीष बिश्वास यांची यशोगाथा



मी हरीष अमर बिश्वास, श्रीनिवासपूर, पो. विष्णुपूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली येथील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील आहे. घरात आई-वडील, पत्नी आणि दोन मुले. आमचं पारंपारिक उत्पन्न फक्त शेती आणि वडिलांच्या मासेमारीवर अवलंबून होतं. शिक्षण दहावीपर्यंतच. त्यामुळे नोकरी मिळवणं कठीणच होतं. पण लहानपणापासूनच मी वैनगंगा नदी आणि आसपासच्या तलावांत मासेमारी करत आलो होतो, या अनुभवानेच माझी दिशा ठरवली.

## सुरुवातीची दिशा

चामोर्शी तालुक्यातील गावांत तलावांची संख्या चांगली आहे आणि स्थानिक वस्तीतील बंगाली बांधवांमध्ये माश्यांची चांगली मागणी आहे. हाच विचार करून मी कोलकात्याहून जीरे आकाराचं मत्स्यबीज आणलं आणि माझ्या तलावात त्यांचं संगोपन करून बोटुकली आकाराचं बीज तयार करू लागलो. सुरूवातीला सगळंच नवीन होतं. पण मला योग्य तांत्रिक मार्गदर्शन मिळालं मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील डॉ. प्रशांत तेलवेकर सरांकडून. त्यांनी मला बीज संगोपनाचं संपूर्ण विज्ञान समजावून सांगितलं.

मी ऑगस्ट २०१९ मध्ये नागपूरमध्ये झालेल्या मत्स्य प्रेरीत प्रजनन व बीज निर्मिती प्रशिक्षणात सहभागी झालो. तिथे मी पिटूटरी ग्लँड एक्स्ट्रॅक्ट वापरून प्रजनन करण्याचं तंत्र शिकलो. शास्त्रोक्त ज्ञान आणि सरांच्या मार्गदर्शनाने मी हळूहळू बोटुकली उत्पादनात पारंगत झालो.

## गुंतवणूक आणि व्यवस्थापन

मी श्रीनिवासपूर इथल्या शेततळ्यातून हा व्यवसाय २०१९ साली सुरू केला. सुरुवातीला २.२५ लाखांची गुंतवणूक त्यात २ लाखांचं कर्ज पतसंस्थेकडून घेतलं आणि बीज खरेदी, खाद्य खर्च आणि तलावाची व्यवस्था अशा सगळ्याच गोष्टींची पूर्तता केली. आज त्यांचं फळ म्हणून मला वार्षिक २.५० लाखांहून अधिक उत्पन्न मिळत आहे. या



सगळ्या प्रवासात माझ्या पत्नीचं योगदान अनमोल आहे. तिनं केवळ कामात मदतच केली नाही, तर मनात आलेल्या शंका आणि अनिश्चिततेच्या काळात माझा खंबीर आधार देखील बनली. तिच्याशिवाय हे शक्य नव्हतं.

## नफ्याचे गणित

आता मी दरवर्षी ३ कोटी मत्स्यजीरे तयार करतो. २०२४ मध्येच मी १३ लाख बोटुकलींचं वितरण केलं, ज्यातून २० लाखांचं उत्पन्न आणि ११ लाखांचा नफा मिळवला. हा व्यवसाय पुढे नेण्यासाठी मी १० एकर जमीन भाड्याने घेतली आणि ६ नवीन तलाव तयार केले. माझ्या कामगिरीवर खूश होऊन डॉ. तेलवेकर सरांनी मत्स्यशेतीमध्ये शाश्वत उपजिविकेच्या संधी सुनिश्चित करण्याच्या प्रकल्पासाठी माझ्या प्रकल्पाची निवड केली. यातून मला सुलभ कार्प बीजनिर्मिती संच मिळाला. त्याने व्यवसायाला आणखी वेग आला.

## पुढील लक्ष्य व यशाचे श्रेय

पुढे मी चामोर्शी तालुक्यातील मत्स्य शेतकरी हितैषी समुहाचं संघटन, मत्स्य उत्पादक संघटनेची बांधणी, मत्स्य खाद्य प्रकल्प आणि शीतगृह उभारणी यासाठी पुढाकार घेणार आहे. आज मी केवळ मत्स्यबीज उत्पादक नाही, तर माझं नाव तालुक्यात आदर्श शेतकरी म्हणून घेतलं जातं. हे यश मिळवताना माफसू आणि मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचं मार्गदर्शन आणि माझ्या कुटुंबीयांचं पाठबळ यांचा फार मोठा वाटा आहे.

## माझा संदेश

तांत्रिक ज्ञान घ्या, बाजाराचा अभ्यास करा आणि प्रामाणिकपणे काम करा. प्रत्येक अडचणीत संधी दडलेली असते, हे ध्यानात ठेवा. शेतीपूरक व्यवसाय तुम्हाला खऱ्या अर्थाने आर्थिक आत्मनिर्भरता देऊ शकतो. योग्य दिशा आणि प्रयत्नाने यश नक्कीच मिळते.


**मार्गदर्शक**

**डॉ. प्रशांत तेलवेकर**
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९८९०९१९५४३

**डॉ. राजीव राठोड**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९७६६३१३९२०

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**हरीष अमर बिश्वास**
श्रीनिवासपूर, पो. विष्णुपूर, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली - ४४२ ६०३
संपर्क क्र. ९८३४४९८६३३

# मत्स्य संवर्धनातून शाश्वत उपजीविकेची सुवर्ण संधी

# किसनलाल सहादा यांची यशोगाथा



मी किसनलाल चैतु सहादा, धमदीटोला, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथील एक सर्वसामान्य शेतकरी. आई-वडील हयात नाहीत, आज माझ्या कुटुंबात पत्नी आणि दोन मुले आहेत. माझ्या तीन एकर कोरडवाहू जमिनीवर मी पारंपरिक धान व कापूस शेती करतो आणि दोन गाईंच्या मदतीने पशुपालनही करतो. यावर आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता, मात्र उत्पन्न वर्षाला अंदाजे तीन लाख रुपये इतकेच होते. शेती कोरडवाहू असल्यामुळे दरवर्षी उत्पन्नात चढ-उतार होत असत, त्यामुळे खर्च भागवणंही अवघड व्हायचं.

## टर्निंग पॉईंट

शालेय शिक्षणानंतर मी शेतीतच लक्ष दिलं, पण कायम मनात होतं की, काहीतरी वेगळं करावं, शेतीला पूरक आणि उत्पन्नवर्धक. याच विचारातून मी २०१७ साली मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि विज्ञान व तंत्रज्ञान संसाधन केंद्र, गडचिरोली यांच्यातर्फे कुरखेडा येथे झालेल्या एक दिवसीय कार्यशाळेत सहभागी झालो. तिथे मत्स्य संवर्धनाविषयी मिळालेली माहिती माझ्यासाठी 'टर्निंग पॉईंट' ठरली. त्यावेळी मी प्रथमच शास्त्रोक्त मत्स्यपालन ही संज्ञा ऐकली आणि त्यातील संधी ओळखली. प्रशिक्षणातील ज्ञानाचा वापर करून मी हळू हळू व्यवसायाची बांधणी करायला लागलो.

## मत्स्यपालनास सुरुवात

सन २०१९ मध्ये माझ्या शेततळ्यात मत्स्यपालन सुरू केलं. प्रकल्पांतर्गत मत्स्यबीज, पुरक खाद्य आणि सॅनिटायझर मिळालं. मी आणि माझी पत्नी मिळून संपूर्ण देखभाल करू लागलो. सुरुवातीला काही अडचणी होत्या, विशेषतः चांगल्या दर्जाच्या बीजांची अनुपलब्धता, पण त्यावरही मात केली. आम्ही शिस्तबद्ध रूटीन तयार केलं, पाण्याची गुणवत्ता राखणे, माश्यांची वाढ तपासणे, खाद्य वेळेवर देणे ई.

प्रत्येक टाकीत माशांची वाढ, त्यांच्या हालचाली आणि रंगावर सतत निरीक्षण ठेवलं. तलावातील पाण्याचा दर्जा टिकवण्यासाठी सेंद्रिय उपायांचा वापर सुरू केला. अभ्यास, प्रयोग आणि अनुभवाच्या जोरावर हळूहळू उत्पादनामध्ये वाढ दिसून येऊ लागली.



## आर्थिक गणित

आज माझं वार्षिक उत्पन्न ४.८० लाख रुपये आहे, त्यात खर्च वजा जाता ३.१० लाखांचा निव्वळ नफा मिळतो. मासिक सरासरी उत्पन्न रु. ४०,००० इतकं आहे, जी एक शाश्वत उपजिविकेची संधी ठरली आहे. या उत्पन्नातून मी मुलांचं शिक्षण, कुटुंबाचा खर्च आणि नवीन प्रकल्पासाठी गुंतवणूक यशस्वीरित्या करत आहे. सातत्याने नियोजन केल्यामुळे आर्थिक स्थैर्य मिळालं आणि व्यवसाय वाढीच्या मार्गावर आहे. भविष्यात उत्पादन क्षमता वाढवून आणखी मोठ्या बाजारपेठेत प्रवेश करण्याचा माझा मानस आहे.

## यशाचे श्रेय

या यशाचं खरं श्रेय मी मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर आणि तेथील तज्ञ प्राध्यापक डॉ. प्रशांत तेलवेकर आणि डॉ. राजीव राठोड यांना देतो. त्यांनी वेळोवेळी दिलेलं मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आत्मविश्वासामुळे मी एक सामान्य शेतकऱ्याच्या भूमिकेतून प्रगतशील मत्स्य उद्योजक म्हणून ओळखला जातो.

## पुढील वाटचाल

आज गावात आणि समाजात माझं स्थान उंचावलं आहे. भविष्यात जयंती रोहू आणि जनुकीय वर्धन केलेल्या कटला यासारख्या सुधारित प्रजातींचं बीज संवर्धन करायचं माझं ध्येय आहे. तसेच मी माझा व्यवसाय अधिक प्रमाणात स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगार देणारा प्रकल्प बनवायचं स्वप्न पाहतो.

## माझा संदेश

मी ठामपणे सांगू शकतो की, प्रामाणिक मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि नियोजन यामुळे कोणताही सामान्य शेतकरी यशस्वी उद्योजक बनू शकतो. मत्स्यपालनात संधी आहेतच, पण त्यांचा लाभ घेण्यासाठी ज्ञान, प्रयोगशीलता आणि चिकाटी लागते.

**मार्गदर्शक**

**डॉ. प्रशांत तेलवेकर**
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९८९०९१९५४३

**डॉ. राजीव राठोड**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९७६६३१४९२०

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**किसनलाल चैतु सहादा**
धमदीटोला, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली - ४४१२०९
संपर्क क्र. ९६९९००८७०३

# शेततळ्यातून शोधला आर्थिक उन्नतीचा मत्स्य मार्ग
# गुंडेराव चौंसष्टे यांची यशोगाथा



मी गुंडेराव शंकर चौंसष्टे, लातूर जिल्ह्यातील येरोळ गावचा. शिक्षण बी.ए.च्या तृतीय वर्षापर्यंत झालं, पण आर्थिक अडचणींमुळे शिक्षण पूर्ण करता आलं नाही. आमचं कुटुंब शेती आणि थोडक्याच जनावरांवर आधारित. दरवर्षी पावसावर अवलंबून शेती करताना अनेकदा आर्थिक टंचाईला सामोरं जावं लागायचं. पण मत्स्यपालन व्यवसायाने माझ्या घरात समाधान आणि आर्थिक स्थैर्य दोन्ही आणलं.

## शेतीला पर्यायी उत्तर – मत्स्यपालन

पारंपारिक शेतीतून फारसं उत्पन्न मिळत नव्हतं. पण आमचं शेततळं होतं. म्हणून २०१७-१८ मध्ये मी विचार केला. हे पाणी केवळ साठवण्यासाठी नको, याचा वापर उत्पन्नासाठी करायचा. याच वेळी आत्मा विभाग आणि त्यांच्या मार्फत मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर यांच्या संपर्कात आलो.

मत्स्यपालन हा केवळ व्यवसाय नव्हे, तर तो शाश्वत उत्पन्नाचा पर्याय असू शकतो हे मला त्यावेळी जाणवलं. तेथील प्राध्यापक डॉ. अजय कुलकर्णी सर, डॉ बालाजी खरटमोल सर आणि डॉ. आदिनाथ मरकड सर यांनी मला तांत्रिक माहिती दिली, शंका दूर केल्या आणि प्रोत्साहन दिलं.

## व्यवसायाची सुरुवात

सन २०१९-२० मध्ये २४ x २४ x ६ मीटर आकारमान असलेल्या प्लास्टिक आच्छादनाच्या शेततळ्यात ५,००० मत्स्यबीज सोडले आणि मत्स्यपालनाला सुरुवात केली. सुरुवातीस स्वतःच्या खर्चातून ₹२५,००० गुंतवले. नंतर शासकीय अनुदान ₹२४,००० पोखराअंतर्गत आणि ₹४,००० आत्मा अंतर्गत मिळालं. पाण्यात प्राणवायू वाढवण्यासाठी स्प्रिंकलर बसवले.

या सर्व यंत्रणांची उभारणी करताना शिस्तबद्ध नियोजन आणि खर्चाचे भान ठेवले. मत्स्य संवर्धनासाठी खाद्य, खत, औषधे आणि वेळेवर व्यवस्थापन यामध्ये कुटुंबीय आणि मजुरांना सहभागी करून घेतले. उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करत नवकल्पना सातत्याने अमलात आणल्या.



## अडथळे आले, पण हार मानली नाही

सुरुवातीस मासे मेले. तेव्हा घाबरलो होतो.पण कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनात योग्य औषध आणि उपाययोजना करून समस्या सोडवली.पाणी व खाद्य व्यवस्थापनात सुधारणा केली आणि व्यवसायाला बळकटी मिळवून दिली.या अनुभवातून मी एक गोष्ट शिकलो अडचणी या असतातच, पण त्या हाताळण्याची पद्धत ठरवते यश.

## आजचं चित्र

आजघडीला मी मत्स्यपालनातून ₹१,००,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न मिळवतो, त्यात ₹ ६०, ००० निव्वळ नफा राहतो. याच मत्स्यपालनातून मिळालेल्या खतयुक्त पाण्याचा वापर मी शेतीत करतो त्यामुळे शेतीचं उत्पादनही वाढलं आहे.

## भविष्यातील योजना

मी आता एकात्मिक मत्स्यशेतीकडे वळण्याचा विचार करतोय, म्हणजेच मत्स्यपालनाबरोबर शेती आणि इतर घटक जोडून जास्तीतजास्त उत्पन्न मिळवायचं. मत्स्यबीज उत्पादन, मत्स्य खाद्य तयार करणे आणि स्थानिक विक्री व्यवस्था यासाठीही मी तयारी करतोय. यांत्रिकीकरण, प्रशिक्षण आणि योग्य मार्गदर्शन हीच माझ्या प्रगतीची त्रिसूत्री ठरली आहे.

## माझा संदेश

शेततळं आहे, तर ते मत्स्यपालनासाठी वापरा. कमी गुंतवणुकीत आणि जास्त शाश्वत उत्पन्नासाठी मत्स्यपालन सर्वोत्तम पर्याय आहे. प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन घ्या आणि स्वतःवर विश्वास ठेवा, यश तुमचचं आहे. मत्स्यपालनात आजही अपार संधी आहेत फक्त त्या ओळखायला हव्यात आणि त्यावर काम करायला हवं.


**मार्गदर्शक**

**डॉ. अजय कुलकर्णी**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९८६००७९८२६

**डॉ. बालाजी खरटमोल**
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९९२२९६६४१७

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**गुंडेराव शंकर चौंसष्टे**
मु. पो. येरोळ, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर - ४१३५४४
संपर्क क्र. ७९७२९२८३२३

मत्स्यपालनातून
आर्थिक आत्मनिर्भरतेकडे!

# आलोक भगत यांची यशोगाथा



मी आलोक नीळकंठ भगत, गाव आलोड़ा, तालुका देवळी, जिल्हा वर्धा येथील रहिवासी. माझं शिक्षण अभियांत्रिकी क्षेत्रात झालं, मात्र नोकरीच्या ठराविक वाटेवर न जाता काही तरी वेगळं करण्याची ओढ मला होती. शेती हे आमचं पारंपारिक व्यवसाय क्षेत्र असलं, तरी शेतीसोबतच अधिक उत्पन्नाचा आणि टिकावू विकासाचा पर्याय शोधण्याच्या विचाराने मी मत्स्यपालन व्यवसायाकडे वळालो.

## सुरुवात – प्रशिक्षणातून मिळाली दिशा

मत्स्यपालन हे केवळ मासे पाळण्याचं काम नसून त्यामागे शास्त्रीय दृष्टिकोन, योग्य नियोजन आणि व्यवस्थापन आवश्यक असतं, याची जाणीव मला मत्स्य विज्ञान महाविद्यालय, माफसू, नागपूर येथे २०२० साली मिळालेल्या शास्त्रीय प्रशिक्षणामुळे झाली. डॉ. प्रशांत तेलवेकर सर यांचं वेळोवेळी मिळालेलं मार्गदर्शन माझ्यासाठी परिवर्तन घडवणारं ठरलं. त्यांनी रोहू व कटला यांसारख्या व्यावसायिक दृष्टिकोनातून फायदेशीर मत्स्य जातींच्या संगोपनाचे बारकावे समजावले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी व्यवसायाचे सर्व पैलू समजून घेत नियोजन सुरु केलं.

## व्यवसायाची मुहूर्तमेढ

सन २०२१ मध्ये मी माझ्या शेतात असलेल्या नैसर्गिक जलस्रोताचा वापर करत मत्स्यपालनाची प्रत्यक्ष सुरुवात केली. प्रारंभीची गुंतवणूक सुमारे २ लाख रुपये इतकी होती. बीज खरेदी, खाद्य, औषधे, देखभाल याचे काटेकोर नियोजन केले. व्यवसायाच्या प्रत्येक टप्प्यावर शास्त्रीय पद्धती, नियमित निरीक्षण आणि व्यवस्थापन कौशल्य यांची सांगड घालत मी एका सक्षम उद्योजकाच्या दिशेने पावले टाकली.

## नफ्याचे गणित – उत्पन्नाची शाश्वती

आज माझी वार्षिक उलाढाल सुमारे ५ लाख रुपये इतकी आहे, त्यापैकी जवळपास ४ लाख रुपयांचे उत्पन्न केवळ मासे विक्रीतून मिळते. स्थानीय बाजारपेठेत देशी माशांना भरपूर मागणी असल्यामुळे विक्री सहजतेने होते. दर्जेदार उत्पादकता, माशांचे वजन, चव आणि पोषणमूल्य यामुळे ग्राहकांचा विश्वास अधिक वाढला आहे.



## यशाचे श्रेय

या संपूर्ण प्रवासात माफसू, नागपूर व डॉ. प्रशांत तेलवेकर सर यांनी दिलेलं मार्गदर्शन हेच माझ्या यशाचं प्रमुख कारण आहे. त्यांच्यामुळे मला मत्स्यपालन व्यवसाय फक्त नफा मिळवण्याचं माध्यम वाटलं नाही, तर शाश्वत समृद्धी, पर्यावरणीय संतुलन, आणि दर्जात्मक उत्पादकता यांचं महत्त्व कळलं.

## पुढील ध्येय

आता माझं लक्ष्य उत्तम जल व्यवस्थापन, आधुनिक पोषण व्यवस्थापन, आणि ऑनलाईन विक्री प्लॅटफॉर्म्स तयार करण्यावर आहे. थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटल मार्केटिंगची तयारी सुरू आहे. शेतीच्या बरोबरीने शाश्वत आणि फायदेशीर उद्योग कसा उभारता येईल, याचा मी सातत्याने अभ्यास करत आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि नवकल्पनांची अंमलबजावणी करून व्यवसायाला नवी उंची देण्याचा माझा निर्धार आहे.

## कौशल्य विकास आणि स्थानिकांना रोजगार

मत्स्यपालन व्यवसाय करताना मी केवळ स्वतःपुरता विचार न करता, माझ्या गावातील काही तरुणांनाही या कार्यात सहभागी करून घेतलं. त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिलं, तलाव व्यवस्थापन व माशांच्या देखभालीतील तांत्रिक बाबी शिकवल्या.

त्यामुळे आज या व्यवसायातून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीही साधता आली आहे. यामुळे सामाजिक सहभाग वाढला असून गावकऱ्यांचाही माझ्या यशात मोलाचा वाटा आहे, हे मी अभिमानाने सांगतो.

## माझा संदेश

केवळ पदवी मिळवणं हे ध्येय नसावे, तर त्या ज्ञानाचा उपयोग करून योग्य मार्गदर्शन, परिश्रम आणि नियोजनाच्या जोरावर स्वतःचा मार्ग निर्माण करता येतो. मत्स्यपालन क्षेत्र हे शाश्वत उत्पन्न देणारे, कमी खर्चिक आणि पर्यावरणपूरक व्यावसायिक क्षेत्र आहे. तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आर्थिक आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वतः शोधावा.

**मार्गदर्शक**
**डॉ. प्रशांत तेलवेकर**
सहयोगी अधिष्ठाता
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, माफसू नागपूर
संपर्क क्र. ९८९०९१९५४३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**
**आलोक नीळकंठ भगत**
मु. आलोड़ा, ता. देवळी, जि. वर्धा
संपर्क क्र. ९७६६६१४३०२

# वराहपालन



# शिक्षण, शास्त्र आणि वराहपालन माझ्या यशस्वी व्यवसायाची गुरुकिल्ली

# गणेश जाधव यांची यशोगाथा



मी गणेश जनार्धन जाधव, सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील पारगाव या गावातील रहिवासी. मी वाणिज्य शाखेत लेखा विभागात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीच्या वाटेवर न जाता, मला माझ्या पिढीजात वराहपालन व्यवसायात काहीतरी वेगळं आणि शाश्वत घडवायचं होतं.

वराहपालनासोबत चिंचं खरेदी-विक्री आणि बुरुडकाम हे आमचे पूरक व्यवसाय होते. पण प्लास्टिकच्या वस्तूंच्या वाढत्या वापरामुळे बुरुडकाम ठप्प झालं आणि मुक्त वराहपालनावर आलेल्या निर्बंधांमुळे वराहपालनही अडचणीत आलं.

## बंदिस्त वराहपालनाचा निर्णय

मी ठरवलं, व्यवसायाला नव्याने उभं करायचं. डिसेंबर २०१९ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे डॉ. गोकुळ सोनवणे आणि डॉ. मुकुंद आमले यांची भेट घेतली. त्यांच्याकडून मला बंदिस्त वराहपालनाची प्राथमिक माहिती मिळाली.

मे २०२० मध्ये मी आपल्या घराजवळ ३ लाख रुपये खर्चून बंदिस्त वराह आवास उभारलं. शेड तयार झाल्यानंतर खरी परीक्षा सुरु झाली. पिलांची मरतुक, मंद वाढ, जंतप्रादुर्भाव, मादींकडून कमी दूध या सगळ्या अडचणी समोर उभ्या ठाकल्या.

## टर्निंग पॉइंट

मी हार मानली नाही. १० ते १२ ऑक्टोबर २०२३ रोजी, मी क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय, शिरवळ इथे वराहपालन व्यवस्थापनावर शास्त्रोक्त प्रशिक्षण घेतलं.

डॉ. गोकुळ सोनवणे सरांच्या मार्गदर्शनाखाली वराह जातींची निवड, आहार, लसीकरण, जंत निर्मूलन, निवारा व्यवस्थापन, विक्री तंत्र याचा सखोल अभ्यास केला. या प्रशिक्षणातून मला महाराष्ट्रभरातील वराहपालकांशी संपर्क जोडता आला. डॉ. धायगुडे सरांनी दगावलेल्या वराहांचं पोस्टमार्टम करून नेमकी कारणं शोधून दिली आणि इतर आजारी वराहांवर औषधोपचार सुचवले. तिथूनच माझा व्यवसाय योग्य मार्गावर आला.



## व्यवसायाचं नवं रूप

आज माझ्याकडे २ वराह शेड आहेत, त्यापैकी एक मी भाड्याने घेतलं आहे. सध्या माझ्याकडे ३ प्रजननक्षम नर, ३० माद्या आणि लहान-मोठ्या वराहांसह एकूण १६० वराह आहेत. मी केवळ वराह पालनच नाही, तर खंडाळा येथे स्वतःचं वराह मांस विक्रीचं दुकान सुरू केलं आहे. मांसाच्या दर्जावर विशेष लक्ष केंद्रित करत ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.आता मी प्रक्रियायुक्त उत्पादनांचा विचार करत असून, हॉटेल्स आणि थेट ग्राहकांना पुरवठा करण्याचं जाळं विस्तारण्याचा मनोदय आहे.

## आर्थिक यशाचे आकडे

एकूण वार्षिक उत्पन्न (वराह विक्री आणि मांस विक्री) ₹११.३७ लाख, एकूण खर्च (शेड भाडं, कामगार, खाद्य, वाहतूक, लसीकरण): ₹ ४.१४ लाख, निव्वळ नफा ₹ ७.२३ लाख...ही आकडेवारीच माझ्या यशस्वी प्रवासाची साक्ष आहे.

## यशाचे श्रेय

माझ्या व्यवसायाला दिशा देणारे डॉ. गोकुळ सोनवणे, डॉ. मुकुंद आमले आणि डॉ. विठ्ठल धायगुडे हे माझ्यासाठी केवळ मार्गदर्शक नव्हे, तर प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या शास्त्रशुद्ध मार्गदर्शनामुळेच मी अडचणींवर मात करून उभा राहू शकलो. त्यांच्याशी नियमित सल्लामसलत, फोनवरून संवाद, प्रत्यक्ष भेटी यांमुळे माझा आत्मविश्वास वाढत गेला. माफसूसोबत जुळल्यामुळे माझा व्यवसाय शास्त्रशुद्ध झाला आणि त्यातूनच नफा, सन्मान आणि समाधान मिळालं.

## माझा संदेश

कोणताही व्यवसाय छोटा किंवा मोठा नसतो. जर तो योग्य मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञान आणि चिकाटीने केला, तर त्यातही भविष्य असतं. वराहपालन हे त्याचं उत्तम उदाहरण आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ.विठ्ठल धायगुडे**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९८६०५३४४८२

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**गणेश जनार्धन जाधव**
मु. पो. पारगाव, ता. खंडाळा, जि. सातारा - ४१२ ८०२
संपर्क क्र. ८६९८६९५४३७

माफसू यशोगाथा २०२५

## वराहपालनातून शाश्वत यशाकडे वाटचाल

# लक्ष्मण पवार यांची यशोगाथा



मी लक्ष्मण शिवाजी पवार, पुणे जिल्ह्यातील मांडकी (ता. पुरंदर) या गावचा रहिवासी. आमचं कुटुंब अगदी साधं, आई-वडील मोलमजुरी करत आणि पारंपारिक पद्धतीने मुक्त वराहपालन करत. लहानपणापासून मी वराहांमध्ये रमायचो. त्यांचं पालनपोषण, विक्री, सर्व पाहून मोठा झालो. पण व्यवस्थापनात शास्त्रीय माहितीचा अभाव असल्यामुळे उत्पन्न फारसं टिकून राहत नव्हतं.तरुण वयात मी जेसीबी ऑपरेटर म्हणून काम केलं, पण मन तिथे रमत नव्हतं. माझा खरा कल वराहपालनाकडेच होता, पण त्यात मला शास्त्रशुद्ध पद्धतीने काम करायचं होतं.

## अडचणी, अनुभव आणि निर्णय

सुरुवातीच्या काळात वराहपालनात मला अनेक अडथळे आले. पिलांची मरतुक, वाढीचा वेग मंदावणं, जंतप्रादुर्भाव, कोविड काळातील खाद्याची कमतरता आणि विक्रीतील अडचणी. मी ठरवलं की आता व्यवसाय शास्त्रीय पद्धतीनेच करायला हवा.

## मार्गदर्शनाचं वळण ठरलं निर्णायक

एप्रिल २०२१ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ इथं गेलो आणि डॉ. गोकुळ सोनवणे सरांची भेट घेतली.त्यांनी मला वराहांच्या आहार, आरोग्य, निवारा आणि व्यवस्थापन यावर सखोल माहिती दिली. त्याचं पुढचं पाऊल होतं... २१ ते २३ सप्टेंबर २०२२ या कालावधीत घेतलेलं शास्त्रशुद्ध वराहपालन प्रशिक्षण. या प्रशिक्षणातून मी शिकलो की योग्य नर-मादी निवड, त्यांच्या उत्पादनक्षमता, जाती, आरोग्य, वर्तन, हे सर्व बघून प्रजनन करावं लागतं. लसीकरण, जंतनिर्मूलन, स्वच्छता यामुळे पिल्लांचा मृत्यूदर लक्षणीयरित्या कमी झाला. व्यावसायिक नेटवर्किंगही इथूनच सुरू झालं. वराह विक्रीसाठी तयार झालेल्या संपर्कांचाही उपयोग झाला.

## समांतर मार्गदर्शकांचा आधार

डॉ. सोनवणे सरांनी या क्षेत्रात मला उभं केलं, त्यांचं प्रत्येक मार्गदर्शन माझ्यासाठी नव्या उंचीचं दार उघडून देत गेलं. डॉ. मुकुंद आमले व डॉ. हेमंत बिराडे सरांचंही मार्गदर्शन मला वेळोवेळी मिळालं. डॉ. चंद्रशेखर मोटे सरांनी व्यवसायाच्या व्यवस्थापनातून आत्मविश्वास दिला, जे आजच्या यशाचं मूळ ठरलं.



## व्यवस्थापन आणि व्यवसायाची रचना

मी दोन शेड उभारले. एक ३५ x १५ फूट तर दुसरा ५० x ३० फूट. आज माझ्याकडे २ प्रजननक्षम नर, ३० माद्या आणि १०५ पिल्लांसह एकूण १४० वराह आहेत.

## आर्थिक चित्र – यशाचं गणित

सन २०२३–२४ या आर्थिक वर्षात वराह विक्री आणि मांस विक्री यामधून मला एकूण ₹१०.६० लाख उत्पन्न मिळालं. त्यातील ₹४.४० लाख खर्च (खाद्य, शेड व्यवस्थापन, औषधोपचार, मजुरी) वजा जाता, ₹६.२० लाख निव्वळ नफा मिळाला. पूर्वीच्या साधारण परिस्थितीपासून आजवरचा हा प्रवास माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी झेप ठरली आहे. वर्षभरामध्ये तब्बल १०० टनाच्या आसपास वराहांची मागणी गोवा आणि आसाम या राज्यांमधून मला येते. त्याची पूर्तता मी माझे शेड आणि परिसरातील अन्य वराहपालकांच्या सहकार्याने करतो.

## सामाजिक सन्मान आणि भावी दिशा

पूर्वी मी जिथं छोटा मजूर होतो, तिथं आज मला यशस्वी वराहपालक म्हणून ओळखलं जातं. माझे उंचावलेले राहणीमान, समाजातील स्थान आणि आर्थिक स्वायत्तता हे सगळं वराहपालनामुळेच शक्य झालं आहे. आता माझं पुढचं लक्ष्य व्यवसाय आणखी विस्तारित करायचा आणि वराह मांस विक्रीतही अधिक योजनाबद्ध प्रवेश करण्याचे आहे.

## माझा संदेश आणि कृतज्ञता

"वराहपालन करताना त्यामागे जर शास्त्र, योग्य मार्गदर्शन आणि स्वतःची मेहनत आणि प्रयत्न असेल, तर हा व्यवसाय तुमचं आयुष्य बदलू शकतो." माझं यश कुटुंबाच्या पाठिंब्याचं आणि शिरवळ येथील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचं फलित आहे. डॉ. सोनवणे सर, डॉ. मोटे सर आणि इतर सर्व मार्गदर्शकांचे मी मनापासून आभार मानतो


**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. चंद्रशेखर मोटे**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८२३७२६९५९१

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**लक्ष्मण शिवाजी पवार**
मु. पो. मांडकी, ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२ ३०५
संपर्क क्र. ९८९०५४४८१८

# शेड ते शाश्वत यश; वराहपालनातून आमच्या घराची समृद्धी
# प्रदीप म्हेत्रे यांची यशोगाथा



मी प्रदीप बबन म्हेत्रे, पुणे जिल्ह्यातील नांदूर या छोट्याशा गावात राहतो. माझं शिक्षण बारावीपर्यंत झालं असून, आमचं ७ एकर बागायती शेतीवर आधारित कुटुंब आहे. ऊस, मका, गहू, बाजरी ही आमची मुख्य पिकं. पण शेतीपुरते उत्पन्न पुरेसं वाटत नव्हतं. म्हणून शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मी वराहपालनाची दिशा पकडली.

## सुरुवात भारी पण अडचणींची स्वारी

सप्टेंबर २०१६ मध्ये, मी तब्बल १५ लाख रुपये खर्चून १२० x ४५ फूटाचा वराह शेड उभारला आणि व्हाईट लार्ज यॉर्कशायर जातीचे ३ नर व ४० माद्या खरेदी केल्या. वराहपालनात पाऊल टाकताच २०१८ मध्ये स्वाईन फिव्हरचा मोठा प्रादुर्भाव झाला आणि मला आर्थिकदृष्ट्या मोठा फटका बसला. आजूबाजूच्यांकडून हेटाळणी झाली, पण मी न डगमगता आत्म-परीक्षण केलं आणि निर्णय घेतला की, हा व्यवसाय शास्त्रशुद्ध मार्गानेच करायचा!

## मार्गदर्शन – यशाचा खरा पाया

जून २०१९ मध्ये, मी शिरवळ येथील डॉ. गोकुळ सोनवणे व डॉ. मुकुंद आमले यांचं मार्गदर्शन घेतलं. वराह संशोधन प्रकल्पाला भेट दिली आणि व्यवस्थापन शिकलो. १० ते १२ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत वराहपालन प्रशिक्षण घेतलं. सरांनी जातींची निवड, आहार आणि विक्रीबाबत उपयुक्त ज्ञान दिलं. या प्रशिक्षणामुळे मला महाराष्ट्रभर व्यावसायिक मार्केट मिळालं.

## काटेकोर व्यवस्थापन

सध्या माझ्या शेडवर ६०० वराह आहेत. जैव सुरक्षा पाळली जाते, सीसीटीव्ही बसवले आहेत. हॉटेल उष्टावळ आणण्यासाठी स्वतःचा टेम्पो आणि चालक आहे. वयानुसार आहार नियोजन, उन्हाळ्यात तापमान नियोजन फॉगर द्वारे केले जाते.



## पत्नीचा भक्कम पाठिंबा – माझं बळ

शेतीचं काम असो वा शेडचं, माझी पत्नी प्रत्येक टप्प्यावर साथ देते. खाद्यपाणी, स्वच्छता ती स्वतः पाहते. माझ्या यशामागे आमचं सामूहिक श्रम आहे.

## २०२३–२४ आर्थिक वर्षातील ठळक आकडे

उत्पन्न ₹९९.७० लाख तर खर्च ₹४९.२२ लाख आणि निव्वळ नफा ₹५०.४८ लाख झाला. हा नफा फक्त आर्थिक नाही, तर सामाजिक आणि मानसिक समाधानाचं प्रतीक आहे.

## आर्थिक प्रगती आणि नवजीवन

पूर्वी वराहपालनाला समाजात फारसं महत्त्व दिलं जात नव्हतं. पण याच व्यवसायामुळे आमच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती मजबूत झाली. आज मी यशस्वी वराहपालक म्हणून ओळखला जातो. या प्रगतीमुळे माझं आयुष्य सकारात्मकपणे बदललं असून स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेचा हा मार्ग मला वराहपालनानेच दाखवला.

## पुढची दिशा – हजार वराह विक्रीचं लक्ष्य

सध्या २ शेड, ३ शोष खड्डे आहेत. खड्ड्यांचं पाणी मड पंपद्वारे उसात वापरतो. ज्यामुळे खताचा आणि पाण्याचा दुहेरी फायदा मिळतो. पुढच्या वर्षात माझं लक्ष्य आहे १००० वराहांची विक्री! वराहपालन हे शाश्वत उत्पन्नाचं मॉडेल बनवण्याचा प्रयत्न आहे.

## माझा संदेश आणि कृतज्ञता

वराहपालन जर शास्त्रशुद्ध पद्धतीने केलं, तर संधीचं सोनं होऊ शकतं. माझ्या या यशात डॉ. सोनवणे, डॉ. आमले आणि शिरवळ महाविद्यालयाचं मोलाचं मार्गदर्शन आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानतो. याशिवाय मला मयूर पिगरीचे मालक व माझे मित्र बाळासाहेब जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.


**मार्गदर्शक**

**डॉ. गोकुळ सोनवणे**
विषय विशेषज्ञ
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८७९६४४८७०७

**डॉ. मुकुंद आमले**
माजी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ७७५७०१९९३३

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रदीप बबन म्हेत्रे**
मु. पो. नांदूर, ता. दौंड, जि. पुणे - ४१२ २०२
संपर्क क्र. ९९२३९०५९३८

# प्रक्रिया उद्योग



## सुराज्य - दुग्ध व्यवसायातून उभा राहिलेला विश्वासाचा ब्रँड

# संदीप सावंत यांची यशोगाथा



मी संदीप दिनकर सावंत, मूळचा साताऱ्यातील धामणी गावचा. माझं बालपण, शिक्षण आणि सुरुवातीचं सगळं आयुष्य मुंबईत गेलं. वडील पोलीस खात्यात नोकरीला होते, त्यामुळे घरात शिस्त आणि मेहनतीला महत्व देण्याची सवय लहानपणापासूनच लागली. मी वाणिज्य शाखेतील पदवी घेतली आणि काही काळ खासगी कंपनीत नोकरी केली. नोकरी सुरळीत चालू असताना, २०१३ मध्ये एम.ए. डी.एड पदवीधारक मंजुश्रीशी विवाह झाला आणि तिथून आमच्या 'सुराज्य'च्या प्रवासाला खरी दिशा मिळाली.

### वेगळी वाट - व्यवसायाला सुरुवात

मुंबईच्या चकाकीतून थेट माझ्या गावी धामणीला परत येण्याचा निर्णय सोपा नव्हता. इथे ना ओळखी, ना अनुभव. पण एक संकल्प मनात पक्का होता. शेतकऱ्यांसाठी काहीतरी करायचं, गावात रोजगार निर्माण करायचा. याच प्रेरणेने २१ सप्टेंबर २०२० रोजी ६ म्हशी खरेदी करून दुग्ध व्यवसायाला सुरुवात केली. स्वतःच्या ४० लाखांच्या भांडवलासह अण्णासाहेब पाटील योजनेतून १० लाखांचं कर्ज घेतलं. पण व्यवसाय सुरु झाल्यावर लक्षात आलं, फक्त दूध विकून फारसा फायदा मिळत नाही आणि मग ठरवलं की, दुग्धजन्य पदार्थ तयार करून विक्री करायचं.

### प्रशिक्षण

दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचं कौशल्य नव्हतं, म्हणून पत्नी मंजुश्रीसोबत १८ ते २० ऑगस्ट २०२१ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे प्रशिक्षण घेतलं. डॉ. बापुराव कदम आणि डॉ. दिपाली सकुंडे यांनी दही, लस्सी, ताक, श्रीखंड, खवा, बासुंदी, पनीर, कुल्फी अशा अनेक पदार्थांच्या प्रात्यक्षिकाद्वारे आम्हाला मार्गदर्शन केलं. सुरुवातीला उत्पादने अपूर्ण होती, पण वेळोवेळी कदम सरांना संपर्क करून मार्गदर्शन घेतलं, त्यांच्याच सूचनेवरून खवा मशीन, क्रीम सेपरेटर इतर यंत्रसामग्री खरेदी केली.

### 'सुराज्य' ब्रँडची मुहूर्तमेढ

आम्ही 'सुराज्य' नावाचा ब्रँड सुरू केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारातून प्रेरणा घेऊन स्वराज्यातील सुराज्याचा ध्यास मनाशी बाळगला आणि एक नवीन वाटेवर प्रवास सुरू केला. मी स्वतः व्यवसायाचं नियोजन बघतो आणि पत्नी, वडील, भाऊ, वहिनी असं सगळं कुटुंबच व्यवसायात काम करतं. बरोबर चार विश्वासू कर्मचाऱ्यांची टीम खांद्याला खांदा लावून जबादारीने उभी आहेच. दूध संकलन, दुग्धजन्य पदार्थ तयार करणे, पॅकिंग, विक्री हे सगळं आम्ही उत्तम व्यवस्थापनाद्वारे पूर्ण करतो.




### नफ्याचे गणित

सुरुवातीची वर्षं कठीण गेली. बँका कर्ज देत नव्हत्या, पण बँकेत खातं उघडलं, व्यवहार सुरळीत केले आणि व्यवसायाची नोंदणी केल्यावर बँकाच कर्जासाठी पुढे आल्या. सध्या २०९ शेतकऱ्यांकडून दररोज ५०० लिटर दूध संकलन करतो. दोन स्वतःची दुकाने, इतर विक्रेते आणि सण-समारंभासाठी खास ऑर्डर्स मिळतात. दुग्धजन्य पदार्थांची बाजारात चांगली मागणी आहे. व्यवसायाची FSSAI नोंदणी झाली असून वार्षिक उलाढाल ₹१.५ कोटींच्या पुढे गेली आहे. मासिक निव्वळ नफा ₹१ लाखाच्या घरात आहे.

### पुढची पावले

ग्राहकवर्ग वाढतोय, मागणी वाढतेय आणि 'सुराज्य' ब्रँडविषयी लोकांना विश्वास वाटतोय. लवकरच पुणे आणि मुंबईत आमची उत्पादने घेऊन जाण्याचं स्वप्न आहे.

### यशाचे श्रेय

माझं यश हे माझ्या कुटुंबाच्या कष्टामुळे, डॉ. बापुराव कदम सरांसारख्या माफसूच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे आणि आमच्या प्रामाणिक मेहनतीमुळे शक्य झालं. आज गावात मला मान आहे, लोक जोडले जातात. सुरुवातीला जे शक्य वाटत नव्हतं, आज त्याचं रूपांतर स्वप्नपूर्तीत झालं आहे.

### माझा संदेश

तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता स्वतःच्या पायावर उभं राहावं, पक्क ध्येय ठरवावं आणि योग्य मार्गदर्शनाच्या आधारे अडचणींचा सामना करत पुढे जात राहावं, कारण प्रयत्न केल्यावर यश हे मिळणारच.

**मार्गदर्शक**
**डॉ. बापुराव कदम**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८४५९८२४९४४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**
**संदीप दिनकर सावंत**
मु. पो. धामणी, ता. पाटण, जि. सातारा - ४१५ ११२
संपर्क क्र. ७७२२०३८०१३

# शिक्षण, अनुभव आणि ध्येयपूर्ती; कार्वी डेअरीचा यशस्वी प्रवास

# प्रशांत चौगुले यांची यशोगाथा



माझं नाव प्रशांत जीवनधर चौगुले. माझा जन्म सांगली जिल्ह्यातील भिलवडी या छोट्या गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती जेमतेम होती, पण शिक्षण घेण्याचा ध्यास घेतला आणि अखेर अभियांत्रिकी पदवी मिळवली. पुढे पुण्यातल्या खाजगी कंपनीत नोकरी स्वीकारली. तिथं काम करताना इंडस्ट्रियल मार्केटिंग क्षेत्रात अनुभव घेतला आणि २००३ साली मी स्वतःची मार्केटिंग कंपनी सुरू केली.

दरम्यान, सोनिया यांच्याशी लग्न झालं. त्या अन्न तंत्रज्ञान विषयातील पदवीधर आहेत. त्यांच्या शिक्षणाची ताकद आणि माझा व्यवसायातील अनुभव यामुळे एक कल्पना आकार घेऊ लागली. काहीतरी वेगळं करायचं होतं आणि मग ठरवलं की, आपण दुग्ध व्यवसायात उतरायचं.

## व्यवसायाची सुरुवात

२०१२ साली 'कार्वी डेअरी' या नावाने व्यवसायाची सुरुवात केली. सुरुवातीला दूध संकलन करून जवळच्या खाजगी डेअरींना देण्याचं काम सुरू केलं. हळूहळू 'कार्वी' ब्रँडने दही, ताक, लस्सी यासारख्या पदार्थांचं उत्पादन आणि विक्री सुरू केली. दैनंदिन दूध संकलन १००० लिटरपर्यंत पोहोचलं.

व्यवसाय वाढवण्यासाठी २०१९ साली मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथे दुग्धप्रक्रिया प्रशिक्षण घेतलं. तिथं डॉ. बापुराव कदम सरांचं मार्गदर्शन मिळालं. त्यामुळे माझ्या व्यवसायाला नवी दिशा मिळाली.



## दुध पाश्चरायझेशन

प्रशिक्षणानंतर मी दूध पाश्चरायझेशन प्रकल्प सुरू केला, आणि 'कार्वी दूध' या नावाने पिशवीबंद दूधाची विक्री सुरू झाली. आज आम्ही दररोज ६०० ते ७०० लिटर पिशवीबंद दूध विकतो आणि उरलेलं दूध श्रीखंड, खवा, पनीर, बासुंदी यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीसाठी वापरतो. हे सर्व शिवाजीनगर, भिलवडी येथील विक्री केंद्रावरून तसेच जयसिंगपूर आणि सांगलीच्या दुकानदारांपर्यंत व ग्राहकांपर्यंत पोहोचवतो.

## आर्थिक गणित

व्यवसायाची भक्कम पायाभरणी करण्यासाठी एक कोटी रुपयांची गुंतवणूक केली. यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून अनुदान आणि बँक ऑफ इंडियाकडून ७० लाखांचं कर्ज मिळालं. सध्या आम्ही १०० शेतकऱ्यांकडून दूध संकलन करतो आणि ९ जणांना रोजगार दिला आहे.

सर्व खर्च वजा जाता आज मी मासिक सुमारे एक लाख रुपये निव्वळ नफा मिळवतो. याशिवाय आम्ही स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या गाई-म्हशींच्या आहार, आरोग्य आणि दुधाच्या गुणवत्ता वाढीसाठी सल्लाही देतो. त्यामुळे आमच्या सभोवतालच्या लोकांचंही अर्थकारण मजबूत होऊ लागलं आहे.

## यशाचे श्रेय

या प्रवासात मी एकटाच नव्हतो माझी पत्नी सोनिया यांचं अन्नतंत्रज्ञानातील ज्ञान, डॉ. बापुराव कदम सरांचं शास्त्रीय मार्गदर्शन आणि माझ्या टीमचं समर्पण यांच्यामुळेच 'कार्वी डेअरी' आज यशाच्या शिखरावर आहे.

## माझा संदेश

या व्यवसायात यश मिळालं, कारण मी मेहनतीवर विश्वास ठेवला आणि व्यवसायावर लक्ष केंद्रित केलं. मला वाटतं, नोकरीसाठी वणवण करण्यापेक्षा, स्वतःचा व्यवसाय सुरू करणं हाच यशाचा खरा मार्ग आहे. कोणत्याही व्यवसायात शास्त्रशुद्धता, चिकाटी आणि ग्राहकाभिमुखता या त्रिसूत्रीचा आग्रह ठेवल्यास यश नक्कीच मिळतं.

**मार्गदर्शक**

**डॉ. बापुराव कदम**

प्राध्यापक

क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

संपर्क क्र. ८४५९८२४९४४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रशांत जीवनधर चौगुले**

शिवाजीनगर, भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली - ४१६ ३०३

संपर्क क्र. ९४२२४०८६३३

माफसू यशोगाथा २०२५

# चंदन नॅचरल डेअरी – विदेशातून गावाकडे; एक यशस्वी दुग्धप्रक्रिया प्रवास

# पांडुरंग कोठेवार यांची यशोगाथा



मी पांडुरंग जीवन कोठेवार, मूळचा नवेगाव, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथील रहिवासी. बी.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण करून त्यानंतर तब्बल १२ वर्षे परदेशात भाषा प्रशिक्षक म्हणून काम केले. नोकरी उत्तम चालू होती, पण २०१८ मध्ये भावाच्या अचानक निधनामुळे मला भारतात कायमस्वरूपी परतावं लागलं. तेव्हा मी एक निर्णय घेतला... आपल्या गावीच काहीतरी करायचं!

## चंदन डेअरीची सुरुवात

कुक्कुटपालनाचा पूर्व अनुभव होताच. पण मला नेहमीच दूध आणि दुग्धप्रक्रिया या क्षेत्रात रस होता. म्हणूनच २०१८ मध्ये गावी परत आल्यावर मी चार जनावरांपासून 'चंदन नॅचरल डेअरी' या नावाने व्यवसाय सुरू केला.

## प्रशिक्षणाने बदलली दिशा

पण सुरुवातीला लक्षात आलं की केवळ कच्चं दूध विकून फारसा नफा होत नाही. त्यामुळे मी दुग्धजन्य पदार्थ निर्मितीकडे वळायचं ठरवलं. पण या कामासाठी कौशल्य लागतं, आणि ते माझ्याकडे नव्हतं. याच वेळी माझ्या आयुष्यात एक महत्त्वाचा टप्पा आला. क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथून दुग्धप्रक्रिया प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली.

डॉ. बापूराव रघुनाथ कदम सरांचे मार्गदर्शन या प्रवासात अत्यंत मोलाचं ठरलं. त्यांनी आम्हाला दही, लस्सी, श्रीखंड, खवा, बासुंदी यांसारख्या दुग्धपदार्थांची निर्मिती केवळ सैद्धांतिक नव्हे, तर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून शिकवली. त्यांच्या अनुभवाच्या आणि ज्ञानाच्या जोरावरच मी पुढची पावलं आत्मविश्वासाने टाकू शकलो.




## व्यवस्थापन

प्रशिक्षण संपताच मी खवा यंत्र, पनीर साचे, क्रीम सेपरेटर यांसारखी यंत्रसामग्री विकत घेतली आणि केवळ ५०० चौरस फुटांच्या जागेत उत्पादन सुरू केलं. आज माझ्यासोबत पत्नी आणि चार कामगार मिळून सहा जणांची टीम या व्यवसायात काम करते. दैनंदिन ४०० लीटर दुध संकलन केले जाते ज्यापैकी २०० लीटर दुधाची विक्री होते तर उरलेले २०० लीटर दुधापासून दुग्धपदार्थ तयार केले जातात.

## नफ्याचे गणित

आजघडीला या व्यवसायात माझा मासिक खर्च ₹ ५ लाख रुपये आहे आणि मासिक उत्पन्न ₹ ६.५ लाख रुपये आहे. तर मासिक नफा ₹ १.५ लाख रुपये एवढा आहे.

## विस्तार आणि ओळख

गाव लहान असल्यामुळे सुरुवातीला विक्रीला मर्यादा होत्या. पण मी तालुक्याच्या ठिकाणी, इतर गावी उत्पादन पोहोचवायला सुरुवात केली. एकच गोष्ट लक्षात ठेवली – गुणवत्ता! आणि आज त्या गुणवत्तेच्या जोरावरच 'चंदन नॅचरल डेअरी' हे नाव गावाच्या पलीकडे ओळखली जाते. आज माझा व्यवसाय केवळ आर्थिकदृष्ट्या यशस्वी झालेला नाही, तर समाजात प्रतिष्ठा आणि स्थान देणारा ठरलाय. व्यवसायाच्या माध्यमातून इतरांनाही रोजगार मिळतोय, याचा विशेष आनंद आहे.

## यशाचे श्रेय

या यशाचे खरे श्रेय डॉ. कदम सरांना, माझ्या परिवाराच्या साथीला, आणि तत्परतेने मेहनत करणाऱ्या टीमला देतो. या सार्वांच्या पाठिंब्यामुळे मी माझ्या व्यवसायात प्रगती करू शकलो.

## माझा संदेश

ज्याचं मन प्रामाणिक आहे, जो शिकायला तयार आहे, त्याच्यासाठी कुठलीही जागा लहान नसते. व्यवसाय लहान जागेत सुरू करता येतो, फक्त दृष्टिकोन मोठा हवा! अन्न व दुग्ध व्यवसायाची मागणी कमी होत नाही, फक्त त्यात सातत्य आणि गुणवत्ता पाहिजे!

**मार्गदर्शक**

**डॉ. बापुराव कदम**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८४५९८२४९४४

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**पांडुरंग जीवन कोठेवार**
मु.पो. नवेगाव, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर - ४४१ २१२
संपर्क क्र. ९९२३२७६६९०

## देशी गोवंश संवर्धनातून उभा केला स्वतःचा व्यवसाय

# संध्या भोसले यांची यशोगाथा



मी संध्या लालासाहेब भोसले, लोणी (ता. खंडाळा, जि. सातारा) गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबातील गृहिणी. आमचं एकत्रित कुटुंब, चार ते पाच एकर शेती आणि एक छोटं स्टेशनरी दुकान यावरच आमचं संपूर्ण आयुष्य सुरू होतं. दरम्यान घरच्या देशी गायी आणि त्यांचं शुध्द दूध पाहताना नेहमी वाटायचं, "याचं महत्त्व आपण समजून घेतलं नाही, पण बाजाराला त्याची खरी किंमत कळते!"

### देशी गोवंशाने व्यवसायाची सुरुवात

घरात २-३ गिर गायी होत्या. त्यामुळे गोपालनाचा अनुभव माझ्याकडे होताच. मी ठरवलं शेतीला पूरक व्यवसाय करायचा आणि देशी गाईच्या दुधावर आधारित दुग्ध प्रक्रिया उद्योग सुरू करायचा.

सन २०१७ मध्ये मी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ येथील पशुपदार्थ प्रक्रिया तंत्रज्ञान विभागात प्रशिक्षण घेतलं. डॉ. दिपाली सकुंडे मॅडम आणि डॉ. चंद्रकांत भोंग सर यांनी प्रात्यक्षिकात्मक मार्गदर्शन केले. दुधाच्या गुणवत्ता चाचण्या, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, स्वच्छ दूध प्रक्रिया... इत्यादी सगळं मी शिकले आणि त्याच वर्षी निर्णय घेतला " आता हीच माझी वाट!"

### 'गणराज देशी काऊ मिल्क अँड प्रोडक्ट्स'

सुरुवात घरच्या गायींपासून केली. मग बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिरवळ यांच्याकडून ₹५ लाखांचं कर्ज घेतलं. गोठा उभारला व कडबा कुट्टी मशीन आणि गायी विकत घेतल्या. हळूहळू मी व्यवसायाचा विस्तार करत गेले. आज मी 'गणराज देशी काऊ मिल्क अँड प्रोडक्ट्स' या नावाने FSSAI नोंदणीकृत व्यवसाय चालवत आहे. दूध, साजूक तूप, पनीर व ताक अशी विविध उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहे. गावोगाव वितरण व्यवस्था निर्माण करून देशी गायींच्या दूधाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचं काम करत आहे.



### नफ्याचे गणित

आम्ही दररोज ४०–५० लिटर दूध (₹८०/लिटर) तसेच पारंपारिक पद्धतीने तूप (₹३०००/किलो), दही, चक्का, पनीर, ताक, गोवऱ्या आणि कंपोस्ट खत तयार करून शिरवळ व आसपासच्या परिसरात विकतो. दुधातून ₹६०,०००, दुग्धजन्य पदार्थांमधून ₹३८,००० आणि गोवऱ्या विक्रीतून ₹१०,००० मिळून मासिक उत्पन्न ₹१,०८,००० होते, तर खर्च ₹७०,००० वजा गेल्यावर ₹३८,००० निव्वळ नफा राहतो. आजपर्यंत ₹८ लाखांची गुंतवणूक केली असून त्यात ₹३ लाख स्वतःचे व ₹५ लाख बँकेचे कर्ज आहे.

### आव्हाने आणि त्यावर मात

पशुखाद्याचा खर्च वाढतो आहे, शासकीय खरेदी यंत्रणा देशी दुधासाठी नाही, कामगार मिळवणे कठीण आहे. पण पती आणि कुटुंबातील सर्व सदस्यांची मदत व प्रेरणा माझ्या पाठीशी आहे, यामुळेच मी हे शक्य करू शकले.

### पुढचं ध्येय

देशी गाईच्या दुधावर आधारित पंचगव्य उत्पादने तयार करून समाजसेवा आणि व्यवसाय वाढवायचा आहे. यातून शाश्वत आरोग्य, ग्रामीण उद्योगवाढ आणि गोसंवर्धन या तिन्ही उद्दिष्टांना चालना देण्याचा मानस आहे.

### यशाचं श्रेय

शिकण्याची तयारी, मेहनत, वेगळेपणा जपण्याची जिद्द, आणि योग्य मार्गदर्शन हेच माझ्या यशाचं गमक आहे! मी आजवरची माझी वाटचाल डॉ. दिपाली सकुंडे मॅडम आणि डॉ. चंद्रकांत भोंग सर यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाशिवाय पूर्ण करू शकले नसते. शास्त्रोक्त मार्गदर्शनामुळेच 'गणराज' चा पाया पक्का झाला.

**मार्गदर्शक**

**डॉ. दिपाली सकुंडे**
प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ९९६०८५३७०९

**डॉ. चंद्रकांत भोंग**
सहयोगी प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क क्र. ८६००२३६३००

**उद्योजिकेचे नाव व पत्ता**

**संध्या लालासाहेब भोसले**
मु. पो. लोणी, ता. खंडाळा, जि. सातारा - ४१५ ५२६
संपर्क क्र. ९९२३४६२२०३

# श्री वारी'च्या तुपातून चाखली यशाची चव!

# सौ. पद्मजा कुलकर्णी यांची यशोगाथा



मी पद्मजा राहुल कुलकर्णी, मूळची नांदेड जिल्ह्यातील. माझं बालपण शेती आणि पशुपालनाशी जोडलेलं होतं. सासरी आल्यावरही थोडं पशुधन होतं, पण योग्य व्यवस्थापनाचं ज्ञान नव्हतं. मी बी.कॉम, जीडीसीए, B.P.Ed, डिप्लोमा इन होम सायन्स ही शिक्षणं घेतली. त्यातून पुढे फॅशन डिझायनिंग, रांगोळी, अबॅकस, पार्लर, एम्ब्रॉइडरी अशा अनेक गोष्टी शिकले, नोकरीही केली. परंतु, आई आणि पत्नी या जबाबदाऱ्या पार पाडताना माझं स्वतःचं काहीतरी करायचं स्वप्न मनात धगधगत होतं.

## प्रेरणा आणि व्यवसायाची सुरुवात

सुरुवात एका गाईपासून केली, दिवसाला ४-५ लिटर दूध मिळायचं. १००० स्क्वे. फूटाचा गोठा होता, आणि दुधातून वार्षिक फक्त ₹१.२ लाख उत्पन्न मिळायचं. त्याच दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात महिला उद्योजकता प्रशिक्षण घेतलं. तिथे डॉ. शशिकांत पाटील, विणा तालिकोटकर मॅडम आणि टीमचं मार्गदर्शन लाभलं. डॉ. शितल चोपडे मॅडम व डॉ. महेश जावळे सर यांनी पशुपालन व पशुआहारावर सातत्यानं मार्गदर्शन केलं. दुग्धजन्य पदार्थ शास्त्रोक्त पद्धतीने तयार करून ब्रँड नावाने विक्री केल्यास यश निश्चित आहे, असा सल्लाही दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कल्पनांना दिशा व आत्मविश्वास मिळाला आणि मग हे स्वप्न सत्यात उतरवायचं ठरवलं.

## आयुष्य बदलणारा क्षण; दुःखातून घेतली उभारी

कोरोनाच्या काळात व्यवसाय थांबला. १६ मे २०२१ रोजी आई-वडील कोरोनामुळे गेले. मी पूर्णपणे कोसळले. पण त्या दुःखातूनच नवी ताकद मिळाली. निर्धार केला की, आई बाबांच्या स्मृतीसाठी, मुलांसाठी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी मी पुन्हा उभी राहणार!

## दुग्धजन्य पदार्थ निर्मितीकडे वाटचाल

कुटुंबीयांच्या मदतीनं आणि खाजगी कर्जातून ₹३ लाखांची गुंतवणूक करून तीन म्हशी, कडबा कुट्टी यंत्र घेतलं आणि गोठा २००० स्क्वे. फूट केला. आज १० म्हशी, ३ गायी असून रोज ६०-७० लिटर दूध मिळतं. त्यातून तूप, ताक, श्रीखंड, पनीर यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती सुरू केली. त्याला स्थानिक बाजारात उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.



## श्री वारी - एका ब्रँडची सुरुवात

डॉ. चोपडे मॅडम व डॉ. जावळे सर यांच्या सल्ल्याने डिसेंबर २०२२ मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयात प्रशिक्षण घेतलं. आता व्यवसाय थोडा वाढविला असून दुग्धजन्य पदार्थांची विक्री 'श्री वारी' या नावाने करीत आहे. मी क्रीम खरेदी करून चुलीवर पारंपरिक पद्धतीने तूप कढवते व ते ₹७५०–८५० प्रति किलो दराने विकते. पुणे, नागपूर, जालना व छ. संभाजीनगरसारख्या शहरांत वाढती मागणी असून, ब्रँडची ओळख गुणवत्तेमुळे निर्माण झाली आहे

## नफ्याचे गणित

आज माझ्या व्यवसायात तीन महिला कामगार कार्यरत आहेत. दरमहा १५०–१८० लिटर तूप विक्री होते. यातून मासिक उत्पन्न ₹२५,००० ते ₹३०,०००. "श्री वारी" उत्पादनांना FSSAI मंजुरी आहे. दही ₹६०/किलो, श्रीखंड ₹२६०–₹३५०, बासुंदी ₹२५०, खवा ₹२८०, चिकवडी ₹४००, तसेच विविध प्रीमिक्स व चटण्या विक्रीतून ₹८,०००–₹१०,००० अतिरिक्त नफा मिळतो.

## सन्मान आणि यशाचे श्रेय

कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी महाविद्यालय, बदनापूर यांच्या वतीने मला महिला दिन आणि शेतकरी महिला सन्मान वर्ष २०२२ मध्ये गौरवण्यात आलं. या यशाचं श्रेय माझ्या कुटुंबाला आणि मला मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. शितल चोपडे मॅडम, डॉ. महेश जावळे सर आणि इतर गुरूंना जातं.

## माझा संदेश

स्वप्नं खूप असतात, पण त्यांना मूर्त रूप द्यायचं असेल, तर शिकणं, जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन लागते. दुग्धजन्य व्यवसाय ही उत्तम दिशा आहे. शुद्धता, प्रामाणिकपणा आणि दर्जा यावर भर दिला, तर समाजात ओळख आणि स्वतःचा ब्रँड करणं शक्य होतं.

**मार्गदर्शक**

**डॉ. शितल चोपडे**
सहाय्यक प्राध्यापक
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९०२८२०८८८५

**डॉ. महेश जावळे**
सहाय्यक प्राध्यापक
नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९२७३७३००१५

**उद्योजिकेचे नाव व पत्ता**

**पद्मजा राहुल कुलकर्णी**
महाकाळा, ता. अंबड, जि. जालना - ४३१ २१२
संपर्क क्र. ९०७४७४४४०२



# मत्स्य पदार्थ निर्मितीमधून सशक्त झालं... माझं स्त्रीत्व!

# प्राजक्ता गेडाम यांची यशोगाथा

मी प्राजक्ता विनोद गेडाम, नवनिर्माण महिला ग्रामसंघ, एकलारा (ता. राळेगाव, जि. यवतमाळ) येथील रहिवासी. माझं आयुष्य शालेय शिक्षणानंतर थांबलेलं वाटत होतं. लग्नानंतर घर, शेती आणि दैनंदिन कामकाज या वर्तुळातच जगणं चाललं होतं. माझं सासर शेतकरी कुटुंब असून मुख्य पीक कापूस आणि सोयाबीन, तसेच गाई-शेळ्यांचे थोडे फार संगोपन होते. वार्षिक उत्पन्न सुमारे १.५ लाख रुपये असं मर्यादित होतं.

## टर्निंग पॉईंट

२०१५ साली MSRLM योजनेतून 'मत्स्य सखी' म्हणून माझी निवड झाली आणि तोच माझ्या आयुष्यात टर्निंग पॉईंट ठरला. याच काळात मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान विभागात पाच दिवसांचं प्रशिक्षण जुलै २०१६ मध्ये घेतलं. 'मूल्यवर्धित मत्स्य पदार्थ निर्मिती' याविषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह दिलेलं हे प्रशिक्षण म्हणजे माझ्यासाठी एक नवीन वाट होती.

## व्यवसायास सुरुवात

जिल्हा प्रशासनाकडून आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे मी मीट मिंसर, डीप फ्रीझर, गॅस शेगडी, चॉपींग बोर्ड्स, वेष्टणीकरण साहित्य यांसारखी उपकरणं विकत घेतली. २०१८ मध्ये F S S A I परवाना मिळाल्यानंतर, मी माझ्या कुटुंबासोबत मत्स्य लोणचं, मत्स्य पापड, मत्स्य चकली असे पदार्थ तयार करून कृषी प्रदर्शनांमध्ये विक्रीसाठी ठेवू लागले.

## कोविडचा धक्का

लवकरच आमचं उत्पादन मुंबई, नागपूर सारख्या शहरांत मॉल्सपर्यंत पोहोचलं. पण जेव्हा व्यवसाय बहरत होता, तेव्हा कोविड महामारीमुळे सर्व काही ठप्प झालं. काही काळ धीर खचला होता. पण २०२२ मध्ये पुन्हा नव्या जोमाने सुरुवात केली.




## मार्गदर्शन

मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील श्री. शैलेंद्र रेळेकर सर आणि श्री. सागर जोशी सर यांनी आम्हाला त्या कठीण काळातही हात दिला. त्यांनी आमच्या पदार्थांच्या चव, साठवण, सादरीकरण आणि विक्री तंत्रज्ञानावर मार्गदर्शन दिलं.

## नफ्याचे गणित

आज आम्ही जे मत्स्य लोणचं प्रति किलो ₹७००/- ला विकतो, त्यासाठी केवळ ₹४००/- खर्च येतो. एका किलोमागे ₹३०० ते ₹३२० पर्यंत नफा मिळतो. प्रदर्शनात सुमारे ₹२५,००० ते ₹३०,००० च्या वस्तू विकल्या जातात, आणि त्यातून ४०% निव्वळ नफा, म्हणजे प्रदर्शनातून सुमारे ₹१०,००० ते ₹१२,००० पर्यंत उत्पन्न मिळतं. अशा १० प्रदर्शनांतून वर्षाला सुमारे ₹१ ते ₹१.२ लाख नफा मिळतो.

## मेहनतीचा सन्मान आणि यशाचे श्रेय

सर्वात अभिमानाची गोष्ट म्हणजे, आम्हाला वर्ष २०२३-२४ मध्ये 'समृद्धी' विभागीय प्रदर्शनीत प्रथम पारितोषिक मिळालं. एकेकाळी स्वयंपाकघरापुरती मर्यादित असलेली मी, आज माझ्या बचत गटासाठी एक प्रेरणा ठरले आहे.

हा संपूर्ण प्रवास शक्य झाला फक्त स्वतःवर विश्वास आणि योग्य मार्गदर्शनामुळे. वेळोवेळी दिलेल्या तांत्रिक आणि व्यावसायिक मार्गदर्शनासाठी मी शैलेंद्र रेळेकर सर आणि सागर जोशी सरांचे विशेष आभार मानते.

## माझा संदेश

स्त्रियांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी अशा व्यवसायात यावं कारण हा केवळ व्यवसाय नाही, स्त्री सशक्तीकरणाचं मध्यम आहे.


**मार्गदर्शक**

**श्री. शैलेंद्र रेळेकर**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८९५६७५९५८२

**श्री. सागर जोशी**
सहयोगी प्राध्यापक
मत्स्य विज्ञान महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९५६१०५२८१५

**उद्योजिकेचे नाव व पत्ता**

**प्राजक्ता विनोद गेडाम**
मु. पो. धोतरा, ता. राळेगाव, जि. यवतमाळ - ४४५ ४०१
संपर्क क्र. ९३०९९६७६७०

## माफसू यशोगाथा २०२५

### नोकरीतून व्यवसायाकडे - 'नॉनव्हेजवाले डॉट कॉम'चा यशस्वी प्रवास

# अतुल उनवणे यांची यशोगाथा



माझं नाव अतुल रघुनाथ उनवणे, मूळ राहणार मंगरुळ तालुका घनसावंगी जिल्हा जालना ह.मु.राहणार यशवंत नगर, अंबड रोड, जालना. वय ३५ वर्ष. मी विज्ञान व कला पदवी घेतल्यानंतर मुंबई येथे २०११ मध्ये बहुराष्ट्रीय कंपनी मॅकडोनाल्डस येथे व्यवस्थापक या पदावर काम करीत होतो. नंतर घरगुती कारणास्तव ते काम सोडून गावी परत आलो. दरम्यान सर्व कुटुंबाची जबाबदारी माझ्यावर आल्याने जालना येथे मिळेल ते काम (बिगारी काम, माती काम) करू लागलो. नंतर कोविड सुरु झाला आणि मझ्या रोजगारावर व उत्पन्नावर मर्यादा आल्या.

कोविडच्या शेवटच्या टप्प्यात जालना येथील एका स्टील कंपनीत चांगल्या पदावर वर व उत्तम पगाराची नोकरी करू लागलो. परंतु मनात काहीतरी स्वतःचं करण्याची जिद्द कायम होती, म्हणून नोकरी करत असतानाच बीड येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले.

## व्यवसायाची ओढ

नोकरी कितीही चांगली असली तरी स्वप्नं पूर्ण करत नव्हती. त्यामुळे शेतीपूरक उद्योगात मला काहीतरी करण्याची ओढ होती. हेच लक्षात घेऊन मी पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी यांच्या पशु सामुहिक स्वास्थ्य विभागामार्फत आयोजित 'स्वच्छ व सुरक्षित चिकन मटण प्रक्रिया उद्योग व विक्री' या विषयावर ऑनलाईन प्रशिक्षणात सहभाग घेतला व या व्यवसायासंदर्भात मार्गदर्शन घेतले.

## मार्गदर्शन ठरला पाया

डॉ. रुपेश वाघमारे सरांचं मार्गदर्शन माझ्यासाठी पहिला टप्पा ठरला. यानंतर मी ३ दिवसांच्या प्रत्यक्ष प्रशिक्षणात सहभागी झालो. तिथे डॉ. रुपेश वाघमारे, डॉ. संजय लोंढे आणि डॉ. म्हाळसाकांत निकम सरांकडून व्यवसायासाठी परवाने, यंत्रसामुग्री, मूल्यवर्धित चिकन पदार्थ निर्मिती यासारख्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी शिकलो त्यामुळे मला व्यवसाय सुरु करतांना नक्कीच फायदा झाला .




## नॉनव्हेजवाले डॉट कॉमची सुरुवात

दि. ७ जून २०२३ रोजी मी जालन्यातच 'नॉनव्हेज वाले डॉट कॉम' हे चिकन विक्री केंद्र सुरू केलं. सुरुवातीला २.५ लाख रुपये भांडवल उभं केलं. व्यवसाय सुरू करताना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. कामगारांची टंचाई, पारंपारिक व्यवसायिकांचा विरोध, समाजाचा दृष्टिकोन... पण मी हार मानली नाही. स्वतः दुकानात उभं राहून मी व्यवसाय सुरू ठेवला.

## नफ्याचे गणित

परिणाम असा की, आज मी एक कामगार आणि कुटुंबाच्या मदतीने दुकान चालवतो. दुकानात कोंबड्यांची कत्तल करण्यासाठी यंत्रसामुग्री असल्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. महिन्याला ४० ते ५० हजार रुपये निव्वळ नफा मिळतो.

## यशाचे श्रेय

माझ्या यशामागचं खरं श्रेय माझी जिद्द, चिकाटी आणि पशुवैद्यक महाविद्यालय परभणीतील प्राध्यापक डॉ. रुपेश वाघमारे, डॉ. संजय लोंढे आणि डॉ. म्हाळसाकांत निकम सरांच्या खंबीर मार्गदर्शनाला जातं. आजही काही निर्णय घेताना मी त्या मार्गदर्शनाच्या आधारावर विचार करतो. मी या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

## माझा संदेश

तुमच्याकडे जिद्द असेल तर, कितीही उच्चशिक्षित तरुण कोणत्याही व्यवसायात यश मिळवू शकतो आणि स्वतःसह अनेकांच्या उपजीविकेचे कारण बनू शकतो. गरज आहे फक्त सुरुवात करण्याची. प्रत्येक दिवशी काहीतरी शिकायचं आणि प्रत्येक अडचणीतून मार्ग काढायचा, हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. रुपेश वाघमारे**
सहयोगी प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
संपर्क क्र. ९७६६९४०९५४

**डॉ. संजय लोंढे**
सहाय्यक प्राध्यापक
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
संपर्क क्र. ९८९०२०८०११

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**अतुल रघुनाथ उनवणे**
यशवंत नगर, अंबड रोड, ता. - जि. जालना - ४३१ २१३
संपर्क क्र. ९८८१२९२०८१

# माफसू यशोगाथा २०२५

## दुग्ध संकलनातून स्वयंरोजगाराकडे माझा प्रवास

# विश्वनाथ सनगले यांची यशोगाथा



मी विश्वनाथ चंद्रकांत सनगले. माझं शिक्षण बारावीपर्यंत झालं आणि आमचं कुटुंब पारंपरिक शेतीवर अवलंबून होतं. वडिलोपार्जित ६ एकर शेतीतून दरवर्षी साधारणपणे ३ ते ३.५ लाख रूपयांचं उत्पन्न मिळायचं. पण शेतीतील वाढता खर्च आणि कमी पडणारं उत्पन्न बघून मनात नेहमी वाटायचं यापेक्षा काहीतरी वेगळं, स्थिर आणि नियमित उत्पन्न देणारं करायला हवं. घरखर्च, शेतीचा ताळमेळ आणि येणाऱ्या जबाबदाऱ्या यामधून काहीतरी बदल हवा होता. नेमकं काय करावं, हे स्पष्ट नव्हतं, पण दिशा शोधायची होती.

## सुरुवात एका संकल्पाने

मी दूध विकायला सुरुवात केली तेव्हा रोज केवळ ५ ते १० लिटर दूध घेऊन उदगीरला जायचो. याच वेळी डिसेंबर २०१८ मध्ये मी संकल्पपूर्वक दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे एक दिवसीय प्रशिक्षण घेतलं आणि तिथूनच माझ्या आयुष्याला खरी दिशा मिळाली.

डॉ. कल्याणकर, डॉ. पाटील, प्रा. चोपडे, आणि प्रा. पवार यांनी मला केवळ तांत्रिक माहितीच दिली नाही, तर प्रोत्साहन, आत्मविश्वास आणि मार्गदर्शनही दिलं. या एका दिवसानं माझा दृष्टीकोन बदलला. डोळ्यांसमोर एक नवीन शक्यतांचा मार्ग उभा राहिला. तेव्हापासून मी केवळ दूध विक्रेताच नाही, तर गुणवत्तेवर विश्वास ठेवणारा उद्योजक झालो. त्या प्रशिक्षणानं माझ्या व्यवसायाचा पाया भक्कम केला आणि भविष्याची दिशा ठरवली. त्या दिवसापासून प्रत्येक निर्णयात अभ्यास, अनुभव आणि मार्गदर्शनाचा समतोल राखण्याचा निर्धार केला.

## कल्पनेतून कृतीकडे – व्यवसायाची उभारणी

प्रशिक्षणात दुग्ध प्रक्रिया, पनीर-दही निर्मिती, साठवणूक, आणि बाजारपेठ या बाबतीत माहिती मिळाल्यावर मी १ लाख रुपयांची प्रारंभिक गुंतवणूक केली. दूध कॅन, मिल्कोस्कॅन, क्रीम सेपेरेटर, पनीर प्रेस आणि स्टोरेज टाक्या यांसारखी उपकरणं घेतली.

माझ्याच गावी दूध संकलन केंद्र सुरू केलं. यामुळं शेतकऱ्यांकडून दूध संकलन करून पॅकिंगसह शहरात पाठवणं शक्य झालं. हॉटेल्सना दही, पनीरही पुरवायला सुरुवात केली. दुधाचं महत्त्व केवळ चहा-नाश्त्यापुरतं न राहता, आर्थिक स्थैर्याच्या वाटेवर उभं राहिलं.



## मेहनतीचे फळ – रोजंदारीतून उद्योजकतेकडे

आज मी घरच्या १५ लिटर दूधासोबत बाहेरून संकलित ५० लिटर दूध प्रक्रिया करून पनीर, तूप, दही आणि दूध विकतो. सर्व खर्च वजा जाता, सध्या दरमहा २१,००० रुपये निव्वळ नफा मिळतो. हे उत्पन्न केवळ व्यवसायातून नाही, तर त्या निर्णयातून मिळालेलं आहे, जो मी योग्य वेळी घेतला. शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करण्याचा! पूर्वी गावात "बेरोजगार मुलगा" म्हणून ओळखला जायचो. पण आज, मी एक यशस्वी दुग्धव्यवसायिक आहे. माझं राहणीमान बदललं, समाजात एक वेगळी ओळख तयार झाली. हे यश मी माझ्या आई-वडिलांच्या पाठिंब्याला, डॉ. कल्याणकर सरांचं मार्गदर्शन आणि माझ्या सततच्या प्रयत्नांना देतो.

## पुढील वाटचाल – एक स्वप्न

आता मी माझा स्वतःचा दुग्धजन्य ब्रँड तयार करण्याचं आणि तरुण शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचं स्वप्न बाळगतोय. माझा अनुभव इतरांसोबत शेअर करून त्यांनाही स्वावलंबी आणि यशस्वी होण्यासाठी मदत करायची आहे. आज माझ्या गावातील अनेक तरुण माझ्याकडे सल्ला मागायला येतात. हीच माझ्या प्रवासाची खरी कमाई आहे.

## विशेष आभार

डॉ. श्रीकांत कल्याणकर व डॉ. माधव पाटील, सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर यांनी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

## माझा संदेश

शेतीवर आधारित व्यवसायाचं भवितव्य खूप आहे, फक्त गरज आहे ती योग्य दिशा, प्रशिक्षण आणि सतत शिकण्याची. स्वतःवर विश्वास ठेवा, मदतीसाठी मागे हटू नका, यश तुमच्याच वाटेवर येऊन उभं राहील.


**मार्गदर्शक**

**डॉ. श्रीकांत कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९४२३४३५७५७

**डॉ. माधव पाटील**
सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८५५४००२१११

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**विश्वनाथ चंद्रकांत सनगले**
दावणगाव, ता. उदगीर, जि. लातूर - ४१२ ५१७
संपर्क क्र. ९८२३२५९०६४

माफसू यशोगाथा २०२५

## दूध संकलनातून आर्थिक स्थैर्याकडे

# दत्ता गुरमे यांची यशोगाथा



मी दत्ता विठ्ठलराव गुरमे... चांदेगाव, ता. उदगीर, जि. लातूर येथील एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आहे. आमच्याकडे वडिलोपार्जित दहा एकर शेती होती. वडील पारंपारिक शेती करत होते. घरात आई-वडील आणि तीन बहिणी. दरवर्षी ३ ते ४ लाखांचं उत्पन्न शेतीतून मिळायचं. घर व्यवस्थित चालायचं, पण मला नेहमी वाटायचं की स्वतःचं काहीतरी करून स्वतंत्र ओळख निर्माण करावी.

मी कृषी शाखेत बीएससीची पदवी घेतली आणि नोकरीसाठी प्रयत्नही केले, पण अपेक्षित संधी मिळाली नाही. तरीसुद्धा खचून न जाता शेतीला पूरक एखादा व्यवसाय करायचा ठरवलं. तेव्हा माझं लक्ष गेलं दुग्ध व्यवसायाकडे. माझं शिक्षण जरी पूर्ण झालं, तरी माझी खरी ताकद जमीन, गायी आणि श्रम यांत आहे हे मी ओळखलं.

### सुरुवात फक्त ५०,००० रुपयांत...

सन २०१८ मध्ये मी फक्त ₹५०,००० भांडवलातून दूध संकलन केंद्र सुरू केलं. इको मिल्क, प्रिंट युनिट, कॅन आणि इतर साधनसामग्री घेतली. सुरुवातीला केवळ २५ ते ४० लिटर दूध संकलन व्हायचं. पण माझं ध्येय मोठं होतं. त्याच दरम्यान, डॉ. श्रीकांत कल्याणकर सर आणि डॉ. माधव पाटील सर यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या आयुष्याला दिशा मिळाली.

सन २०१९ मध्ये मी दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथे प्रशिक्षण घेतलं. या प्रशिक्षणातून दुग्ध प्रक्रिया, व्यवसाय व्यवस्थापन, दूध गुणवत्ता तपासणीसारख्या अनेक बाबी शिकायला मिळाल्या. प्रशिक्षणाने केवळ ज्ञान दिलं नाही, तर स्वतःवरचा विश्वासही वाढवला.

### हेरिटेज कंपनीसोबत करार

प्रशिक्षणाच्या प्रभावाने माझा आत्मविश्वास वाढला. पुढे मी हेरिटेज कंपनीसोबत करार केला आणि माझा दूध संकलन व्यवसाय अधिक गतिमान झाला. आज मी रोज २०० ते २५० लिटर दूध संकलन करतो आणि त्याचा नियमित पुरवठा हेरिटेज कंपनीला करतो.

सध्या दुध संकलन आणि दुध उत्पादन गृहीत धरून माझं दरमहा सरासरी १३,००० रुपये निव्वळ उत्पन्न आहे. हे उत्पन्न फक्त आर्थिक लाभ नाही, तर माझ्या कष्टाचं फळ आहे. पूर्वी आम्हाला एक सामान्य शेतकरी कुटुंब म्हणून ओळखलं जायचं, आज मी स्वयंरोजगार करणारा युवक आहे. आज गावात मला 'दूधवाला गुरमे' म्हणून ओळखलं जातं ही ओळखच खऱ्या अर्थानं माझं यश आहे.



### मुक्त संचार गोठा

मी घरच्या गोठ्यात सात दुधाळ जनावरे सांभाळतो. मुक्तसंचार पद्धतीचा गोठा तयार केला आहे, ज्यामुळे गायींचे आरोग्य उत्तम राहते. गोठ्यात भरपूर मोकळी जागा, वायुवीजन आणि स्वच्छता यावर विशेष लक्ष देतो, जेणेकरून जनावरांना तणावमुक्त वातावरण मिळावं. गाईंचं संगोपन व्यवस्थित झालं की, दूध दर्जेदार मिळतं आणि त्याचा दरही चांगला मिळतो. जनावरांशी माझं नातं आपुलकीचं आहे. दिवसाची सुरुवात मी त्यांच्या काळजीने करतो आणि दिवस संपतो त्यांच्या समाधानी मुद्रांमधून... हीच माझ्या व्यवसायाची खरी कमाई आहे.

### यशाचे श्रेय

आज मी जिथे आहे, तिथवर येण्यासाठी दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय उदगीर आणि त्यांच्या मार्गदर्शकांचा मोठा वाटा आहे. विशेषतः डॉ. कल्याणकर सर आणि डॉ. पाटील सरांनी दिलेलं मार्गदर्शन माझ्यासाठी अमूल्य ठरलं.

### पुढचं स्वप्न – दूध प्रक्रिया केंद्र

माझं पुढचं स्वप्न आहे की, स्वतःचं दूध शीतकरण आणि प्रक्रिया केंद्र सुरू करावे. यासाठी मी नियोजन देखील सुरू केलं आहे. माझा उद्देश फक्त स्वतःचा व्यवसाय वाढवण्याचा नाही, तर इतर तरुण शेतकऱ्यांनाही मार्गदर्शन देण्याचा आहे. शेतीशी नाळ जोडलेली असूनही, नव्या तंत्रज्ञानाशी संवाद साधण्याची तयारी ठेवणं हे माझं ब्रीद आहे.

### माझा संदेश

कष्ट करण्याची तयारी असेल आणि योग्य दिशा मिळाली, तर कोणतीही अडचण यशाच्या आड येऊ शकत नाही. शेतीसोबत दुग्ध व्यवसाय हा एक उत्तम पर्याय आहे. तो फक्त जोडधंदा नाही, तर स्थिर आणि नियमित उत्पन्नाचा मार्ग आहे. मी हे स्वतः अनुभवले आहे आणि इतर तरुण शेतकऱ्यांनीही याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पहावे.

**मार्गदर्शक**

**डॉ. श्रीकांत कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९४२३४३५७५७

**डॉ. माधव पाटील**
सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८५५४००२१११

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**दत्ता विठ्ठलराव गुरमे**
मु. चांदेगाव पो. शिरोळ जनापूर, ता. उदगीर, जि. लातूर - ४२३ ५१७
संपर्क क्र. ९६०४९२७३६५

माफसू यशोगाथा २०२५

## दुग्ध व्यवसायातून यशस्वी उद्योजकतेचा प्रवास

# प्रविण शिंदे यांची यशोगाथा



मी प्रविण बाजीराव शिंदे. हिंगोली जिल्ह्यातील कळमकोंडा खुर्द या छोट्याशा गावात माझं बालपण गेलं. घरात चार एकर शेती, दहा माणसांचं एकत्र कुटुंब आणि त्यातून दरवर्षी मिळणारं फक्त एक लाखांचं उत्पन्न हे आमचं वास्तव होतं. पण मनात नेहमी वाटायचं की, आपलं आयुष्य काहीतरी वेगळं असावं. शेतात राबणं आणि परिस्थितीशी झगडणं हे तर आलंच होतं, पण नोकरीपेक्षा स्वयंरोजगार हा खरा आत्मसन्मान देतो, हे मी लवकर समजून घेतलं.

## दूध संकलनाची कल्पना

गावातून शहरात जाणाऱ्या दूध विक्रेत्यांकडे बघताना जाणवलं की, हा व्यवसाय शेतकऱ्याला त्वरित रोख रक्कम देतो. याच प्रेरणेतून मी दुग्ध व्यवसाय सुरू करायचं ठरवलं, पण अडचण होती भांडवलाची. तेव्हाच माझी भेट झाली डॉ. श्रीकांत कल्याणकर सरांशी. त्यांनी सांगितलं की, दुग्ध संकलन केंद्र उभं करूनही उद्योजक होता येतं. बस, तिथूनच माझा प्रवास सुरू झाला.

## मदर डेअरीचे दुध संकलन केंद्र

सन २०१९ मध्ये मी मदर डेअरीचे दूध संकलन केंद्र सुरू केले. त्यावेळी भांडवल कमी आणि त्यात कोरोनाचा फटका बसला. पण हार मानली नाही. २०२१ मध्ये दिवाळीच्या सुमारास मी थोडे भांडवल उभारून (₹१.५ लाख) पेढा, पनीर आणि दही तयार करायला सुरुवात केली. हळूहळू लोकांचा प्रतिसाद मिळायला लागला. मग मी ठरवलं की आता या सुरुवातीला व्यावसायिक स्वरूप द्यायचं.

## श्रीधारा डेअरीची सुरुवात

प्रधानमंत्री योजनेचे पाठबळ आणि स्वतःची मेहनत यांच्या जोरावर मी ₹ २० लाखांचं भांडवल उभं केलं. त्यातून खोवा व्हॅट, क्रीम सेपरेटर, फ्रिझर, बी.एम.सी. अशी आधुनिक उपकरणं घेतली.



१००० स्क्वे.फुट जागेत प्रोसेसिंग युनिट उभारलं आणि कळमनुरीमध्ये 'श्रीधारा दूध डेअरी' सुरू केली.

## नफ्याचे गणित

मी आज रोज १००० लिटर दूध संकलन करतो. त्यापैकी २०० लिटर प्रक्रियायुक्त दुधाच्या स्वरूपात थेट विक्री करतो आणि उरलेल्या दुधापासून पेढा, कलाकंद, बर्फी, पनीर, दही हे पदार्थ तयार करतो. दररोज ₹७,००० चा निव्वळ नफा मिळतो म्हणजे सव्वा दोन लाख रुपये मासिक उत्पन्न. हे फक्त आकडे नाहीत, ते माझ्या जिद्दीचं फलित आहे.

## यशाचं बळ – माझं कुटुंब

माझा भाऊ शुभम आणि पत्नी दोघंही दुकानाचे व्यवस्थापन सांभाळतात. आई-वडीलांची आणि समाजाची साथ यांचा देखील मला खूप मोठा आधार आहे. माझं यश हे संपूर्ण कुटुंबाच्या मेहनतीचं फळ आहे.

## यशाचे श्रेय

दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील सहयोगी अधिष्ठाता डॉ. माधव पाटील आणि सहयोगी प्राध्यापक डॉ. श्रीकांत कल्याणकर या दोघांनी मला दिशा दिली. मार्गदर्शन, वेळोवेळी संवाद, आणि व्यवसायातील बारकाव्यांची माहिती दिल्यामुळेच मी तांत्रिकदृष्ट्या सजग झालो.

## पुढील ध्येय

आता माझं स्वप्न आहे की, सर्व दुग्ध उत्पादकांना एकत्र आणून प्रोसेसिंग क्लस्टर तयार करायचे. नव्या तरुणांना प्रशिक्षण देऊन त्यांचीही करिअर घडवायचं. दुग्ध व्यवसाय म्हणजे आधुनिक व्यवस्थापन, दर्जा आणि नियोजन यातून निर्माण होणारी एक यशस्वी उद्योगसंस्था असू शकते, हे मी स्वतः अनुभवतोय.


**मार्गदर्शक**

**डॉ. श्रीकांत कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९४२३४३५७५७

**डॉ. माधव पाटील**
सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८५५४००२१११

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**प्रविण बाजीराव शिंदे**
कळमकोंडा खुर्द, ता. कळमनुरी, जि. हिंगोली - ४३१ ७०२
संपर्क क्र. ९५११६०१७७८

दूध प्रक्रिया उद्योगाचा यशस्वी प्रवास

# समीर मेहताब सय्यद यांची यशोगाथा



मी समीर मेहताब सय्यद, जवळगा (सा) ता. देवणी इथला. आमचे वडील मेहताब सय्यद टेलरिंग व्यवसाय करून आमच्या तिघा भावंडांचा सांभाळ करत. बी. कॉम. पर्यंत शिक्षण झाल्यावर मी नोकरीसाठी प्रयत्न केले, पण समाधानकारक पगार कुठेच मिळाला नाही. त्यामुळे निर्णय घेतला, स्वतःचा व्यवसाय करायचा आणि तोही आपल्या आवडीचा. लहानपणापासूनच घरच्या गाई-म्हशींची निगा राखणं, दूध काढणं, गोठा स्वच्छ ठेवणं, हे काम मनापासून करायचो. म्हणून जेव्हा व्यवसायाचा विचार करत होतो, तेव्हा दुग्ध व्यवसाय हेच क्षेत्र माझ्या डोळ्यासमोर होतं. शेतीचं आणि दुधाशी संबंधित वातावरण घरात असल्यामुळे त्याकडे आकर्षण निर्माण झालं होतं.

## सुरुवात आणि अनुभव

मी आधी काही शेतकऱ्यांकडून दूध विकत घेऊन शहरात विक्री सुरू केली. नंतर एका खाजगी कंपनीची डिस्ट्रीब्यूशन एजन्सी घेतली. मात्र फक्त कमिशनवर व्यवसाय चालवणं समाधानकारक वाटलं नाही. स्वतःचं काहीतरी हवं होतं. दररोज सकाळी उठून दूध संकलन, ग्राहकांना पोचवणं सगळं स्वतः करत होतो. पण नफा कमी आणि मेहनत जास्त ही जाणीव सतावत होती.

## मार्गदर्शक वळण

सन २०१९ मध्ये मी दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीरशी संपर्क साधला. डॉ. कल्याणकर आणि डॉ. पाटील सरांनी मला मार्गदर्शन केलं की, दूध प्रक्रिया आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करत आपण या व्यवसायात स्थैर्य मिळवू शकतो. त्याच क्षणी ठरवलं, गुणवत्तेवर भर देऊन दुग्ध व्यवसाय करायचाच. माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट चित्र होतं, दर्जेदार उत्पादन आणि ग्राहकांचा विश्वास.

## २०२१ पासून कुटीर स्तरावर सुरुवात

मी आधी घरच्या घरी दही व पनीर बनवून विक्री सुरू केली. प्रशिक्षण घेतलं, महाविद्यालयात वेळोवेळी जाऊन माहिती घेतली. यश मिळू लागलं आणि आत्मविश्वास वाढला. मित्र-परिवार आणि स्थानिक ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याने हे छोटे पाऊल मोठा टप्पा ठरला.



## ४० लाखांची गुंतवणूक

लातूर अर्बन बँकेच्या कर्जातून आणि वडिलांकडून मिळालेल्या मदतीने मी ₹४० लाखांची गुंतवणूक केली. क्रीम सेपरेटर, खोवा मशीन, पाश्चरायझर, बी.एम.सी., फ्रिझ, वजनकाटा अशी आधुनिक यंत्रं घेतली. सुरुवातीला दूध खराब होणं, पनीरची गुणवत्ता खराब होणं, मशीन गळती अश्या अडचणी आल्या...पण मी हार मानली नाही.

डॉ. कल्याणकर, डॉ. पाटील, डॉ. शिंदे, डॉ. गावंडे या सर्व प्राध्यापकांकडून मार्गदर्शन घेतलं आणि महाविद्यालयात तीन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केलं. त्याच प्रशिक्षणाने मला व्यवसायात गती दिली. नवीन तंत्रज्ञान स्वीकारताना सुरुवातीला भीती वाटत होती, पण मार्गदर्शनामुळे ती आत्मविश्वासात बदलली.

## रॉयल दूध आणि दुग्ध पदार्थ – यशस्वी ब्रँड

आज मी माळेवाडी (उदगीर) येथे १२०० स्क्वे.फुट जागेत 'रॉयल दूध आणि दुग्ध पदार्थ' या नावाने FSSAI नोंदणीकृत युनिट चालवतो. दररोज ७०० लिटर दूध संकलन करतो. त्यातून १० किलो खोवा, ८० लिटर दही, ६ किलो पनीर, तूप उरलेलं दूध पॅकिंगसाठी वापरतो.हे सर्व प्रॉडक्ट्स स्थानिक बाजारात विकले जातात. दररोज ₹ ६०, ००० खर्च आणि ₹५,००० निव्वळ नफा म्हणजे दरमहा ₹१.५० लाख उत्पन्न मिळतं.

## कुटुंबीयांची साथ – माझं बलस्थान

माझे दोन भाऊ या व्यवसायात पूर्ण वेळ मदत करतात. आम्ही दूध विक्री व प्रक्रिया सर्व काही एकत्र हाताळतो. हा व्यवसाय आमच्या कुटुंबाच्या एकात्मतेचं प्रतिक झाला आहे.

## यशाचे श्रेय

वडिलांच्या कष्टाची शिकवण, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या तज्ज्ञांचे तांत्रिक मार्गदर्शन आणि स्वतः शिकण्याची तयारी ह्यामुळे मी आज एका यशस्वी उद्योजकाच्या भूमिकेत उभा आहे.


**मार्गदर्शक**

**डॉ. श्रीकांत कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९४२३४३५७५७

**डॉ. नितीन शिंदे**
ग्राम नवतंत्रज्ञ परीस्करण तथा प्रसारक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९३७३५०१९७६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**समीर मेहताब सय्यद**
रॉयल दुध, माळेवाडी, ता. उदगीर, जि. लातूर - ४१३ ५१७
संपर्क क्र. ९६७३३०१३९२

दुग्ध पदार्थ निर्मिती व्यवसायातून आर्थिक सशक्ततेचा मार्ग

# संतोष पवळे यांची यशोगाथा



मी संतोष व्यंकटराव पवळे, मी मूळचा कुरुळा गावचा, एका साध्या शेतकरी कुटुंबातून आहे . आमचं घर संयुक्त होतं. आई-वडील, तीन भाऊ, पत्नी आणि मुलगा. शिक्षण बारावीपर्यंत झालं, सरकारी नोकरी मिळवण्यासाठीची संधी कमी होती. वडिलोपार्जित पाच एकर शेती होती, पण उत्पन्न फारसं समाधानकारक नव्हतं. म्हणूनच, काही तरी जोड व्यवसाय करावा हा विचार मनात रुंजी घालत होता. दररोजच्या खर्चाची गणितं जमवताना भविष्य सुरक्षित वाटत नव्हतं. म्हणून व्यवसाय करण्याची ओढ मनात सतत होती.

## दुग्ध व्यवसायाकडे पहिले पाऊल

मी सुरुवात केली चार मुऱ्हा म्हशी खरेदी करून. त्यांचं दूध खासगी डेअरीला विकायला लागलो. पण खर्च आणि मिळकतीचा मेळ काही बसत नव्हता. हेच करत असताना एक दिवस, २०१८-१९ मध्ये, चारा उत्पादनासाठी मी पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथे गेलो आणि तिथूनच माझ्या जीवनात बदल सुरू झाला. त्या भेटीतून व्यवसायाला वळण मिळालं आणि मनात दिशा स्पष्ट झाली.

## योग्य मार्गदर्शनाची साथ

पशुवैद्यक महाविद्यालयाच्या शेजारीच असलेल्या दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयात जायचा योग आला. तिथे डॉ. माधव पाटील आणि डॉ. श्रीकांत कल्याणकर सरांची भेट झाली. त्यांनी मला दूध प्रक्रिया आणि दुग्ध पदार्थ निर्मिती या क्षेत्राची ओळख करून दिली. डॉ. कल्याणकर सरांनी प्रोत्साहन दिलं, की केवळ दूध विक्रीवर न थांबता पनीर आणि दही तयार करून स्थानिक बाजारात विकावं. व्यवसाय करताना विज्ञानाची जोड मिळाल्यास उत्पादनात आणि दर्जात दोन्ही ठिकाणी फरक पडतो, हे मला तेव्हाच उमगलं.

## श्री मिल्क प्रोसेसिंग युनिटची सुरुवात

सुरुवातीला दूध संकलित करून कुटीर स्तरावर दही आणि पनीर तयार करू लागलो. चांगला प्रतिसाद मिळू लागल्यावर मी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घेतला. ५ लाख रुपये गुंतवणूक करत बल्क मिल्क कूलर, खोवा व्हॅट, पनीर प्रेस, फ्रीझर, क्रीम सेपरेटर, पॅकिंग मशिनरी खरेदी केली.



डॉ. कल्याणकर सरांच्या मार्गदर्शनाने मी व्यवसायाची FSSAI नोंदणी केली आणि 'श्री मिल्क प्रोसेसिंग अँड मिल्क प्रॉडक्ट मॅन्युफॅक्चरिंग युनिट' नावाने माझा व्यवसाय अधिकृतपणे सुरू केला. हौस म्हणून सुरू केलेलं काम आता व्यवसायात रूपांतरित झालं होतं.

## व्यवसाय विस्तार

मी कुरुळा बाजारात १२x१२ फूट जागेचं दुकान घेतलं. आज मी १५ लिटर घरचं दूध व १०० लिटर दुध बाहेरून संकलन करून खोवा, पनीर, दही, तूप तयार करतो व जांब, जळकोट आणि कंधारच्या बाजारात विक्री करतो. व्यवसायाची वाढ चांगलीच होत आहे आणि सध्या दरमहा सुमारे ₹३९,००० निव्वळ नफा मिळतो. ग्राहकांचा विश्वास आणि दर्जेदार उत्पादन हीच माझ्या यशाची खरी ताकद आहे.

## यशाचे श्रेय

माझ्या व्यवसायामागे कुटुंबीयांचा मोठा आधार आहे. तसंच, डॉ. कल्याणकर आणि डॉ. पाटील सरांचं तांत्रिक मार्गदर्शन, वेळोवेळी सल्ला, आणि प्रेरणा ह्यामुळेच मी हा प्रवास सुरू ठेवू शकलो.

## पुढचं स्वप्न

आता माझं लक्ष स्वतःचा ब्रँड निर्माण करणे आणि मोठ्या प्रमाणात दुग्ध पदार्थ प्रक्रिया करण्यावर आहे. मला विश्वास आहे, की प्रयत्न, मेहनत आणि सातत्य यांच्या जोरावर हे नक्की साध्य होईल.

## माझा संदेश

कोणतीही परिस्थिती असो, स्वतःवर विश्वास ठेवा, नवं शिकण्याची तयारी ठेवा आणि व्यवसायात सातत्य ठेवा. हेच यशाचं गमक आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ. श्रीकांत कल्याणकर**
सहयोगी प्राध्यापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ९४२३४३५७५७

**डॉ. माधव पाटील**
सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर
संपर्क क्र. ८५५४००२१११

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**संतोष व्यंकटराव पवळे**
मु. कुरुळा, ता. कंधार, जि. नांदेड - ४३१ ७१२
संपर्क क्र. ९५४५०२४१७६

माफसू यशोगाथा २०२५

## शुभ्र धवल यश - सांगलीच्या तरुणाची डेअरी व्यवसायात भरारी

# श्रवण पाटील यांची यशोगाथा



मी श्रवण किसन पाटील, सांगली जिल्ह्यातील बिसूर या गावचा. माझं शिक्षण बी.बी.ए. (मार्केटिंग) मध्ये झालंय, पण नोकरीच्या मागे न लागता मी माझं भविष्य शेती आणि दुग्धव्यवसायात पाहिलं. आमच्या घरात पूर्वीपासूनच शेती आणि पशुपालन चालत होतं, त्यामुळे त्याला एक शास्त्रशुद्ध, आधुनिकतेची जोड देण्याचं ठरवलं. बालपणापासून गाई-म्हशींची देखभाल, दूध काढणं याची सवय होती. त्यामुळे या व्यवसायाशी एक नैसर्गिक जवळीक होती.

## सुरुवात

२०१९ मध्ये 'सुंदर दूध डेअरी' या नावाने मी स्वतःचा दुग्ध प्रक्रिया व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला घरचीच थोडी जमीन वापरली आणि अंदाजे ₹२ लाखांची गुंतवणूक केली. व्यवसाय वाढवण्यासाठी बँक ऑफ इंडियाच्या सांगली शाखेतून ₹२० लाखांचे कर्ज घेतले. या व्यवसायासाठी आम्ही कुटुंबातील सर्वजण आई-वडील, भाऊ आणि मी मिळून काम करतो. मी मार्केटिंग बघतो, तर घरातील इतर मंडळी दूध संकलन व दुग्ध पदार्थ निर्मितीचं काम सांभाळतात.एकत्र कुटुंब आणि सामूहिक जबाबदारी यामुळे व्यवसायाची पायाभरणी अधिक मजबूत झाली.

## प्रशिक्षण

या व्यवसायात उतरण्यापूर्वी मला दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड (पुसद) येथे ०५ मे ते २० मे २०२२ या कालावधीत १५ दिवसांचे "दुग्ध पदार्थ निर्मिती व विक्री" विषयक तांत्रिक प्रशिक्षण मिळाले. डॉ. प्रशांत वासनिक सर आणि श्री. अनिल वाकडे सरांचे मार्गदर्शन मला प्रत्येक टप्प्यावर लाभले. त्यांनी दिलेल्या प्रशिक्षणातून मला व्यवसायाच्या बारीकसारीक गोष्टी समजल्या. केवळ उत्पादन नव्हे, तर त्याची विक्री, दर्जा आणि ग्राहकसंवाद या बाबतीतही स्पष्ट दृष्टीकोन मिळाला. प्रशिक्षणादरम्यानच व्यवसायात नवे दृष्टीकोन, शिस्त आणि आधुनिकतेची जाणीव झाली.

## सद्यस्थिती आणि व्यवस्थापन

आज माझ्या डेअरीमध्ये दिवसाला सुमारे १००० लिटर दूध संकलन होतं. सध्या माझ्याकडे खवा मशीन, क्रीम सेपरेटर, फ्रिज, इन्क्युबेटर, पॅकिंग मशीन आणि डीप फ्रीज अशी यंत्रसामग्री आहे. मी खवा, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, ताक, लस्सी आणि दही यासारखे पदार्थ तयार करून स्वतःच्या दुकानातून, स्थानिक बेकरी आणि मॉलमार्फत विक्री करतो. व्यवसायासाठी FSSAI नोंदणीही घेतलेली आहे. गुणवत्ता आणि वेळेवर वितरण यावर भर देत आम्ही ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे.



## पगारी उत्पन्न आणि सरकारी गौरव

या सगळ्यातून खर्च वजा जाता आज माझं निव्वळ मासिक उत्पन्न ₹५०,००० पेक्षा जास्त आहे. सध्या माझ्याकडे ६ कामगार काम करतात आणि मी स्वतःही पूर्णवेळ व्यवसायात गुंतलेलो आहे. या व्यवसायात सातत्य, प्रामाणिक मेहनत, दर्जा आणि ग्राहकांचा विश्वास हेच माझं यशाचं गमक आहे. याच कारणामुळे सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माझा यशस्वी उद्योजक म्हणून गौरवही झाला आहे. हा गौरव केवळ माझा नव्हे, तर प्रत्येकाच्या सामूहिक प्रयत्नाचा सन्मान आहे.

## भविष्यातील स्वप्न व यशाचे श्रेय

भविष्यात मी ५०० लिटर प्रति तास क्षमतेचा मिल्क प्रोसेसिंग प्लांट उभारण्याचं नियोजन करत आहे. मी जे यश मिळवलं, ते माझ्या आई-वडीलांच्या पाठिंब्यामुळे आणि दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड येथील मार्गदर्शक प्राध्यापकांच्या वेळोवेळी दिलेल्या मदतीमुळे शक्य झालं. आता माझं लक्ष अधिकाधिक तरुणांना या व्यवसायाकडे वळवण्यावर आहे.

## माझा संदेश

आज मी विश्वासाने हे सांगतो की बेरोजगार तरुणांनी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करून सातत्याने मेहनत घेतली, तर व्यवसायात हमखास यश मिळतं. तुम्हाला फक्त एक ठाम निर्णय घ्यायचा आहे. स्वतःच्या पायावर उभं राहायचं! स्वतःवर विश्वास ठेवा, योग्य मार्गदर्शन घ्या आणि सातत्य राखलं की यश दार ठोठावेल.


**मार्गदर्शक**

**श्री. अनिल वाकडे**
दुग्ध शाळा व्यवस्थापक
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड
संपर्क क्र. ९७६५६२७९७५

**डॉ. प्रशांत वासनिक**
सहयोगी अधिष्ठाता
दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, वरूड
संपर्क क्र. ९९००५१४०३६

**उद्योजकाचे नाव व पत्ता**

**श्रवण किसन पाटील**
मु.पो. बिसूर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ३०४
संपर्क क्र. ८६००३३७००५



# माफसू यशोगाथा

"

**"स्वप्नांचा मार्ग शोधणाऱ्यांसाठी एक प्रेरणादायी वाट आहे."**

पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग, विक्री व्यवस्थापन या साऱ्या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करणाऱ्या सामान्य ग्रामीण माणसांच्या असामान्य कहाण्या म्हणजे 'यशोगाथा'. हे केवळ यशाचे अनुभव नाहीत... हे जिद्दीचे, प्रयोगशीलतेचे आणि आत्मविश्वासाचे जिवंत दस्तऐवज आहेत.

या पुस्तकात तुम्हाला भेटतील, असे नायक - नायिका ज्यांनी अडचणींवर मात करत अपयशाच्या पायऱ्या ओलांडून यशाचे शिखर गाठले. मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि चिकाटी यांच्या जोरावर त्यांनी स्वतःचा व्यवसाय फुलवला, समृद्धीकडे वाटचाल केली आणि इतरांसाठी आदर्श ठरले.

या 'यशोगाथा' वाचनीय आहेत, कारण यातून मिळतो प्रेरणेचा खराखुरा स्वदेशी मंत्र
**"शिकत राहा, अवलंब करा, समृद्ध व्हा!"**

प्रस्तुत आहे...
**ग्रामीण महाराष्ट्राच्या निवडक यशस्वी कहाण्यांची एक खुसखुशीत शिदोरी.**

**विस्तार शिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर**
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४०००१
www.mafsu.ac.in